**GUITAR CLASSES**
**BY SWARSANGAM**
STARTING FROM 16/05/2026 EVERY SATURDAY & SUNDAY TOTAL BATCHES: 2 (TWO BATCHES ONLY)
MORNING BATCH :- 10:00 AM - 11:00 AM, EVENING BATCH :- 4:00 PM 5:00 PM, BATCH SIZE - MAX 5, STUDENTS ONLY
LOCATION- Maruti Mandir, Varsoli, Bhandar Ali
CONTACT : Akshay Padwal 8408877317

# कृषीवल

रायगड, शनिवार, दि. १६ मे २०२६

किंमत ४ ₹

**ड्रायव्हर पाहिजे**
आर्यन डेवकॉन्स् प्रायव्हेट लिमिटेड, अलिबाग येथे पूर्ण वेळ (Full Time) कायमस्वरूपी नोकरी. अनुभवी ड्रायव्हर बोलेरो पीक अप आणि स्कॉर्पिओ गाडी साठी तातडीने पाहिजे.
वैध ट्रान्सपोर्टचा (TR) ड्रायव्हिंग लायसन्स आवश्यक. पगार: चर्चा करून ठरविण्यात येईल.
**संपर्क : ९२२५६०२८१०**




हिरो शोरूमच्या शेजारी, बायपास रोड, चेंधरे, अलिबाग | फोन नं.: ८००७१२३१७४/८००७१२३१७६
विले पार्ले (पू) । ठाणे (प) । कल्याण (प) । बोरिवली (प) । पनवेल (प) । डोंबिवली (पू) । वाशी । घोडबंदर रोड (ठाणे) । भांडुप (प) । गोरेगाव (प) । विरार (प) । दादर (प) । उरण
टोल फ्री नं: १८०० २३३ ५००५ (सकाळी ११ – संध्याकाळी ७) www.pngjewellers.com | info@pngadgil.com
INDIA | USA

# आदिवासींच्या उपजीविकेवर घाला?

## माथेरानमध्ये 'सुशोभीकरणा'च्या नावाखाली स्टॉल हटवण्याचा आरोप

| नेरळ | प्रतिनिधी



जागतिक दर्जाचे पर्यटनस्थळ म्हणून ओळखल्या जाणाऱ्या माथेरानमध्ये आता स्थानिक आदिवासींच्या उपजीविकेवरच गदा येण्याची भीती निर्माण झाली आहे. कपाडिया मार्केटसमोरील परिसरात गेल्या अनेक दशकांपासून हस्तकला वस्तू, रानमेवा आणि गवतापासून तयार केलेल्या कलात्मक वस्तू विकणाऱ्या आदिवासी बांधवांना 'सुशोभीकरणा'च्या नावाखाली हटवण्याचा प्रयत्न सुरू असल्याचा गंभीर आरोप होत आहे. त्यामुळे माथेरानमध्ये पिढ्यान् पिढ्या व्यवसाय करणाऱ्या आदिवासी समाजामध्ये तीव्र नाराजी पसरली आहे.

कर्जत तालुका हा आदिवासी बहुल भाग म्हणून ओळखला जातो. याच तालुक्यात वसलेल्या माथेरानमध्ये देश-विदेशातून हजारो पर्यटक दरवर्षी दाखल होतात. या पर्यटकांसाठी स्थानिक आदिवासी बांधव जंगलातून करवंदे, जांभुळे, आंबे, विविध रानफळे तसेच गवतापासून तयार केलेले आकर्षक बुके, फुलदाण्या आणि हस्तकला वस्तू विक्रीसाठी आणतात. या वस्तूंना पर्यटकांकडून मोठी मागणी असते. करंजा परिसरापासून कपाडिया मार्केटपर्यंत अनेक आदिवासी कुटुंबे गेल्या ७० ते १०० वर्षांपासून छोट्या स्टॉलद्वारे आपला उदरनिर्वाह करत आहेत. मात्र, आता माथेरान गिरीस्थान नगरपरिषदेकडून या परिसरात सुशोभीकरणाचे काम हाती घेण्यात आले असून, जुन्या झाडांच्या परिसरात पर्यटकांसाठी ओटे आणि बसण्याची व्यवस्था उभारली जात आहे. यामुळे तेथे व्यवसाय करणाऱ्या आदिवासींना हटवले जात असल्याचा आरोप होत आहे.

> "माथेरानच्या मुख्य बाजारपेठेत झाडांच्या आडोशाला बसून आदिवासी बांधव पिढ्यान् पिढ्या आपला व्यवसाय करत आहेत. मात्र, आता सुशोभीकरणाच्या नावाखाली त्यांना हटवण्याचा प्रयत्न सुरू आहे. ज्या आदिवासींनी माथेरानच्या पर्यटन संस्कृतीत आणि ओळखीत मोलाचा वाटा उचलला, त्यांनाच आज शहराबाहेर ढकलण्याचे षडयंत्र रचले जात आहे का? असा गंभीर प्रश्न निर्माण झाला आहे. ही केवळ स्टॉल हटवण्याची कारवाई नसून आदिवासींच्या अस्तित्वावरच घाला आहे. नगर परिषदेकडे तातडीने निर्णय मागे घ्यावा, अन्यथा आदिवासी बांधव तीव्र आंदोलन करतील."
>
> – जैतू पारधी, आदिवासी कार्यकर्ते, खालापूर

# अलिबाग-रोहा-तळा रस्ते कामांना वेग द्या

## ● पावसाळ्यापूर्वी कामे पूर्ण करण्याचे आदेश

| मुंबई | प्रतिनिधी |

रायगड जिल्ह्यातील अलिबाग-रोहा-तळा या महत्त्वाच्या रस्ते प्रकल्पाच्या कामांना गती देऊन पावसाळ्यापूर्वी उर्वरित कामे पूर्ण करावीत, असे स्पष्ट निर्देश सार्वजनिक बांधकाम मंत्री शिवेंद्रसिंगराजे भोसले यांनी संबंधित अधिकाऱ्यांना दिले. बुधवारी मंत्रालयात आयोजित आढावा बैठकीत त्यांनी कामांच्या प्रगतीचा सविस्तर आढावा घेतला.

रायगड हा राज्यातील प्रमुख पर्यटन जिल्हा मानला जातो. अलिबाग, रोहा, तळा तसेच परिसरातील पर्यटनस्थळांना दरवर्षी मोठ्या संख्येने पर्यटक भेट देत असतात. त्यामुळे या भागातील रस्ते अधिक सुरक्षित, सक्षम आणि सुस्थितीत असणे आवश्यक असल्याचे मंत्री भोसले यांनी नमूद केले. स्थानिक नागरिक आणि पर्यटकांची गैरसोय टाळण्यासाठी कामे युद्धपातळीवर पूर्ण करण्याच्या सूचना त्यांनी अधिकाऱ्यांना दिल्या.

या बैठकीस खा. सुनील तटकरे, सार्वजनिक बांधकाम विभागाचे सचिव शरद राजभोज, उपसचिव शैलेश बोरसे, कार्यकारी अभियंता मोनिका धायतडक, उपविभागीय अभियंता विजय बागुल, उपअभियंता दिनेश पराते यांच्यासह विभागातील वरिष्ठ अधिकारी उपस्थित होते.

अलिबाग-रोहा-तळा हा ८५.६० किलोमीटर लांबीचा महत्त्वपूर्ण रस्ता एचएएम पॅकेज-०१ अंतर्गत विकसित केला जात आहे. या प्रकल्पाला प्रशासकीय मान्यता मिळाली असून, सध्या सुमारे ६४ टक्के काम पूर्ण झाले आहे. उर्वरित कामे तातडीने पूर्ण करून प्रकल्प वेळेत पूर्ण करण्याच्या सूचना मंत्री भोसले यांनी दिल्या.

बैठकीदरम्यान रस्त्याच्या प्रगतीबाबत सविस्तर सादरीकरण करण्यात आले. प्रकल्पातील प्रलंबित कामे, वाहतूक व्यवस्थापन आणि पावसाळ्यापूर्वी करावयाच्या उपाययोजनांवरही चर्चा झाली.

हा रस्ता पूर्ण झाल्यानंतर अलिबाग, रोहा आणि तळा परिसरातील दळणवळण अधिक गतिमान होणार असून पर्यटन, व्यापार आणि स्थानिक विकासाला मोठी चालना मिळणार असल्याचे बैठकीत नमूद करण्यात आले.

# निवडक



## दरेकरांनी घेतली पंकज तांबेंची भेट

**माणगाव :** महाराष्ट्र गृहनिर्माण स्वयं समूह पुनर्विकास प्राधिकरण अध्यक्ष प्रवीण दरेकर यांनी रायगड जिल्हा काँग्रेसचे उपाध्यक्ष तथा शेतकऱ्यांचे नेते पंकज रवींद्र तांबे व परिवाराची खांदाड- माणगाव येथील विभारज कॉटेज निवासस्थानी सदिच्छा भेट घेतली. प्रवीण दरेकर हे शुक्रवार, दि.१५ मे रोजी रायगड जिल्ह्यात एका कार्यक्रमाच्या निमित्ताने आले होते. दरम्यान, सकाळी ११ वाजता दरेकर यांनी पंकज तांबे व परिवाराची भेट घेतली. यावेळी पंकज तांबे आणि परिवाराकडून ना. दरेकर यांचे पुष्पगुच्छ व सन्मानचिन्ह देऊन स्वागत करण्यात आले. यावेळी भाजप नेते बिपीन म्हामुणकर, बापू सोनगिरे, राजिपचे माजी शिक्षण व आरोग्य समिती सभापती ज्ञानदेव पवार, जिल्हा राष्ट्रवादीचे उपाध्यक्ष रवींद्र मोरे, उद्योगपती सीताराम उभारे, स्वप्नील शिर्के आदी मोठ्या संख्येने उपस्थित होते.




● ग्रामस्थ आक्रमक

## अपूर्ण महामार्गावर टोल वसुली

**पनवेल :** मुंबई-गोवा महामार्गावरील खारपाडा येथील टोलनाका सुरू करण्यात आल्याने स्थानिक ग्रामस्थ आणि वाहन चालकांमध्ये तीव्र संतापाची लाट उसळली आहे. महामार्गाचे काम अद्याप पूर्ण झाले नसताना टोल आकारणी सुरू केल्यामुळे नागरिकांनी प्रशासनाच्या भूमिकेवर प्रश्नचिन्ह उपस्थित केले आहे. ग्रामस्थांच्या मते, सर्वोच्च न्यायालयाच्या आदेशानुसार अपूर्ण रस्त्यावर टोल वसुली करता येत नसताना संबंधित यंत्रणांकडून नियमांचे उल्लंघन करण्यात येत आहे. त्यामुळे "सर्वोच्च न्यायालयाच्या आदेशाला पायदळी तुडवले जात आहे," असा आरोप आंदोलकांनी केला. दरम्यान, खड्डेमय रस्ते, अपूर्ण सेवा रस्ते, धुळीचे साम्राज्य आणि वाहतूक कोंडी यामुळे नागरिक आधीच त्रस्त आहेत. अशा परिस्थितीत टोल आकारणी म्हणजे सर्वसामान्यांच्या जखमेवर मीठ चोळण्याचा प्रकार असल्याची भावना वाहन चालकांनी व्यक्त केली. टोल नाका तात्काळ बंद करून महामार्गाचे संपूर्ण काम पूर्ण झाल्यानंतरच टोल आकारणी करावी, अशी मागणी ग्रामस्थांकडून करण्यात येत आहे. अन्यथा तीव्र आंदोलन छेडण्याचा इशाराही स्थानिकांनी दिला आहे.



## 'रेल्वे ट्रॅक सुरक्षा उपाययोजना करा'

**नवीन पनवेल :** लघुशंकेसाठी गेलेल्या अमोल पैठणे यांचा रेल्वे ट्रॅकवर अपघात झाला आणि त्यांना आपला जीव गमवावा लागला. या घटनेमुळे रेल्वे ट्रॅक परिसरात सुरक्षा उपाययोजना करण्याची मागणी महाराष्ट्र नवनिर्माण सेनेचे पनवेल महानगर सचिव पराग बालड यांनी रेल्वे व्यवस्थापक, पनवेल यांच्याकडे पत्राद्वारे केली आहे. रेल्वे ट्रॅकवरील अपघात रोखण्यासाठी त्या ठिकाणी बॅरिगेट लावण्यात यावे यासाठी पनवेल मनसेच्या वतीने पनवेल रेल्वे व्यवस्थापक यांना निवेदन देऊन पराग बालड यांनी मागणी केली. ३० एप्रिल रोजी रात्री सव्वा आठच्या सुमारास बालभारती ते सीएनजी पंप असलेल्या दरम्यान रेल्वे अंडरपासजवळ रेल्वे क्रॉसिंग ब्रिजच्या बाजूला असलेल्या दुकानाच वीज पुरवठा संदर्भातील तक्रारीसाठी अमोल पैठणे गेले होते. यावेळी तक्रार निवारण केल्यानंतर ते लघुशंकेसाठी गेले असता त्यांचा अपघात झाला. त्यांना उपचारासाठी रुग्णालयात दाखल केले असता डॉक्टरांनी मृत घोषित केले होते. यापूर्वीही त्या ठिकाणी अनेक अपघात झाले आहेत. संरक्षित कुंपण नसल्यामुळे नागरिकांचे जीव धोक्यात आले आहेत. त्यामुळे सुरक्षिततेच्या दृष्टीने योग्य ती उपाययोजना करावी आणि भविष्यात होणारी दुर्घटना टाळावी यासाठी मनसेने पत्रव्यवहार केला आहे. यावेळी मनसे पदाधिकारी उपस्थित होते.

# पनवेल पुरवठा अधिकाऱ्यांची बदली करा

## ● राष्ट्रवादी शरद पवार गटाची आयुक्तांकडे मागणी

| नवीन पनवेल | प्रतिनिधी |

पनवेल पुरवठा अधिकाऱ्यांच्या कामाबाबत अनेक तक्रारी येत असल्यामुळे त्यांची बदली करण्याची मागणी राष्ट्रवादी काँग्रेस शरद पवार गटाचे महाराष्ट्र प्रदेश युवक सचिव आदित्य जानोरकर यांनी कोकण आयुक्त यांच्याकडे पत्राद्वारे केली आहे.

पनवेल येथील पुरवठा अधिकारी या बऱ्याचदा कार्यालयात वेळेवर हजर नसतात तसेच त्या तहसीलदार यांना न सांगता कुठे निघून जातात याची चौकशी करणे गरजेचे असल्याचे जानोरकर यांनी म्हटले आहे. अनेक रेशन दुकानात भ्रष्टाचार सुरू असताना रेशन दुकानांची तपासणी केली जात नाही. तसेच पुरवठा अधिकारी या कार्यालयात येणाऱ्या नागरिकांसोबत व्यवस्थित बोलत नाहीत आणि त्यांना बसायला जागा देत नाहीत. येथील पुरवठा कार्यालयात खासगी माणसे काम करतात. त्यांना पगार कोण करतो? तसेच एजंट देखील अनेकदा ये-जा करतात. शिवभोजन थाळी केंद्राचे मानधन पाठवण्यासदेखील जाणूनबुजून उशीर केला जात असल्याचे जानोरकर यांचे म्हणणे आहे. गोरगरीब आदिवासी बांधवांनादेखील धान्यापासून वंचित राहावे लागत आहे.

पनवेल तालुक्यात १९९ रेशनिंगची दुकाने आहेत. यातील अनेक दुकानात भावफलक आणि साठा फलक लावलेला नसतो. तसेच प्राधान्य आणि अंत्योदय लाभार्थ्यांची यादी दुकानात ठेवलेली नसते. धान्याचे नमुने, साठा रजिस्टर, विक्री बुक नसतो. रेशन बुक आणि तक्रार बुक देखील नसते. दुकान उघडण्याची आणि बंद करण्याची वेळ दर्शवणारा फलक नसतो. तक्रार करण्यासाठी टोल फ्री क्रमांक आणि हेल्पलाइन क्रमांक नमूद केलेले फलक नसतात. असे असतानादेखील पुरवठा अधिकारी दुकानांची तपासणी करत नाहीत आणि नियमांचे उल्लंघन करणाऱ्यांवर कारवाई करत नाहीत. त्यामुळे त्यांची पनवेल येथून तात्काळ बदली करावी अशी मागणी कोकण आयुक्त यांच्याकडे करण्यात आली आहे.

**यापूर्वीचे तहसीलदार विजय पाटील यांनी देखील पुरवठा अधिकारी यांना अनेक नोटिसा बजावल्या होत्या, तसेच सध्याच्या तहसीलदार यांनीदेखील त्यांना कारणे दाखवा नोटीस बजावली आहे.**

# 'नशामुक्त शहर' जनजागृती अभियानाला सुरुवात

## ● तरुणांना व्यसनमुक्त करण्यासाठी पोलीस प्रशासनाचा पुढाकार

| पनवेल | विशेष प्रतिनिधी |

युवक आणि समाजाला अमली पदार्थ, मद्य, तंबाखू तसेच इतर व्यसनांपासून दूर ठेवण्यासाठी कळंबोली पोलिसांकडून नशामुक्त शहर, कळंबोली या जनजागृती अभियानाचे आयोजन करण्यात आले आहे. सामाजिक बांधिलकी जपत व्यसनमुक्त समाज निर्माण करण्याच्या उद्देशाने हा उपक्रम राबविण्यात येत आहे.

या अभियानांतर्गत व्यसनमुक्तीबाबत मार्गदर्शन, समुपदेशन, माहितीपर कार्यक्रम तसेच युवकांचा सहभाग वाढविण्यासाठी विविध उपक्रम आयोजित करण्यात येणार आहेत. समाजातील प्रत्येक नागरिकाने या मोहिमेत सहभागी होऊन व्यसनमुक्त समाज घडविण्यास सहकार्य करावे, असे आवाहन आयोजकांकडून करण्यात आले आहे.

हा कार्यक्रम १६ मे रोजी सायंकाळी ७ वाजता रोडपाली येथे आयोजित करण्यात आला आहे. या अभियानाचे आयोजन वरिष्ठ पोलीस निरीक्षक राजेंद्र कोते आणि वरिष्ठ पोलीस निरीक्षक संदीप निगडे यांच्या मार्गदर्शनाखाली करण्यात येत आहे.

# विधायक कार्यकर्ता मेळावा

| नवीन पनवेल | प्रतिनिधी |

स्वर्गीय गोविंदराव शिंदे यांच्यासतराव्यास्मृतीदिनानिमित्त ग्राम स्वराज्य समिती महाराष्ट्र, भानघर, व्हाया शांतीवन पनवेल येथे रविवारी (दि.१७) सकाळी साडेदहा वाजता विधायक कार्यकर्ता मेळाव्याचे आयोजन करण्यात आले आहे.

यावेळी स्वर्गीय गोविंदराव शिंदे यांच्या कार्याचा स्मरण सोहळा तसेच मुक्त संवाद आणि सर्वोदय विचार मंथन होणार आहे. यावेळी गोविंदराव शिंदे स्मृती पुरस्कारदेखील देण्यात येणार आहे. या मेळाव्याला उपस्थित राहण्याचे आवाहन आयोजकांतर्फे करण्यात आले आहे.

# रोह्यात पेट्रोलचा तुटवडा



## ● पेट्रोल पंपावर ग्रहकांची तोबा गर्दी

| रोहा | प्रतिनिधी |

रोहा शहर व ग्रामीण भागात पेट्रोल डिझेलचा तुटवडा निर्माण झाल्याने वाहन चालक मालकांची प्रचंड गैरसोय होत आहे. काही पंप बंद आहेत, तर काही पंपावर ग्राहकांची तोबा गर्दी दिसून येत आहे.

इराण-अमेरिका युद्ध पेटवल्यानंतर इराण देशातून होणाऱ्या कच्च्या तेलाची वाहतूक बंद करण्यात आली. त्यामुळे देशभरात कच्च्या तेलाची टंचाई जाणवत आहे. भारताकडे असलेल्या कच्चा तेलाचा साठा मर्यादित काळापुरता असल्याने नुकताच देशाचे पंतप्रधान नरेंद मोदी यांनी तेलाचा वापर काटसरीने करण्याचे आवाहन केले. पंतप्रधान मोदी यांनी केलेल्या आवाहनानंतर देशभरात खळबळ उडाली आणि पेट्रोल पंपावर वाहन चालकांनी एकच गर्दी केली.

# देशभरात त्रुटीमुक्त मतदार यादीसाठी 'एसआयआर'

## ● महाराष्ट्रासह १६ राज्यांचा समावेश

| नवी दिल्ली | प्रतिनिधी |

निवडणूक आयोगाने मतदार यादी विशेष पुनरावलोकन प्रक्रियेचा तिसरा टप्पा देशभरात राबविण्याची घोषणा केली आहे. या टप्प्यात महाराष्ट्र, दिल्ली, पंजाब, कर्नाटक, तेलंगणा, आंध्र प्रदेश यांसह १६ राज्ये आणि तीन केंद्रशासित प्रदेशांचा समावेश करण्यात आला आहे.

निवडणूक आयोगाच्या माहितीनुसार, या टप्प्यात सुमारे ३.९४ लाख बूथ लेव्हल ऑफिसर घरोघरी जाऊन ३६.७३ कोटी मतदारांची पडताळणी करणार आहेत. तसेच विविध राजकीय पक्षांनी नियुक्त केलेले ३.४२ लाख बूथ लेव्हल एजंटदेखील या प्रक्रियेत सहभागी होणार आहेत.

जनगणनेंतर्गत सुरू असलेल्या घर सूची प्रक्रियेशी समन्वय साधण्यासाठी एसआयआरच्या तिसऱ्या टप्प्याचे वेळापत्रक निश्चित करण्यात आले आहे. जुलैच्या पहिल्या आठवड्यापासून विविध राज्यांमध्ये मसुदा मतदार याद्या प्रसिद्ध केल्या जाणार असून, सप्टेंबर ते डिसेंबर २०२६ दरम्यान अंतिम याद्या जाहीर करण्यात येतील. १ जुलै २०२६ पासून ओडिशा, मिझोराम, सिक्कीम आणि मणिपूरमध्ये प्रक्रिया सुरू होणार असून अंतिम मतदार यादी ६ सप्टेंबरला प्रसिद्ध होईल. तसेच आंध्र प्रदेश, अरुणाचल प्रदेश, हरियाणा आणि चंदीगडमध्ये प्रक्रिया सुरू होऊन अंतिम यादी २२ सप्टेंबर २०२६ रोजी जाहीर केली जाणार आहे.

दरम्यान, महाराष्ट्र, कर्नाटक, झारखंड, मेघालय आणि दिल्लीमध्ये १ ऑक्टोबर २०२६ पासून प्रक्रिया सुरू होईल. या राज्यांची अंतिम मतदार यादी ७ ऑक्टोबर २०२६ रोजी प्रसिद्ध केली जाणार आहे. तिसरा टप्पा पूर्ण झाल्यानंतर हिमाचल प्रदेश, जम्मू-काश्मीर आणि लडाख वगळता देशभरातील मतदार यादी पुनर्विलोकन प्रक्रिया पूर्ण होणार आहे. डोंगराळ आणि बर्फाच्छादित भागांतील हवामान परिस्थिती तसेच जनगणनेचा दुसरा टप्पा लक्षात घेऊन या तीन प्रदेशांचे वेळापत्रक नंतर जाहीर करण्यात येणार असल्याचे आयोगाने स्पष्ट केले आहे.

# रायगडातील पर्यटनाला चालना देण्यासाठी प्रयत्नशील : मंत्री देसाई

| मुंबई | प्रतिनिधी |



रायगड जिल्ह्यातील सुरू असलेल्या पर्यटनांच्या कामांना गती मिळावी याकरिता निधी उपलब्ध करून देण्यासाठी पर्यटन विभागाने कार्यवाही करावी, अशा सूचना पर्यटनमंत्री शंभूराज देसाई यांनी संबंधित अधिकाऱ्यांना दिल्या.

मेघदूत शासकीय निवासस्थान येथे रायगड लोकसभा मतदारसंघातील पर्यटन विभागाच्या कामासंदर्भात आयोजित बैठकीत पर्यटनमंत्री शंभूराज देसाई बोलत होते. यावेळी महिला व बालविकास मंत्री आदिती तटकरे, पर्यटन राज्यमंत्री इंद्रनील नाईक, खा. सुनील तटकरे, पर्यटन विभागाचे अपर मुख्य सचिव संजय खंदारे, महाराष्ट्र पर्यटन विकास मंडळाचे व्यवस्थापकीय संचालक निलेश गटणे यांसह रायगडचे जिल्हाधिकारी दृकश्राव्य प्रणालीव्दारे उपस्थित होते.

मंत्री शंभूराज देसाई म्हणाले की, रायगड जिल्हा पर्यटनदृष्ट्या अत्यंत महत्त्वाचा असून, जिल्ह्यातील पर्यटनाला चालना देण्यासाठी पर्यटनाची कामे गतीने करण्यात यावीत. प्रादेशिक पर्यटनमधील जी प्रलंबित कामे आहेत, त्याची सद्यः स्थिती काय आहे हे लक्षात घेऊन पर्यटन विभागाने वित्त विभागाकडे जिथे निधीची आवश्यकता आहे त्याची मागणी करावी.

पर्यटन विभागाची कामे करण्यासाठी उपलब्ध निधीतून कामांची प्राथमिकता लक्षात घेवून निधी देण्याबाबत सकारात्मक कार्यवाही करण्यात येईल. व तारांगण निरीक्षण (स्टार गेझिंग)चा प्रस्ताव मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्याकडे मान्यतेला पाठविण्यात येईल. महाराष्ट्र पर्यटन विकास महामंडळाचे निवासी न्याहारीचे नोंदणीचे कॅम्प आयोजित करण्यासाठी कार्यवाही करावी. स्वदेश दर्शन योजना प्रस्ताव लवकरात लवकर केंद्र शासनाकडे पाठवावा, असे निर्देश त्यांनी दिले.

# मुरुडमध्ये संगीत समारोहचे आयोजन

| आगरदांडा | प्रतिनिधी |

पै. खाँसाहेब आबीद हुसैन व कै. वामनराव (अण्णा) भावे यांच्या स्मरणार्थ रविवार, दि.१७ मे रोजी दुपारी ४ वा. भव्य संगीत समारोहचे आयोजन मुरुड येथील वसंतराव नाईक महाविद्यालयाच्या सभागृहात आयोजित करण्यात आले आहे.

या कार्यक्रमात अजय राऊत व पंडित अजय चक्रवर्ती यांच्या शिष्या अन्वेषा हलदार यांचे गायन तसेच संवादिनी वादक अनंत जोशी यांचे एकल संवादिनी वादन, तर चिन्मय लेले यांचे एकल तबला वादन होणार असून, तबला साथ अभय दातार यांची लाभणार आहे. या कार्यक्रमात यंदाचा गिरिजा कीर संगीतप्रेमी पुरस्कार अजय राऊत यांना प्रदान करण्यात येणार असल्याची माहिती अध्यक्ष मिलिंद गोखले व कार्यवाह डॉ. रवींद्र नामजोशी, मुरुड-जंजिरा यांनी दिली. तरी संगीत रसिकांनी या कार्यक्रमास आवर्जून उपस्थित राहावे, असे आवाहन केले आहे.

## ५९१ लाभार्थ्यांनी घेतला विविध योजनांचा लाभ | नागरिकांचा उत्स्फूर्त प्रतिसाद

# एकाच छताखाली महसुली सेवा

| नेरळ | प्रतिनिधी |

महसूल विभागाच्या वतीने नेरळ येथे आयोजित करण्यात आलेल्या 'छत्रपती शिवाजी महाराज महसूल समाधान शिबिरा'ला नागरिकांचा उत्स्फूर्त प्रतिसाद मिळाला. ग्रामीण भागातील नागरिकांना विविध शासकीय सेवा आणि दाखले एकाच ठिकाणी उपलब्ध करून देण्याच्या उद्देशाने आयोजित या शिबिरात तब्बल ५९१ लाभार्थ्यांनी सहभाग नोंदवला. अनेक नागरिकांना विविध दाखल्यांचे वाटप करण्यात आले, तर अनेकांच्या प्रलंबित कामांचा जागेवरच निपटारा करण्यात आला.



कर्जत तहसील कार्यालयांतर्गत महसूल मंडळ, नेरळ यांच्या वतीने नेरळ गावातील धारप सभागृहात या विशेष शिबिराचे आयोजन करण्यात आले होते. शिबिराचा शुभारंभ जिल्हा परिषद सदस्या सुनिता मोरे आणि कर्जत पंचायत समिती सदस्य भगवान चंचे यांच्या हस्ते छत्रपती शिवाजी महाराजांच्या प्रतिमेचे पूजन करून करण्यात आला.

यावेळी निवासी नायब तहसीलदार सचिन राऊत यांनी शिबिरामागील उद्देश स्पष्ट करताना ग्रामीण भागातील नागरिकांना शासकीय कार्यालयांचे उंबरठे झिजवावे लागू नयेत, यासाठी महसूल विभाग प्रयत्नशील असल्याचे सांगितले. रवींद्र दळवी, नितीन आटाळे, प्रथमेश मोरे, कुशाल राठोड, दभडे, गायकवाड यांच्यासह मंडळ अधिकारी विश्वास गडदे उपस्थित होते.

शिबिरामध्ये उत्पन्न, रहिवासी, जातीचे प्रमाणपत्र, नॉन-क्रीमीलेअर दाखले, डिजिटल स्वाक्षरीचे ७/१२ व ८-अ उतारे, शालेय व महाविद्यालयीन विद्यार्थ्यांसाठी विविध शैक्षणिक दाखले यांचे जागेवरच वाटप करण्यात आले. तसेच फेरफार प्रकरणे निकाली काढणे, ७/१२ मधील त्रुटी दुरुस्त करणे, तुकडेबंदी कायद्याशी संबंधित प्रकरणांचा निपटारा, ई-मोजणी अर्ज, 'ॲग्रीस्टॅक' व 'पीएम किसान' नोंदणी, सामाजिक अर्थसहाय्य योजना, घरपट्टे वाटप आणि अकृषिक परवानगी प्रकरणांबाबत मार्गदर्शन करण्यात आले.

### ५९१ अर्जांची शिबिरात नोंद

शिबिरात विविध विभागांकडे मोठ्या प्रमाणावर नोंदणी झाली. यामध्ये सेतू विभागात १६७, आधार कार्ड दुरुस्ती ९५, हयात प्रमाणपत्र ८५, आरोग्य विभाग ८३, ॲग्रीस्टॅक ५४, निवडणूक ओळखपत्र ३४, शिधापत्रिका २६, भूमी अभिलेख १९, जातीचे दाखले १४, आदिवासी दाखले ७, कृषी विभाग ६ आणि सलोखा योजना १ अशा एकूण ५९१ अर्जांची नोंद करण्यात आली.

कृषीवल
रायगड, शनिवार, दि. १६ मे २०२६
किंमत ४ ₹

## मांडवा-गेटवे प्रवासी जलवाहतूक २६ मेपासून बंद

**अलिबाग :** मांडवा-अलिबाग ते गेटवे ऑफ इंडिया ही प्रवासी जलवाहतूक मंगळवारपासून दि. २६ मे बंद करण्यात येणार आहे. ३१ ऑगस्टपर्यंत ही वाहतूक बंद राहणार आहे. महाराष्ट्र सागरी मंडळ अंतर्गत मांडवा बंदर कार्यालयाने पावसाळी हंगामात अंतर्गत जलवाहतुकीवर निर्बंध लागू करण्याचे आदेश जारी केले आहेत. खराब हवामानाच्या पार्श्वभूमीवर मांडवा ते गेटवे ऑफ इंडिया या मार्गावरील प्रवासी जलवाहतूक सेवा २६ मे ते ३१ ऑगस्ट २०२६ या कालावधीत बंद ठेवण्याचे निर्देश देण्यात आले आहेत. मांडवा बंदर निरीक्षक कार्यालयाकडून जारी करण्यात आलेल्या पत्रानुसार, महाराष्ट्र सागरी मंडळाचे मुख्य बंदर अधिकारी तसेच पान ५ वर

## कनकेश्वर फाटा मार्गावर जड वाहनांना बंदी

**अलिबाग :** रायगड पोलीस यांच्या पत्राच्या अनुषंगाने स्थानिक नागरिक व पर्यटकांचा प्रवास सुरक्षित आणि सुरळीत व्हावा, तसेच अपघात टाळण्यासाठी जिल्हाधिकारी किशन जावळे यांनी कार्लेखिंड ते कनकेश्वर फाटा (चॅम्पियन चौक) मार्गावर जड-अवजड वाहनांच्या वाहतुकीवर बंदी घालणारी अधिसूचना जारी केली आहे. सदर मार्गावरील रस्त्याचे काम पावसाळ्यापूर्वी नियोजित कालावधीत पूर्ण करण्याच्या उद्देशाने हा निर्णय घेण्यात आला असून, आदेशाच्या दिनांकापासून ३१ मे २०२६ पर्यंत सर्व प्रकारच्या जड-अवजड वाहनांची वाहतूक पूर्णतः बंद राहणार आहे. पान ५ वर

# मोर्चा रोखला, संताप वाढला

## सरकारची दडपशाही; जयंत पाटील यांना घेतले ताब्यात

- अवकाळीग्रस्तांच्या आक्रोशाला उत्तर नाही, पण आंदोलनकर्त्यांना ताब्यात घेण्यात सरकार तत्पर

**। मुंबई । प्रतिनिधी ।**

कोकणातील आंबा आणि काजू उत्पादक शेतकरी अवकाळी पावसाने पूर्णपणे उद्ध्वस्त झाले असताना त्यांच्या मदतीसाठी रस्त्यावर उतरलेल्या शेतकऱ्यांवरच सरकारने पोलिसी दडपशाही केल्याची धक्कादायक बाब शुक्रवारी (दि.१५) मुंबईत घडली. शेतकरी कामगार पक्षाच्या वतीने गिरगाव चौपाटी ते मुख्यमंत्री निवासस्थान वर्षा बंगला असा काढण्यात आलेला मोर्चा मुंबई पोलिसांनी अडवत शेकापचे सरचिटणीस तथा माजी आमदार जयंत पाटील यांच्यासह अनेक कार्यकर्त्यांना ताब्यात घेतले. त्यांना कप परेड पोलीस स्टेशन येथे नेण्यात आले.



याशिवाय शेकाप प्रवक्त्या चित्रलेखा पाटील, ज्येष्ठ नेते अनिल पाटील तसेच अन्य कार्यकर्ते मोठ्या संख्येने मोर्चात सहभागी होण्यासाठी अलिबागमधून मुंबईत दाखल झाले होते. मात्र पोलिसांनी दडपशाहीची भूमिका घेत त्यांना ताब्यात घेऊन कुलाबा पोलीस ठाण्यात नेले.

या घटनेमुळे शेतकरी कामगार पक्षाच्या कार्यकर्त्यांमध्ये संतापाची लाट उसळली असून, सरकार शेतकऱ्यांच्या प्रश्नांकडे दुर्लक्ष करत असल्याचा आरोप करण्यात येत आहे. आंदोलनकर्त्यांनी शेतकऱ्यांना न्याय द्या, नुकसानभरपाई तात्काळ द्या, हमीभाव मिळालाच पाहिजे, अशा घोषणा देत सरकारविरोधात जोरदार निदर्शने केली. कोकणातील अनेक भागांमध्ये अवकाळी पावसामुळे आंबा आणि काजू बागांचे प्रचंड नुकसान झाले आहे. अनेक शेतकऱ्यांच्या हातात आलेला हंगाम अक्षरशः वाहून गेला आहे. लाखो रुपयांची गुंतवणूक मातीमोल झाली पान ५ वर




### राजकीय नेत्यांना अडवले

या आंदोलनावेळी माजी खासदार राजू शेट्टी, माजी मंत्री महादेव जानकर, काँग्रेस प्रदेशाध्यक्ष हर्षवर्धन सपकाळ यांनाही आंदोलनस्थळी पोहोचण्यापूर्वीच रोखल्यामुळे राज्यातील राजकीय वातावरण तापले आहे. त्यामुळे सरकारच्या भूमिकेकडे लक्ष लागले आहे.

### आंदोलनकर्त्यांनी व्यक्त केला संताप

आंबा आणि काजू उत्पादकांचे संसार उद्ध्वस्त झाले आहेत. सरकारने तातडीने मदत जाहीर करायला हवी होती. पण इथे मदतीऐवजी पोलीस पाठवले जात आहेत. शेतकऱ्यांना न्याय मागण्याचाही अधिकार राहिला नाही का? असा सवाल उपस्थित आंदोलनकर्त्यांनी विचारला.

**वे|ध|क**

## सफाई कर्मचाऱ्याचा शॉक लागून मृत्यू

**रोहा :** डंपिंग ग्राऊंड परिसरात काम करत असताना विजेचा तीव्र शॉक लागून एका सफाई कामगाराचा दुर्दैवी मृत्यू झाल्याची धक्कादायक घटना घडली आहे. या घटनेमुळे कर्मचाऱ्यांमध्ये भीतीचे वातावरण पसरले असून, प्रशासनाच्या निष्काळजीपणा आणि सुस्त कारभारावर संतप्त प्रतिक्रिया उमटत आहेत. अशोक कुशा वाघमारे (४२, रा. चणेरा) असे मयत कर्मचाऱ्याचे नाव असून, या घटनेची माहिती पोलिसांना देण्यात आल्यानंतर पोलिसांनी तात्काळ घटनस्थळी धाव घेतली. मयत तरुण कामगाराची पत्नी रंजना वाघमारे यांनी पोलिसांत फिर्याद दिली असून, अशोक वाघमारे नियमितप्रमाणे डंपिंग ग्राऊंड परिसरात साफसफाई व मशीनमध्ये कचरा जाळण्याचे काम करत होता. पान ५ वर


## तटकरे राष्ट्रवादीचे प्रदेशाध्यक्ष नाहीत?

**मुंबई :** राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाच्या नवीन राष्ट्रीय कार्यकारिणीवरुन मोठा राजकीय गोंधळ निर्माण झाल्याचे चित्र आहे. केंद्रीय निवडणूक आयोगाला दिलेल्या कार्यकारणीच्या यादीत सुनील तटकरे यांचे नाव नसल्याने अनेकांच्या भुवया उंचवल्या असून, चर्चांना उधाण आले आहे. राष्ट्रवादी काँग्रेसच्या नवीन राष्ट्रीय कार्यकारिणीची यादी सध्या सोशल मीडियावर व्हायरल होत असताना एक मोठी अपडेट समोर आली आहे. खासदार सुनील तटकरे हे राष्ट्रवादीचे प्रदेशाध्यक्ष नसल्याच्या चर्चांना उधाण आले आहे. कारण, निवडणूक आयोगाला दिलेल्या पत्रात अद्याप सुधारणा करण्यात आलेली नाही, पान ५ वर

# उरणमध्ये 'जलजीवन'ची घागर उताणी

**। उरण । प्रतिनिधी ।**

उरण तालुक्यातील जनतेला भेडसावणारी पाण्याची समस्या दूर करण्यासाठी शासन स्तरावरुन रायगड जिल्हा परिषद व पंचायत समिती उरण यांच्या देखरेखीखाली जलजीवन मिशन अंतर्गत अनेक गावांमध्ये, आदिवासी वाडीवर योजना राबविण्याचा महत्त्वपूर्ण निर्णय घेण्यात आला आहे. परंतु, उरण तालुक्यातील जवळ-जवळ १५ ग्रामपंचायत हद्दीतील योजना या निधीअभावी धूळखात पडल्याचे भयानक वास्तव समोर येत आहे. त्यामुळे तालुक्यात 'जलजीवन'ची घागर उताणी पडली, अशी चर्चा जनमानसात आहे.



देशात उद्‌भवणारी पाण्याची समस्या दूर करण्यासाठी पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी हर घर नल योजना राबविण्याचा महत्त्वपूर्ण निर्णय १५ ऑगस्ट २०१९ मध्ये जलजीवन मिशन अंतर्गत शासन स्तरावरुन घेतला. मात्र, प्रशासनाच्या भ्रष्ट कारभारामुळे सदरच्या पान ५ वर

# इंधन दरवाढीचा भडका

## पेट्रोल ३.१४ रुपयांनी, तर डिझेल ३.११ रुपयांनी महागले

**। नवी दिल्ली । वृत्तसंस्था ।**

पश्चिम आशियातील युद्धामुळे देशातील पेट्रोल आणि डिझेलच्या दरात वाढ होईल, असे अंदाज आता खरे ठरले आहेत. शुक्रवारी सकाळी पेट्रोल आणि डिझेलच्या किमतींमध्ये वाढ करण्यात आली आहे. देशात पेट्रोलच्या किमतीत ३.१४ रुपयांची, तर डिझेलच्या किमतीत ३.११ रुपयांची वाढ करण्यात आली आहे. इंधन दरवाढीमुळे महागाईचा भडका उडणार असून, सर्वसामान्यांना मोठी झळ बसणार आहे.




दिल्लीत पेट्रोलचा दर प्रति लिटर ९७.७७ रुपये इतका झाला आहे. तर डिझेलचे दर वाढून ९०.६७ वर पोहोचले आहे. कोलकातामध्ये, पेट्रोलचा नवीन दर १०८.७४ रुपये आहे, तर डिझेलचे दर वाढून ९५.१३ रुपये झाले आहेत. देशाच्या आर्थिक राजधानीत मुंबईमध्ये, पेट्रोलचा नवीन दर १०६.६८ रुपये आहे. तर डिझेलचा दर ९३.१४ पोहोचला आहे. चेन्नईमध्ये, एक लिटर पेट्रोलचा दर १०३.६७ रुपये आहे. एक लिटर डिझेलचा दर वाढून ९५.२५ रुपये झाला आहे. पान ५ वर

## ॲड. पवन यादव याची हकालपट्टी

**मुंबई :** मंत्री नरहरी झिरवळ यांच्यासोबतच्या वादग्रस्त क्लिप मुळे झिरवळ यांना अडचणीत आणण्याचा प्रयत्न करणारा ॲड. पवन यादव याची तृतीयपंथीय हक्कांचे संरक्षण आणि व कल्याण मंडळावरून हकालपट्टी केली आहे. नरहरी झिरवळ यांचा विभाग प्रसिद्धीझोतात आहे. या कारणांमुळे झिरवळ याना अडचणीत आणण्याचे प्रयत्न केल्याचे बोलले जात आहे. शिंदे यांच्या पक्षासोबत संबंध असलेला पवन यादव या तृतीयपंथीयाला, तृतीयपंथीयांसाठी स्थापन झालेल्या तृतीयपंथीय हक्कांचे संरक्षण आणि व कल्याण मंडळावर अशासकीय सदस्य म्हणून नियुक्ती करण्यात आली होती.

# तरुणांसाठी रोजगाराची सुवर्णसंधी

- पीएनपी एज्युकेशन सोसायटी व आयईएसपीचा उपक्रम
- आज अलिबागमध्ये विशेष मार्गदर्शन मेळाव्याचे आयोजन

**। रायगड । जिल्हा प्रतिनिधी ।**

तरुणांना रोजगाराच्या नव्या संधी उपलब्ध करून देण्यासाठी पीएनपी एज्युकेशन सोसायटी आणि आयईएसपी यांच्या संयुक्त विद्यमाने उद्या शनिवारी (दि.१६) अलिबाग येथे विशेष रोजगार व करिअर मार्गदर्शन कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले आहे. अलिबागमधील पीएनपी नाट्यगृहात सायंकाळी ४.३० वाजता हा कार्यक्रम पार पडणार असून, विविध क्षेत्रातील तज्ज्ञ आणि प्रमुख मान्यवर उपस्थित राहणार आहेत.

वाढत्या बेरोजगारीच्या पार्श्वभूमीवर स्थानिक युवकांना रोजगाराच्या मुख्य प्रवाहात आणण्यासाठी शेकाप प्रवक्त्या तथा पीएनपी एज्युकेशन सोसायटीच्या कार्यवाह चित्रलेखा पाटील यांनी पुढाकार घेतला आहे. विशेषतः नवी मुंबई आंतरराष्ट्रीय विमानतळ उभारणीमुळे निर्माण होणाऱ्या रोजगाराच्या संधी स्थानिक तरुणांना मिळाव्यात, हा या उपक्रमामागील प्रमुख उद्देश आहे. या कार्यक्रमात विमानतळ क्षेत्रातील विविध नोकरीच्या संधींबाबत सविस्तर माहिती दिली जाणार आहे. अनुभवी तज्ज्ञांकडून करिअर मार्गदर्शन, काउन्सेलिंग, शंका निरसन, थेट मुलाखती व प्राथमिक निवड पान ५ वर

## एक्स्प्रेसवेवर अपघात; दोन ठार

**। खोपोली । प्रतिनिधी ।**

मुंबई-पुणे एक्स्प्रेसवेवर २ ट्रक आणि कंटेनर यांच्यात भीषण अपघात घडला. घडलेल्या अपघातात २ ठार आणि २ जण जखमी झाले. जखमींना कळंबोली येथील एमजीएम रुग्णालयात दाखल करण्यात आले आहे. मृत्यूमुखी पडलेल्या व जखमींची नावे अद्याप समजू शकली नाहीत. तीव्र उतारावर कलरचे डब्बे घेऊन जाणाऱ्या ट्रकचा ब्रेक फेल झाल्याने ढेकू गावानजिक हा अपघात घडला.या घटनेने द्रुतगती महामार्गावर एक तास वाहतूक ठप्प झाली होती. ट्रक आणि कंटेनर मधील अडकलेल्या प्रवाशांना बाहेर काढून पुढील उपचारासाठी एमजीएम रुग्णालयात दाखल करण्यात आले.




**समाजबांधवांत नाराजी | राष्ट्रीय आगरी आध्यात्मिक संमेलनात अनुपस्थिती**

# मुख्यमंत्र्यांनी फिरवली आगरी समाजाकडे पाठ?

**। पेण । प्रतिनिधी ।**

पेण येथे अखिल भारतीय आगरी सामाजिक संस्थेच्या वतीने आयोजित करण्यात आलेल्या राष्ट्रीय आगरी आध्यात्मिक संमेलनात मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस उपस्थित राहणार असल्याची जोरदार घोषणा करण्यात आली होती. शहरभर बॅनरबाजी, स्वागत फलक आणि प्रसिद्धी मोहिमेद्वारे मुख्यमंत्री येणार असल्याचे वातावरण तयार करण्यात आले होते. मात्र, प्रत्यक्ष कार्यक्रमाच्या दिवशी मुख्यमंत्री अनुपस्थित राहिल्याने आगरी समाजामध्ये नाराजीची भावना व्यक्त होत आहे.



"आमंत्रण दिले, प्रसिद्धी केली, अपेक्षा निर्माण केल्या; मात्र शेवटच्याक्षणीपाठफिरवली," अशा संतप्त प्रतिक्रिया समाजबांधवांतून उमटत असून, आगरी समाजाच्या भावना दुखावल्याची चर्चा आता पेण शहरात रंगू लागली आहे.

दरम्यान, पेण नगरपालिकेच्या वरच्या मैदानावर पार पडलेले राष्ट्रीय आगरी आध्यात्मिक संमेलन भक्ती, संस्कृती आणि समाजएकतेचा भव्य संगम ठरले. अखिल भारतीय आगरी सामाजिक संस्थेच्या आयोजनाखाली झालेल्या या सोहळ्यात हजारो समाजबांधव सहभागी झाले होते.

सकाळी भव्य आध्यात्मिक दिंडीने कार्यक्रमाची सुरुवात झाली. परमपूज्य सदानंद महाराज तुंगारेश्वर आणि पुरुषोत्तमानंद पुरी महास्वामी यांच्या उपस्थितीत टाळ-मृदंग, हरिनामाच्या गजरात पान ५ वर

# राखीव आणि बिनराखीव

अनुसूचित जाती-जमातींपैकी असलेल्या उमेदवारांना खुल्या वर्गातून नोकरी मिळणे आता सोपे राहणार नाही. वय, शैक्षणिक पात्रता, अनुभव, परीक्षेस बसण्याच्या संधी इत्यादींमध्ये मागास म्हणून सवलती घेतलेल्यांना स्पर्धा परीक्षांमधील खुल्या जागांवर दावा करता येणार नाही असा निर्णय राज्य मंत्रिमंडळाने गुरुवारी घेतला आहे. विविध प्रकारचे आरक्षण जवळपास ७२ ते ७५ टक्के पोचल्याने खुल्या वर्गातल्या जागा अतिशय मर्यादित झाल्या असून खुल्या वर्गातील कमी जागांवर स्पर्धा प्रचंड प्रमाणात वाढली आहे असे सरकारचे म्हणणे आहे. या स्पर्धेत मागास उमेदवारांची भर पडून ती आणखी तीव्र होऊ नये व खुल्या वर्गातील उमेदवारांवर अन्याय होऊ नये म्हणून हा निर्णय घेतला गेला आहे असा यामागचा युक्तिवाद आहे. या संदर्भात केंद्र सरकारच्या निर्णयाचा हवाला दिला गेला आहे. केंद्र व विविध राज्यांनी याबाबत आधीच तसे बदल केले आहेत. हा मुद्दा उच्च तसेच सर्वोच्च न्यायालय तसेच महाराष्ट्र प्रशासकीय प्राधिकरण अर्थात मॅट यामध्येही विविध प्रकारे यापूर्वी उपस्थित झाला व राज्य सरकारने याबाबत स्पष्ट नियम करावेत असे आदेश या न्यायसंस्थांनी दिले होते. त्यांना अनुसरूनच सरकारने हे धोरण घेतले असल्याचे सांगितले जात आहे. परीक्षा शुल्कातली सवलत वगळून अन्य कोणतीही मागासांसाठीची सवलत उमेदवारांनी आधीच्या टप्प्यात घेतली असेल तर त्यांना पुन्हा बदल करून खुल्या वर्गात येता येणार नाही असा याचा अर्थ आहे. या निर्णयामुळे राखीव जागांबाबतच्या चर्चेला नव्याने तोंड फुटणार आहे. या धोरणाचे समर्थक व विरोधक हे दोघेही हिरिरीने भांडणार आहेत. मात्र या संदर्भातील वस्तुस्थिती नीट तपासून पाहण्याची गरज आहे. एमपीएससी किंवा अन्य परिक्षांमध्ये असे प्रकार वारंवार घडत असल्याच्या तक्रारी होत्या. राखीव प्रवर्गातील उमेदवाराला खुल्या उमेदवारापेक्षा अधिक गुण असतील तर एमपीएससीक़डून राखीव प्रवर्गातील उमेदवाराची शिफारस पुढे केली जाते असा अनेकांचा अनुभव होता. याच मुद्द्यावरून खुल्या प्रवर्गातील उमेदवारांनी कोर्टात धाव घेतली होती.

### मागासांची गुणवत्ता

पण या तक्रारींमध्ये एक गंमतीदार विरोधाभास आहे. आजवर मागास जातीच्या उमेदवारांना अत्यंत कमी गुण असूनही केवळ जातीच्या आधारावर पुढे जायला मिळते व तथाकथित उच्च जातीयांवर अन्याय होतो अशी तक्रार हे उच्चजातीय लोक करीत असत. राखीव जागांच्या विरोधात याच वर्गातील तरुण आंदोलने करीत. मेरिट किंवा गुणवत्ता यांना अधिक प्राधान्य द्यायला हवे, जातीच्या आधारे संधी दिल्याने गुणवत्तेवर अन्याय होतो, सरकारी सेवांचा दर्जा खालावतो इत्यादी युक्तिवाद ते करीत असत. राखीव जागांवरून येणारे म्हणजे कंडम असा त्यामागचा दृष्टिकोन होता. पण आता खुल्या वर्गातील गुणवत्ता खालावलेली दिसते. मागास वर्गातील तरुणांना खुल्या वर्गापेक्षाही अधिक प्रमाणात गुण मिळतात व त्या आधारे त्यांच्या सर्रास नियुक्त्या होतात असे दिसते. म्हणूनच त्यांच्याविषयी कोर्टात जाण्यापर्यंत तक्रारी वाढल्या आहेत. एकेकाळी जातीपेक्षा गुणवत्ता मोठी असे म्हणणारे आता आपल्या तथाकथित उच्च जातींच्या स्वार्थापेक्षा गुणवत्ता मोठी नाही असे बजावू लागले आहेत हे नमूद करायला हवे. मागास जातींमध्ये गुणवत्ता नसते हे पूर्वीचे आपले म्हणणे ते स्वतःच या वागण्यामधून खोडून काढत आहेत हे लक्षात घ्यायला हवे. या प्रश्नात काही व्यावहारिक मुद्दे नक्कीच गुंतलेले आहेत. मागास जातीच्या उमेदवारांना इतरांहून अधिक वेळा तसेच वयोमर्यादा व काही वेळा पात्रता शिथील करून परीक्षा देण्याची संधी मिळत असते. त्याचा त्यांना फायदा होऊ शकतो. मागास प्रवर्गामध्ये जागा मर्यादित असतात. त्यामुळे परीक्षेत अधिक गुण मिळाले तर त्यांना आधी सवलती घेऊनही नंतर खुल्या वर्गात जाण्याची इच्छा होऊ शकते. मात्र तांत्रिकदृष्ट्या एकदा सवलती घेतल्यानंतर दुसऱ्या वर्गात जाणे हे योग्य नाही व त्यामुळे काही जणांना अन्याय झाल्यासाररखे नक्कीच वाटू शकते. मात्र अशांचे प्रमाण किती आहे व खुल्या वर्गातल्या किती जागा अशा रीतीने मागास उमेदवारांना दिल्या गेल्या याची आकडेवारी सरकारने पुढे आणली पाहिजे. यामुळे हे सरसकट चालले आहे व खुल्या वर्गातील लोकांवर फार मोठा अन्याय होतो आहे हा अपप्रचार रोखता येऊ शकेल. समजा असे प्रकार शेकड्याने वा हजारोंनी होत असतील तर मागास उमेदवारांना ते दाखवून देता येईल व जागा मर्यादित असल्याने असे नियंत्रण घालणे भाग पडते आहे हे त्यांना समजावून देता येईल.

### अन्याय होता कामा नये

राज्य सरकारने काल घेतलेला निर्णय अशी आकडेवारी न देताच घेतला आहे. राज्य मंत्रिमंडळाने यावर शिक्कामोर्तब करण्यापूर्वी अशी काही आकडेवारी तपासली असेल अशी आशा आहे. त्यांनी ती अजूनही जाहीर करावी, जेणेकरून सम ाजातील दोन वर्गांमध्ये अविश्वास व संशयाचे वातावरण निर्माण होणे टळेल. मात्र सरकारच्या या निर्णयाचे प्रत्यक्ष व्यवहारात काही गंभीर परिणाम होण्याची शक्यता आहे हेही इथे नोंदवायला हवे. मागासांना खुल्या वर्गातून नियुक्त्या न देण्याचा निर्णय सरकारने काल जाहीर केला असला तरी व्यवहारात प्रत्यक्षात तो आधीपासूनच अमलात आणला जातो हे उघड गुपित आहे. खुल्या वर्गातील जागांवर सवलती न घेतलेल्या मागास उमेदवारांनी अर्ज केला तरी त्यांना राखीव जागांमधून येण्याचा सल्ला दिला जातो किंवा कोणत्याही स्थितीत त्यांची निवड होणार नाही हे पाहिले जाते. शक्यतो मुलाखतींमध्ये त्यांना नापास करण्याचा प्रयत्न केला जातो. पण त्यांचे क्वालिफिकेशन व इतर गोष्टी सरस असतील तर इतर मार्गांनी त्यांना बाद ठरवण्याचा प्रयत्न केला जातो. अनेकदा खुल्या वर्गातून मागासांना घ्यायचे नाही असा नियम आधीच अस्तित्वात आहे असा खोटा दावा केला जातो. आता राज्य सरकारच्या या निर्णयामुळे कथित उच्चवर्णीयांच्या या कावेबाजपणाला बळ मिळणार आहे. आता सरकारनेच असे ठरवले आहे असे त्यांना सांगता येणार आहे. गोष्टी खरोखरच या नियमाप्रमाणे घडल्या तर कोणी तक्रार करणार नाही. मात्र आधी कोणत्याही सवलती न घेतलेले व खुल्या वर्गातून स्पर्धा करणारे उमेदवार निव्वळ मागास जातीतील आहेत म्हणून त्यांना द्वेषापोटी दडपण्याचे जे प्रकार घडतील ते कसे रोखणार हा खरा मुद्दा आहे. ते रोखण्यासाठी सरकारकडे कोणती यंत्रणा आहे असे वाटत नाही. या सरकारची एकूण मनोभूमिकाही राखीव जागांच्या विरोधातील आहे. कथित उच्च जातीयांचा त्यांना पाठिंबा आहे. शिवाय अनुसूचित जातींना दडपले जाते आहे हे पाहून काही वेळेला इतर मागास जातींचे अधिकारीही हेच अन्यायकारक धोरण राबवत असतात. त्यांना कसे थांबवणार हाही एक महत्वाचा सवाल आहे.

विचार

# शहरी परिवहन कात टाकतेय!

**भारताच्या शहरी परिवहन क्षेत्रात गेल्या दशकात लक्षणीय आणि संरचनात्मक बदल झाले आहेत. शहरांमधील वाढती लोकसंख्या, वाहतूक कोंडी आणि प्रदूषण यासारख्या समस्यांना तोंड देण्यासाठी मेट्रो रेल, 'आरआरटीएस' आणि इतर आधुनिक सार्वजनिक वाहतूकपर्याय महत्त्वाचे उपाय म्हणून पुढे आले आहेत. परिणामी, भारत आज जगातील तिसऱ्या क्रमांकाचे सर्वात मोठे मेट्रो नेटवर्क असलेले राष्ट्र बनले आहे.**

प्रा. सुखदेव बखळे

सध्या देशातील मेट्रो आणि प्रादेशिक जलद परिवहन प्रणाली (आरआरटीएस) नेटवर्कची एकूण लांबी एक हजार किलोमीटरपेक्षा अधिक झाली असून, हे नेटवर्क २४ शहरांमध्ये कार्यरत आहे. २०१४ मध्ये ही लांबी केवळ २४८ किलोमीटर होती. यावरून या क्षेत्रात झपाट्याने झालेली प्रगती स्पष्ट होते. दिल्ली मेट्रो हे सुमारे ३५० किलोमीटर लांबीचे सर्वात मोठे जाळे आहे, तर बंगळुरू मेट्रोनेही ७५ किलोमीटरचा टप्पा ओलांडला आहे. देशभरात दररोज सुमारे २.८ दशलक्ष प्रवासी या सेवांचा वापर करतात. याशिवाय, जवळपास ९७० किलोमीटर लांबीचे नवीन प्रकल्प सध्या विविध शहरांमध्ये बांधकामाधीन आहेत. त्यात दिल्ली-मेरठ 'आरआरटीएस कॉरिडॉर'चा सम ावेश आहे. या क्षेत्राच्या विस्तारात केंद्र सरकारचा वाढता पाठिंबा निर्णायक ठरला आहे. २०२५-२६ च्या केंद्रीय अर्थसंकल्पात मेट्रो प्रकल्पांसाठी ३४८.०७ अब्ज रुपयांची तरतूद करण्यात आली असून २०१३-१४ च्या तुलनेत ही रक्कम सहापट अधिक आहे. याशिवाय, आशियाई विकास बँक, जपान आंतरराष्ट्रीय सहकार संस्था, 'युरोपीयन इन्व्हेस्टमेंट बँक' आणि 'केएफटी' यासारख्या आंतरराष्ट्रीय वित्तीय संस्थांकडूनही महत्त्वपूर्ण निधी मिळत आहे. शहरी परिवहनात केवळ विस्तारच नव्हे, तर नव्या तंत्रज्ञानावर आधारित पर्यायांचाही उदय होत आहे. 'आरआरटीएस', 'वॉटर मेट्रो', 'मेट्रोनिओ' आणि 'मेट्रोलाइट' यासारख्या प्रणाली अधिक कार्यक्षम, किफायतशीर आणि पर्यावरणपूरक सेवा देण्याच्या दृष्टीने विकसित केल्या जात आहेत. दिल्ली-मेरठ दरम्यान विकसित होत असलेला 'नमो भारत आरआरटीएस कॉरिडॉर' हे त्याचे उत्तम उदाहरण आहे. या प्रकल्पातील गाड्या १६० किलोमीटर प्रतितास वेगाने धावू शकतात आणि सध्या सुमारे ५५ किलोमीटर मार्गावर सेवा सुरू आहे.

दरम्यान, केरळमधील कोची येथे देशातील पहिला 'वॉटर मेट्रो' प्रकल्प सुरू आहे. या प्रकल्पाद्वारे ७८ किलोमीटर मार्गावर दहा बेटांना इलेक्ट्रिक-हायब्रिड बोटींद्वारे जोडण्याचा उद्देश आहे. या उपक्रमाच्या यशानंतर देशातील २४ शहरांमध्ये जलआधारित परिवहनाच्या शक्यता तपासण्यासाठी तांत्रिक अभ्यासांना मंजुरी देण्यात आली. पर्यावरणीय शाश्वततेच्या दृष्टीनेही मेट्रो प्रकल्प महत्त्वाची पावले उचलत आहेत. एलईडी प्रकाशयोजना, सोलार पॅनेल्स, ऊर्जा कार्यक्षम कूलिंग प्रणाली आणि ग्रीन एनर्जीचा वापर यावर भर दिला जात आहे. सप्टेंबर २०२४ मध्ये 'एनसीआरटीसी'ने कमी दरात हरित ऊर्जा मि ळवण्यासाठी 'पॉवर ट्रेडिंग कॉर्पोरेशन'सोबत करार केला. तसेच फेब्रुवारी २०२५ मध्ये ओखला विहार मेट्रो स्थानकावर द्विमुखी सौर ऊर्जा प्रकल्प सुरू करण्यात आला. तो दोन्ही बाजूंनी सूर्यप्रकाश शोषून ऊर्जा निर्माण करतो. ऊर्जा कार्यक्षमतेसाठी पुनरुत्पादक ब्रेकिंग (रिजनरेटिव्ह ब्रेकिंग) तंत्रज्ञानाचाही वापर वाढत आहे. कोलकाता मेट्रोने हे तंत्रज्ञान आपल्या गाड्यांमध्ये लागू केले असून २०२४-२५ दरम्यान सुमारे १०.८ दशलक्ष युनिट ऊर्जेची बचत झाली आहे. यामुळे सुमारे ८२ दशलक्ष रुपयांची बचत आणि कार्बन उत्सर्जनात १३,५०० टन घट झाली आहे. दिल्ली मेट्रोच्या 'ब्लू लाईन'ला कार्बन-न्यूट्रल प्रमाणपत्र मिळणे, ही देखील या क्षेत्रातील प्रगतीची नोंद घेण्यासारखी बाब आहे. याशिवाय, इलेक्ट्रिक बस सेवेला चालना देण्यासाठी विविध योजना राबवण्यात येत आहेत.

'पीएम-ई-बस सेवा' योजनेअंतर्गत दहा हजार ई-बस तैनात करण्याचे उद्दिष्ट ठेवण्यात आले आहे. ऑगस्ट २०२५ पर्यंत सुमारे ७,३०० बस मंजूर झाल्या असून, त्यापैकी ६,५१८ बससाठी निविदा प्रक्रिया पूर्ण झाली आहे. तसेच, 'पीएम इलेक्ट्रिक ड्राईव्ह रिव्होल्युशन' योजनेअंतर्गत चार दशलक्षांपेक्षा अधिक लोकसंख्या असलेल्या नऊ शहरांमध्ये १४ हजारांहून अधिक ई-बसना प्रोत्साहन दिले जाणार आहे. अनेक राज्यांनीही ई-बसचा वापर वाढवण्यासाठी स्वतंत्र धोरणे आखली आहेत. एकूणच, भारतातील शहरी परिवहन क्षेत्र केवळ विस्ताराच्या टप्प्यावर नसून, ते अधिक स्मार्ट, पर्यावरणपूरक आणि प्रवासी-केंद्रित प्रणालीकडे वाटचाल करत आहे. वाढती गुंतवणूक, तांत्रिक नवकल्पना आणि शाश्वततेवर दिला जाणारा भर यामुळे भविष्यात हे क्षेत्र देशाच्या शहरी विकासाचा कणा ठरण्याची शक्यता अधिक बळकट झाली आहे. भारतातील मेट्रो रेल क्षेत्र केवळ विस्तारापुरते मर्यादित न राहता तांत्रिक प्रगती, स्वदेशीकरण आणि प्रवासी-केंद्रित सुधारणांच्या दिशेने वेगाने पुढे जात आहे. वाढती मागणी, शहरांमधील नेटवर्क विस्तार आणि आधुनिक तंत्रज्ञानाचा स्वीकार यामुळे या क्षेत्रात अनेक महत्त्वपूर्ण बदल घडत आहेत.

मेट्रो नेटवर्कच्या विस्तारासोबतच रोलिंग स्टॉक (गाड्या आणि संबंधित उपकरणे) या क्षेत्रातही सकारात्मक प्रगती दिसून येते. विशेषतः चालकविरहित गाड्यांचा वापर वेगाने वाढत आहे. दिल्ली मेट्रोच्या मॅजेंटा लाईनवर संपूर्णपणे अनअटेंडेड ट्रेन ऑपरेशन्स (युटीओ) सुरू झाले असून, पिंक लाईनवरही ही प्रणाली लागू केली जात आहे. यासोबतच, 'मेक इन इंडिया'च्या धोरणाअंतर्गत रोलिंग स्टॉकचे स्वदेशी उत्पादन वाढवण्यावर भर दिला जात आहे. धोरणानुसार किमान ७५ टक्के मेट्रो डबे आणि २५ टक्के म हत्त्वाची उपकरणे देशांतर्गत खरेदी करणे अपेक्षित आहे. या दिशेने अनेक प्रकल्पांनी पूर्णपणे भारतात तयार होणाऱ्या गाड्यांसाठी करार केले आहेत. बंगळुरू मेट्रोच्या 'यलो लाईन'ला शंभर टक्के स्वदेशी बनावटीची चालकविरहित ट्रेन मिळाली. ती 'टिटागढ रेल सिस्टीम्स'ने तयार केली आहे. तसेच, 'अल्स्टॉम ट्रान्सपोर्ट इंडिया लिमिटेड'ने दिल्ली मेट्रोच्या फेज चारसाठी 'मेट्रोपोलिस' प्रकारातील पहिली गाडी वितरित केली आहे. या गाड्या आंध्र प्रदेशम धील श्रीसिटी येथील प्रकल्पात तयार करण्यात आल्या असून 'ग्रेड ऑफ ऑटोमेशन ४' म्हणजे पूर्णपणे चालकविरहित तंत्रज्ञानाने सुसज्ज आहेत. सहा-डब्यांच्या एकूण ५२ गाड्या टप्प्याटप्प्याने दिल्लीत दाखल होणार आहेत. देशभरातील मेट्रो प्रकल्पांचे संचालन अधिक कार्यक्षम करण्यासाठी, प्रवासी अनुभव सुधारण्यासाठी आणि सुरक्षितता वाढवण्यासाठी आधुनिक तंत्रज्ञानाचा मोठ्या प्रमाणावर स्वीकार करण्यात आला आहे.

तिकीट व्यवस्था आणि भाडे संकलन प्रक्रियेत डिजिटल परिवर्तन दिसून येते. दिल्ली, कोलकाता आणि मुंबई मेट्रोच्या काही मार्गांवर क्यूआर कोड आधारित तिकीट प्रणाली सुरू करण्यात आली आहे. दिल्ली मेट्रोचे तिकीट आता उबर आणि रॅपिडोसारख्या कॅब ॲप्सवरूनही बुक करता येते. याशिवाय, 'नॅशनल कॉमन मोबिलिटी कार्ड' (एनसीएमसी) प्रणालीशी सुसंगतता वाढवण्यात येत आहे. मुंबई मेट्रोच्या 'ॲक्वा लाईन'वर आणि आग्रा मेट्रोवर ही सुविधा सुरू करण्यात आली. सिग्नलिंग आणि कम्युनिकेशन क्षेत्रातही अत्याधुनिक तंत्रज्ञानाचा वापर होत आहे. 'कम्युनिकेशन-बेस्ड ट्रेन कंट्रोल' (सीबीटीसी) प्रणालीमुळे माहितीचे अचूक आणि वेळेवर आदानप्रदान शक्य होते. मुंबई मेट्रोच्या ॲक्वा लाईनवर 'अरबॅलिस फॉरवर्ड' हे अत्याधुनिक 'सीबीटीसी' तंत्रज्ञान वापरले जात आहे. तसेच कानपूर मेट्रोच्या विस्तारित मार्गावरही स्वयंचलित ट्रेन ऑपरेशनसाठी 'सीबीटीसी' प्रणाली लागू करण्यात आली आहे. प्रवासी सुरक्षितता आणि सोयीसुविधा वाढवण्यासाठी विविध नावीन्यपूर्ण उपाययोजना राबवण्यात येत आहेत. प्लॅटफॉर्म स्क्रीन डोअर्समुळे अपघातांची शक्यता कमी झाली आहे. सर्व स्थानकांवर मोठ्या प्रमाणावर सीसीटीव्ही कॅमेरे बसवण्यात आले असून, आता कृत्रिम बुद्धिमत्ता (एआय) आधारित निगराणी प्रणालींचा वापर वाढत आहे. 'बंगळुरू मेट्रो रेल कॉर्पोरेशन लिमिटेड'ने सहा स्थानकांवर 'एआय-सक्षम सीसीटीव्ही' प्रणाली सुरू केली. या प्रणालीमुळे रिअल-टाइममध्ये धोके ओळखणे, संशयास्पद हालचालींचा मागोवा घेणे आणि वाहनांच्या नंबर प्लेटची ओळख पटवणे शक्य झाले आहे.

मेट्रो सेवेमध्ये ज्येष्ठ नागरिक आणि दिव्यांग व्यक्तींसाठी रॅम्प, टॅक्टाइल टाईल्स, ऑडिओ-व्हिज्युअल घोषणा यांसारख्या सुविधा उपलब्ध करून दिल्या जात आहेत. 'लास्ट-माईल कनेक्टिव्हिटी'वर विशेष भर दिला जात आहे. फीडर बस, टॅक्सी, ऑटो-रिक्षा आणि इलेक्ट्रिक वाहनांशी मेट्रोचे जाळे जोडले जात आहे. हैदराबाद मेट्रोसाठी 'ईव्हीझीप'ने इलेक्ट्रिक कार आणि महिला चालवत असलेल्या इलेक्ट्रिक दुचाकी सेवा सुरू केल्या. पुणे मेट्रोने 'टीएस स्वीच ई-राईड प्रा. लि.'सोबत ई-बाईक सेवेसाठी करार केला असून पहिल्या टप्प्यात दहा स्थानकांवर ही सुविधा उपलब्ध होणार आहे. तसेच 'एनसीआरटीसी' आणि दिल्ली ट्रान्सपोर्ट कॉर्पोरेशन यांनी न्यू अशोकनगर आणि आनंद विहार या 'नमो भारत' स्थानकांना जोडण्यासाठी वातानुकूलित इलेक्ट्रिक बस सेवा सुरू केली आहे. मेट्रो रेल प्रणाली भारतातील शहरी परिवहनाचा कणा बनत आहे. नेटवर्कचा विस्तार, ऊर्जा कार्यक्षमतेवर दिला जाणारा भर, डिजिटल तंत्रज्ञानाचा वाढता वापर आणि प्रवासी अनुभव सुधारण्यासाठी घेतलेले उपक्रम यामुळे या क्षेत्राने उल्लेखनीय प्रगती साधली आहे.

**(लेखक अर्थशास्त्राचे अभ्यासक आहेत.)**

चर्चा आजची

# पाण्यासाठीची वणवण कायमच

अंतरा पारंगे

रायगड जिल्हा टँकरमुक्त करण्यासाठी जिल्हा प्रशासनाने कोट्यवधींचे टंचाई आराखडे गेली १० वर्षांपासून बनवले आहेत. दरवर्षी या टंचाई आराखड्यातून संभाव्य टंचाईग्रस्त गावांना पाणीपुरवठा करण्याचे नियोजन केले जाते. तरीदेखील दरवर्षी रायगड जिल्हा टंचाईच्या झळा सोसत आला आहे. रायगड जिल्हा हा सरासरीपेक्षा अधिक पाऊस पडणारा जिल्हा म्हणून देखील ओळखला जातो. याच जिल्ह्यात पाणीपुरवठा करण्यासाठी अनेक धरणे बांधण्यात आली आहेत. जलसिंचन आराखड्यांपैकी काही धरणे प्रस्तावित देखील आहेत. प्रस्तावित धरणांचा विषय बाजूला सारला तर प्रत्यक्ष पाणीपुरवठा करणारी धरणे फेब्रुवारी संपताच तळ गाठताना दिसतात आणि याचा फटका रायगड जिल्ह्यातील जनतेला बसतो हे दरवर्षीचे पाणीनाट्य रायगडकरांसह प्रशासनाला देखील अनुभवण्यास मिळते. प्रशासन टंचाई कृती आराखडा मंजूर करते. त्याचा निधी देखील वितरीत केला जातो. हा निधी पाण्याचा टँकर, बोअरवेल, नळ पाणीपुरवठा योजना दुरूस्ती, विंधनविहीरी निर्मितीसाठी वापरला जातो असे कागदावर पहावयास मिळते. हा निधी या उपाययोजनांसाठी खऱ्या अर्थाने वापरला जात असेल तर गेल्या १० वर्षांचा कोट्यवधी रूपयांचा आराखडा निश्चितपणे जिल्ह्याला टँकरमुक्त करण्याएवढाच आहे हे अधोरेखित करावेसे वाटते.

दिवसेंदिवस उन्हाचे चटके वाढू लागले आहेत. परिणामी पाण्याची पातळी कमी होत चालली आहे. काही धरणांनी तळ गाठला आहे. तर काही धरणांमध्ये पाणीच नसल्याचे दिसून येत आहे. त्यामुळे पाण्याची भीषण टंचाई जाणवू लागली असून ग्रामीण भागात गाव-वाड्यांना टँकरवर अवलंबून राहावे लागत आहे. घोटभर पाण्यासाठी महिला व मुलांना पायपीट करावी लागत असल्याचे दिसून येत आहे.

रायगड जिल्ह्यातील अलिबागसह तेरा तालुक्यातील एक लाख पाच हजार ८६८ नागरिक पाणी टंचाईने त्रस्त झाले असून त्यांना पाण्यासाठी टँकर्सच्या प्रतिक्षेत रहावे लागत आहे. जिल्ह्यातील नागरिकांना मुबलक पाणी मिळावे, म्हणून शासनाकडून वेगवेगळ्या योजना राबविण्यात आल्या. परंतु, या योजनाही फेल ठरल्याचे चित्र या आकडेवारीनुसार स्पष्ट दिसून येत आहे. योजनांसाठी करोडो रुपयांचे खर्च करूनही याचा जनतेला काहीच फायदा झाला नसल्याच्या संतप्त प्रतिक्रीया नागरिकांमधून उमटत आहेत.

रायगड जिल्ह्यातील ग्रामीण भागाची साधारणतः लोकसंख्या १६ लाख ६४ हजार आहे. दोन हजारहून अधिक गावे, वाड्यांचा समावेश आहे. या गावांमध्ये प्रति ५५ लिटर माणसी पाण्यासाठी जलजीवनची योजना राबविण्यात आली. एकाच ठेकेदाराकडे पाच ते दहा योजनांची कामे देण्यात आली. मात्र, नियोजनाच्या अभावामुळे जलजीवनचे काम अपुर्ण स्थितीत राहिले. घरासमोर नवीन नळ कनेक्शन बसविण्यात आले. नागरिक सुखावून गेले होते. डोक्यावरील हंडा उतरणार या अपेक्षेने महिलाही आनंदी झाल्या होत्या. परंतु, ही योजनाही फेल ठरल्याची प्रतिक्रीया व्यक्त करण्यात येत आहे. करोडो रुपये खर्च करून गावागावात दोन वर्षापुर्वी जलजीवनची योजना सुरु करण्यात आली. मात्र, आजही शेकडो योजनांची कामे प्रलंबित आहेत. पाईप बसविण्यात आले आहेत, तर पाण्याची टाकी नाही. योजनांची कामे पूर्ण आहेत, तर नळाला पाणी नाही, अशी अवस्था निर्माण झाल्याचे दिसून येत आहे.

धरणांमधील पाण्याची पातळी कमी होऊ लागली आहे. निदान पावसाळा सुरु होईपर्यंत धरणांमध्ये पाणी शिल्लक राहवे, यासाठी अनेक गावांमध्ये दोन ते तीन दिवस आड पाणी पुरवठा केला आहे. त्यामुळे ग्रामीण भागातील नागरिकांचे प्रचंड हाल सुरु झाले आहेत.

जिल्ह्यात सध्या लग्नसराईचा हंगाम सुरु झाला आहे. धार्मिक कार्यक्रमांसह उत्सव व लग्नसोहळे अनेक गावे, वाड्यांमध्ये सुरू आहेत. उन्हाळी सुट्टी पडल्याने मुंबई, पुणे, बोरीवली, ठाणे येथील चाकरमानीदेखील गावी सुट्टीचा आनंद लुटण्यासाठी आले आहेत. मात्र गावे, वाड्यांमध्ये पाणी नसल्याने स्थानिकांसह चाकरमान्यांकडून प्रशासनाच्या कारभाराबाबत तीव्र नाराजी व्यक्त केली जात आहे. पाण्यासाठी अनेक गावांतील नागरिकांना दोन ते तीन किलोमीटर पायपीट करावी लागत आहे. रायगड जिल्हयात केंद्र पुरस्कृत जलजीवन योजनेसह राज्याच्या अनेक पाण्याच्या योजना राबविण्यात आल्या. घरोघरी नळ देण्याच्या जाहीरातबाजीदेखील मोठ्या प्रमाणात करण्यात आल्या. मात्र प्रशासनासह शासन मुबलक पाणी देण्यास पुर्णपणे अपयशी ठरल्याचे चित्र दिसून येत आहे. मागील आठवड्यात ८७ हजार नागरिकांसाठी ५० टँकर्स होते. आता या टँकर्समध्ये दहाने वाढ होऊन तो आकडा साठवर पोहचला आहे. टँकरच्या आकडेवारीनुसार प्रशासनची टँकरमुक्तीची घोषणा फक्त कागदावर असल्याचे स्पष्ट दिसून येत आहे. रायगड जिल्ह्यात दिवसेंदिवस वाढत चाललेली भीषण पाणीटंचाई हा चिंतेचा विषय बनला आहे. या गंभीर परिस्थितीमागे मोठ्या प्रमाणावर होत असलेली वृक्षतोड हेदेखील एक प्रमुख कारण असल्याचे पर्यावरण अभ्यासक आणि स्थानिक नागरिकांकडून सांगितले जात आहे. अनेक ग्रामीण भागांमध्ये उन्हाळा सुरू होताच पाण्याचे संकट तीव्र होत असल्याचे चित्र पाहायला मिळत आहे. जंगलतोडीमुळे भूजल पातळी घटून उन्हाळ्यात पाणी टंचाई तीव्र होते. अनेक गावांतील विहिरी, बोअरवेल, ओढे आणि नैसर्गिक जलस्रोत उन्हाळ्याच्या सुरुवातीलाच आटत असल्याने ग्रामस्थांना पिण्याच्या पाण्यासाठी मोठी पायपीट करावी लागत आहे. गेल्या काही वर्षांत विकासकामे, रस्ते, बांधकामे आणि विविध प्रकल्पांच्या नावाखाली पर्यावरणाचा समतोल बिघडत चालला आहे आणि त्याचा थेट परिणाम भूजल साठ्यावर होत आहे. पूर्वी वर्षभर पाण्याने भरलेल्या विहिरी आता उन्हाळ्यात कोरड्या पडू लागल्या आहेत. त्यामुळे मार्च महिन्याच्या सुरुवातीपासूनच टँकर मागवण्याची वेळ नागरिकांवर येत आहे. काही धरणांच्या परिसरात पाणी शुद्धीकरण केंद्र नाहीत. परिणामी, मातीमिश्रित पाणी पिण्याची वेळ नागरिकांवर येत आहे. त्यामुळे नागरिकांच्या आरोग्याचा प्रश्न निर्माण होत आहे. शुद्ध पाण्यासाठी विकतचे पाणी आणावे लागत असून सर्वसामान्यांना आर्थिक भुर्दंड बसत आहे.

लोकसंसद

## समाजाला 'आनंद' देणारा 'चिकित्सक'

मुंबईतील इन्स्टिट्यूट ऑफ सायकॉलॉजी या संस्थेचे संस्थापक आणि प्रसिद्ध मानसोपचार चिकित्सक, लेखक, वक्ते व सामाजिक विचारवंत डॉ.आनंद नाडकर्णी यांनी मानसिक आरोग्याविषयी जनजागृती करण्यासाठी अतिशय मोलाचे कार्य केले आहे. विशेष म्हणजे, मराठी आणि इंग्रजी माध्यमांतून त्यांनी सामान्य लोकांपर्यंत मानसिक स्वास्थ्याचे महत्त्व अत्यंत सोप्या भाषेत पोहोचवले.मानसिक आरोग्य, समुपदेशन, व्यसनमुक्ती आणि व्यक्तिमत्त्व विकास या विषयांवर डॉ. नाडकर्णी यांनी अनेक पुस्तके लिहिली आहेत. त्यांच्या लेखनाची शैली साधी, विचारप्रवर्तक आणि जीवनाशी निगडित आहे. मानसिक आरोग्य, नाती, आनंदी जीवन आणि आत्मपरीक्षण या विषयांवर त्यांचे विशेष लेखन आहे. विद्यार्थी, पालक आणि शिक्षकांसाठी त्यांनी नियमित मार्गदर्शन केले. माध्यमांमधून आणि सार्वजनिक व्याख्यानांतून त्यांनी मानसिक स्वास्थ्याबद्दल जागरूकता निर्माण केली.तसेच मानसिक आजारांविषयी समाजात असलेले गैरसमज दूर करण्यासाठी त्यांनी अनेक मोहिमा राबवल्या. समाजाचे मनोबल सुदृढ करण्याचे मोलाचे कार्य डॉ. आनंद नाडकर्णी यांनी केले आहे. त्यांची मांडणी वैज्ञानिक असूनही भावनिक आणि मानवी मूल्यांना स्पर्श करणारी असल्यामुळे सामान्य वाचक आणि तरुणांमध्ये त्यांचे विशेष लोकप्रिय स्थान आहे. आज सोशल मीडियाच्या वाढत्या प्रभावामुळे तरुण पिढी भरकटताना दिसत आहे. वैज्ञानिक दृष्टिकोन आणि भावनिक संवेदनशीलता यांची सुंदर सांगड घालणाऱ्या डॉ. आनंद नाडकर्णी यांसारख्या मानसोपचारतज्ज्ञांची समाजाला आज खऱ्या अर्थाने गरज आहे. आपल्या कार्यातून समाजाला ''आनंद'' देणाऱ्या डॉ.नाडकर्णी यांचे ऋण कधीही फेडता येणार नाही.

**- दत्तप्रसाद शिरोडकर, मुंबई**

दिनविशेष

# आधुनिक भास्कराचार्य केरुनाना छत्रे



विनायक लक्ष्मण ऊर्फ केरुनाना लक्ष्मण छत्रे यांचा आज स्मृतिदिन. केरुनाना छत्रे हे आद्य गणिती, आधुनिक भास्कराचार्य होते. त्यांचा जन्म १६ मे १८२५ रोजी अलिबागमधील नागाव या गावी झाला. प्राचीन भारतीय तसेच आधुनिक गणित व खगोलशास्त्र यांचे निस्सीम उपासक म्हणजे केरुनाना छत्रे. आई-वडिलांना बालपणीच अंतरल्याने त्यांना शिक्षणासाठी मुंबईस चुलत्याकडे यावे लागले. त्यांच्यामुळेच केरुनानांना वाचनाची गोडी व कोणत्याही प्रश्नाकडे वस्तुनिष्ठ दृष्टीने पाहण्याची सवय लागली. उत्तरायुष्यात केरुनानांनी गणितात संपादन केलेल्या लौकिकाची चाहूल त्यांच्या विद्यार्थी जीवनातच दिसू लागली होती. विशेषत: गणित, खगोल आणि पदार्थविज्ञानासारख्या कठीण शास्त्रात त्यांना पुढे जी गती प्राप्त झाली. त्याच्या जोरावर केरुनानांनी प्रगल्भ ग्रंथांचे परिशीलन करून या विषयांवर घट्ट पकड बसण्याएवढे त्यातले प्रगत ज्ञान प्राप्त केले. मुंबईस कुलाबा दांडीवर अंतरिक्ष चमत्कार व लोहचुंबक यांचे अनुभव घेण्यासाठी १८४० मध्ये प्रो. आर्लिबार यांनी एक वेधशाळा काढली. तिथे केरुनानांची असिस्टंटच्या जागी नेमणूक करण्यात आली.

अवघ्या १५ व्या वर्षी द.म. ५० रु. पगारावर मिळालेल्या या नोकरीत नानांनी पुढली १० वर्ष जागरुकपणे हवामानशास्त्राचे प्रशिक्षणच घेतले. १८५१ पासून मात्र पुणे कॉलेजचे नॉर्मल स्कूल, पुढे ट्रेनिंग कॉलेज आणि अहमदनगरच्या इंग्रजी शाळेचे हेडमास्तर अशा सरकारी संस्थांतून त्यांच्या बदल्या झाल्या. या प्रत्येक ठिकाणी गणित, सृष्टिशास्त्र व पदार्थविज्ञान हेच विषय ते जरुरीप्रम ाणे इंग्रजी व मराठीत सराईतपणे शिकवीत असत. दरम्यान, त्यांनी इंजिनीअरिंग कॉलेजातसुद्धा सृष्टीशास्त्रावर व्याख्याने दिली. मुलांना समजेल अशा सोप्या रीतीने शिकविण्याची त्यांची हातोटी त्यांच्या अनेक विद्यार्थ्यांनी वाखाणलेली आहे. गणिताशिवाय विद्यार्थ्यांना इतर शास्त्रांचे थोडेबहुत ज्ञान देण्यावर त्यांचा कटाक्ष असे. विद्यार्थ्याने केव्हाही- कुठेही शंका विचारली तरी ते हसत-खेळत हरप्रयत्नाने तिची उकल करीत असत. केरुनानांनी लक्ष घातलेला आणखी एक विषय म्हणजे पंचांग शुद्धीकरणाचा. आपल्या सूक्ष्म अभ्यासाने त्यांच्या असे लक्षात आले की, परंपरागत पंचांगात केलेले अशुद्ध गणित व घेतलेली ग्रहस्थितींची स्थूलमाने या चुकांमुळे ऋतुकाल तसेच पंचांगात दाखवलेल्या ग्रहस्थितीचा प्रत्यक्षातल्या ग्रहस्थितीशी मेळ बसत नाही. वेधशाळेतील नोकरीमुळे ग्रहांचे वेध घेण्याची कला त्यांना अवगत होती. केरुनानांच्या पुरोगामी विचारसरणीचे द्योतक म्हणजे स्त्रियांच्या सामाजिक सुधारणेस त्यांचा पाठिंबा होता. शिवाय ते मुलींच्या शाळेच्या व्यवस्थापक मंडळावर होते, श्रीमती रमाबाई रानडे यांच्या प्रेरणेने भरणाऱ्या स्त्रियांच्या सभांना हजर राहून त्यांचे शिक्षण करत. स्त्रियांना जड विषयांऐवजी गृहजीवनोपयोगी शिक्षण देण्याच्या मताचे ते होते. मात्र गहन विषयांच्या व्यासंगात गढलेल्या केरुनानांना शास्त्रीय संगीत, संगीत नाटके व स्वत: पियानो वाजवण्याची आवड होती. शिवाय किर्लोस्कर नाटक मंडळीत त्यांचा राबता होता. फार काय नाटकांच्या तालमींना हजर राहून ते मोरोबा वाघोलीकर आणि बाळकोबा नाटेकर या गायक नटांना गाण्याच्या अतिरेकानं नाटकाचा रसभंग होतो, असा सल्ला देत असत. त्यांच्या या गुणांवर लुब्ध होऊन अण्णासाहेब किर्लोस्करांनी आपले ङ्गसौभद्रफ हे नाटक त्यांना अर्पण केलेलं आहे. अशा या थोर आधुनिक भास्कराचार्यांचे १९ मार्च १८८४ रोजी निधन झाले.

## कृषीवलच्या वाचकांना आवाहन




अलिबाग येथील श्री कच्छी जैन भवन चॅरिटेबल ट्रस्टच्या वतीने अन्नदानासाठी एक अभिनव योजना आखली आहे.जिल्हा रुग्णालयात दाखल असलेल्या रुग्णांच्या एका नातेवाईकाला जेवणाची सोय करण्यात आली आहे. या योजनेत दररोज किमान ७०/८० लोक जेवत असतात. या जेवणाचा खर्च प्रति दिवस रु. ३००० असून ही देणगी देणाऱ्याचा फोटो कृषीवलमध्ये छापला जाईल. तरी जास्तीत जास्त लोकांनी अन्नदान सेवेचा लाभ घेऊन या सामाजिक उपक्रमात सहभागी व्हावे असे आवाहन कृषीवल करीत आहे.
संपर्क- ८०५५३२५६७८ (बीपीन राठवा) ९२२६०५५१५५ (अमित शहानंद)
- मुख्य संपादक, कृषीवल

आजचे अन्नदाते



कु. मुग्धा संजय पाटील, वाढदिवस, यू एस ए


## शाहू महाराजांचा स्मृतिदिन साजरा

**खारघर :** पंचशील बुद्ध विहारात छ. राजर्षी शाहू महाराज यांचा १०४वा स्मृतिदिन व्याख्यान व ग्रंथप्रदर्शनाने साजरा झाला. डॉ. अरुण सुखाडेंनी शाहू महाराजांचे सामाजिक कार्य व डॉ. बाबासाहेब आंबेडकरांशी असलेले संबंध यावर मार्गदर्शन केले. अशोक शेलारे व एकनाथ ढंगारे यांनीही मनोगत व्यक्त केले. यावेळी एल.डी., प्रकाश तायडे, उत्तम मुगदल, राजेंद्र मानवतकर, रवी बोरकर, राजेंद्र गायकवाड, बौद्धाचार्य हिरामण थोरात यांच्यासह अनेक उपासक उपस्थित होते.

# काँक्रिटीकरणाला स्थानिकांचा विरोध

## ● कशेळे ग्रामीण रुग्णालयासमोर बगीचा बनविण्याची मागणी

। नेरळ । प्रतिनिधी ।

कर्जत तालुक्यातील कशेळे येथील ग्रामीण रुग्णालयाच्या दुरुस्तीचे काम सध्या वेगाने सुरू आहे. या दुरुस्तीदरम्यान रुग्णालयाच्या दर्शनी भागातील जुनी इमारत पाडून ती जागा मोकळी करण्यात आली आहे. या विस्तीर्ण जागेवर काँक्रिटीकरण केले जात असल्याने स्थानिक ग्रामस्थांनी या ठिकाणी काँक्रिटीकरण रद्द करून रुग्णांच्या आणि ग्रामस्थांच्या सुविधेसाठी सुंदर बगीचा बनवावा, अशी मागणी केली आहे.

कशेळे ग्रामीण रुग्णालयाच्या समोरील बाजूस असलेली जुनी इमारत हटवल्यानंतर तिथे मोठी मोकळी जागा उपलब्ध झाली आहे. या जागेचा वापर परिसराच्या सुशोभीकरणासाठी आणि पर्यावरणपूरक कामासाठी करणे अपेक्षित होते. मात्र, सध्या तिथे सिमेंटचे काँक्रिटीकरण करण्याचे काम हाती घेण्यात आले आहे. आधीच उन्हाचा पारा चाळीशी पार



गेला असून, सर्वसामान्य जनता कमालीच्या उष्णतेने त्रस्त आहे. अशा परिस्थितीत शहरांपासून गावांपर्यंत होणाऱ्या अमर्याद काँक्रिटीकरणामुळे जमिनीची उष्णता अधिकच वाढत असून पर्यावरणाची मोठी हानी होत आहे, याकडे स्थानिक जागरूक ग्रामस्थांनी लक्ष वेधले आहे.

कशेळे ग्रामीण रुग्णालयाच्या आवारात काँक्रिटीकरणामुळे उष्णता अधिक वाढणार आहे. त्याऐवजी जर इथे वृक्षारोपण करून सुंदर गार्डन विकसित केले, तर रुग्णालयात उपचारासाठी येणारे रुग्ण आणि त्यांच्यासोबत असणारे नातेवाईक यांना झाडांच्या सावलीत, शांत वातावरणात बसता येईल. निसर्गाच्या सानिध्यात राहिल्याने रुग्णांनाही मानसिक दिलासा मिळेल. त्यामुळे प्रशासनाने जिथे जिथे शक्य आहे, तिथे काँक्रिटीकरण टाळून झाडे लावायला हवीत, अशी मागणी स्थानिक नागरिक राजेंद्र हरपुडे यांनी केली आहे.

दरम्यान, रुग्णालयाच्या रुग्णवाहिकेला येण्या-जाण्यासाठी आणि पार्किंगसाठी आवश्यक तेवढ्याच मर्यादित जागेत काँक्रिटीकरण करावे. उर्वरित संपूर्ण विस्तीर्ण जागेत माती टाकून लॉन, फुलझाडे व सावली देणारी मोठी झाडे लावून प्रशासनाने स्वतः एक आदर्श निर्माण करावा, असे ग्रामस्थांचे म्हणणे आहे.

त्यामुळे कशेळे ग्रामीण रुग्णालयातील काँक्रिटीकरणाचे काम तात्काळ थांबवून तिथे तात्काळ गार्डन उभारण्यात यावे, अशी मागणी पुढे आली आहे.

सध्या शासकीय पातळीवर झाडे लावा, झाडे जगवा असा संदेश मोठ्या प्रमाणावर दिला जातो. या रुग्णालयाच्या आवारात झाडे लावल्यास रुग्णालयाच्या सौंदर्यात भर पडेल आणि पर्यावरण संवर्धनालाही हातभार लागेल.

# चिरनेर गावात अवतरली शिवसृष्टी

## ● धर्मवीर छ. संभाजी महाराजांच्या पराक्रमाला मानाचा मुजरा

। चिरनेर । प्रतिनिधी ।

उरण तालुक्यातील ऐतिहासिक वारसा लाभलेल्या चिरनेर गावात गुरुवारी (दि.१४) धर्मवीर छत्रपती संभाजी महाराजांची ३६९ वी जयंती येथील छावा प्रतिष्ठानच्या वतीने साजरी करण्यात आली. ऐतिहासिक शिव थाटात साजऱ्या करण्यात आलेल्या धर्मवीर छत्रपती संभाजी महाराजांच्या जयंतीला शिवकालीन स्वरूप प्राप्त झाले होते. त्यामुळे चिरनेर गावात जणू शिवसृष्टी अवतरली होती. यावेळी शंभूराजांच्या पराक्रमाला मानाचा मुजरा करण्यात आला. धर्मवीर शंभूराजांच्या जयंतीच्या सोहळ्याने सर्वांचेच लक्ष वेधून घेतले होते.

आरंभी छत्रपती शंभुराजांच्या प्रतिमेचे विधिवत पूजन करण्यात आले. त्यानंतर श्री सत्यनारायणाची महापूजा आणि सायंकाळी महाप्रसादाचे आयोजन करण्यात आले होते. यावेळी उपस्थित



मान्यवरांचा यथोचित सन्मान करण्यात आला. दरम्यान धर्मवीर छत्रपती संभाजी महाराजांच्या प्रतिमेची भव्य पालखी मिरवणूक काढण्यात आली. मिरवणुकीच्या माध्यमातून शंभूराजांचा पराक्रम व इतिहास साकारण्यात आला होता. शिवकालीन वेशभूषा परिधान करून मिरवणुकीत सहभागी झालेल्या तरुण-तरुणी, बच्चे कंपनी आणि महिला पुरुषांमध्ये यावेळी उत्साह संचारला होता. ‘छत्रपती शिवाजी महाराज की जय’ आणि ‘छत्रपती संभाजी महाराज की जय’ या जयघोषांनी चिरनेर गावातील वातावरण दुमदुमून गेले होते.

या मिरवणुकीत छत्रपती शिवाजी महाराज, छत्रपती संभाजी महाराज, राजमाता जिजाबाई, महाराणी येसूबाई या महान स्त्री-पुरुषांच्या साकारलेल्या व्यक्तिरेखा दिसून येत होत्या. मिरवणुकीत अश्व नृत्याचा थरारही पाहायला मिळाला. त्याचबरोबर ढोल ताशा, फेट्यांचा थाट, महिला लेझीम पथकाची प्रात्यक्षिके यावेळी पाहायला मिळाली.

## जनाबाई धुमाळ यांचे निधन



**रसायनी :** पलस्पे गावचे बाळा धुमाळ यांच्या धर्मपत्नी जनाबाई यांचे बुधवारी (दि.१३) वयाच्या ५३ व्या वर्षी अल्पशा आजाराने निधन झाले. त्यांच्या पश्चात पती बाळाराम धुमाळ, मुलगा हर्षद धुमाळ, दोन मुली राणी व वर्षा, जावई, नातवंड, भाऊ, बहीण तसेच धुमाळ व केदारी परिवार आहे. त्यांच्या अंत्ययात्रेस प्रचंड जनसमुदाय उपस्थित होता. त्यांचा निधनाने सावळे गावच्या मामा परिवारावर व पळस्पे गावावर शोककळा पसरली आहे. त्यांचे दशक्रिया विधी शुक्रवार दि.२२ मे रोजी श्री क्षेत्र उद्धर रामेश्वर येथे तर उत्तरकार्य सोमवार दि.२५ मे रोजी त्यांच्या राहत्या घरी होणार आहेत.

# फार्मर कप स्पर्धेविषयी शेतकऱ्यांना मार्गदर्शन

। चिरनेर । प्रतिनिधी ।

पानी फाउंडेशनतर्फे तालुका स्तरीय खरीप हंगाम नियोजन व पूर्व तयारीचा आराखडा आणि अनुभवांची देवाण-घेवाण तसेच फार्मर कप स्पर्धेविषयी गटातील शेतकऱ्यांना विशेष मार्गदर्शन करण्यात आले. या संदर्भात गुरुवारी (दि.१४) चिरनेर येथील निकीदीप या नर्सरीमध्ये पानी फाउंडेशनचे आशिष लाड यांच्या प्रमुख उपस्थितीत चिरनेर येथील सुजलाम शेतकरी गटाची विशेष बैठक पार पडली.

कृषी सहाय्यक अधिकारी सुषमा गायकवाड यांनी प्रास्ताविकेतून खरीप हंगामाविषयी तसेच फार्मर कप स्पर्धेविषयी व शेतकरी गट बांधणीविषयी आपल्या मार्गदर्शनातून विशेष आढावा घेतला. त्यानंतर त्यांनी चिरनेर गावातील शेतकऱ्यांची गट बांधणी करून घेतली. एकत्र निविष्ठा खरेदी, मूल्य संवर्धन, जमिनीची सुपीकता याविषयी त्यांनी यावेळी माहिती दिली. तर पानी फाउंडेशनचे आशिष लाड यांनी जमिनीची सुपीकता, आणि भात लागवड ही पारंपरिक पद्धतीपेक्षा वेगळी असावी. यात भाताची रोपे ठराविक अंतरावर लावली जावीत. दोन ओळींचे अंतर १५/२० असे असावे. यात दोन रोपातले अंतर १५ सेंटीमीटर व २५ सेंटीमीटर असावे, असे स्पष्ट केले. भात रोपांना पुरेसा सूर्यप्रकाश मिळायला पाहिजे. तसेच हिरवळीच्या खतांचा वापर करावा. यातून पुरेसे अन्नद्रव्य मिळून उत्पादनात चांगली वाढ होते. कामगंध सापळ्यांचा वापर, प्रकाश सापळ्यांचा वापर, चिकट सापळे, पिवळे चिकट सापळे, निळे चिकट सापळे तसेच प्रमाणित सुधारित संकरित हायब्रीड भात बियांची निवड करावी. पेरणीची तारीख व पीक काढणीपर्यंत आराखडा असावा. जैविक व कीटकनाशकांचा वापर, मातीचे नमुने काढणे, विमा काढणे, रोपवाटिका व्यवस्थापन तसेच भात लागवड पद्धतीविषयी माहिती दिली. तसेच, यावेळी गटातील शेतकऱ्यांनी विचारलेल्या प्रश्नांची उत्तरेदेखील त्यांनी दिली. कृषी सहाय्यक अधिकारी आदिका पानसरेंनी जैविक तसेच बिजप्रक्रिया व त्याचे फायदे याची माहिती दिली.




पान ३ वरून

## कनकेश्वर फाटा मार्गावर जड वाहनांना बंदी

या काळात पर्यायी मार्ग निश्चित करण्यात आला असून, कार्लेखिंड-पिंपळभाट-अलिबाग रिलायन्स बायपास चौक-बायपास रोड-अलिबाग रेवस नाका-बुरूमखान-मानी फाटा-आरसीएफ कंपनी थळ-कनकेश्वर फाटा-चोंढी मांडवा या मार्गाने वाहतूक वळविण्यात येणार आहे. तसेच मांडवा मार्गे येणारी जड वाहने चोंढी-आरसीएफ थळ-मानी फाटा-अलिबाग रेवस नाका-बायपास रोड-रिलायन्स चौक-पिंपळभाट-कार्लेखिंड-पोयनाड या पर्यायी मार्गाने प्रवास करतील.

दरम्यान, दूध, पेट्रोल, डिझेल, स्वयंपाकाचा गॅस, औषधे, ऑक्सिजन, भाजीपाला, पाणी यांसारख्या जीवनावश्यक वस्तूंची वाहतूक करणारी वाहने, तसेच पोलीस, अग्निशमन दल आणि रुग्णवाहिका सेवांना या बंदीतून वगळण्यात आले आहे.

## मांडवा-गेटवे प्रवासी जलवाहतूक २६ मेपासून बंद

मोरा बंदरे समूह, ठाणे येथील प्रादेशिक बंदर अधिकाऱ्यांच्या आदेशानुसार हा निर्णय घेण्यात आला आहे. या आदेशाची अंमलबजावणी मे. गेटवे एलिफंटा जलवाहतूक सहकारी संस्था, मे. गेटवे फ्लोटिंग जेट्टीज अँड टर्मिनल्स प्रा. लि., मे. मालदार्कनेस ५०५ पॅसेंजर को-ऑप हाऊसिंग सोसायटी आणि मे. पीएनपी इन्फ्राप्रोजेक्ट्स प्रा. लि. यांच्यामार्फत करण्यात येणार आहे. पावसाळ्यात समुद्र खवळलेला असण्याची शक्यता लक्षात घेऊन प्रवाशांच्या सुरक्षेसाठी ही खबरदारी घेण्यात आली आहे. त्यामुळे या काळात मांडवा-गेटवे मार्गावरील सर्व प्रवासी बोटींची वाहतूक पूर्णपणे बंद राहणार आहे, असे प्रशासनाकडून स्पष्ट करण्यात आले आहे.

## उरणमध्ये ‘जलजीवन’ची घागर उताणी

योजना या तकलादू ठरल्या आहेत. उरण तालुक्यातील जवळ जवळ १५ ग्रामपंचायत हद्दीतील योजना या निधीअभावी धूळखात पडल्याचे भयानक वास्तव समोर येत असून, विहिरींनी तळ गाठला आहे. त्यामुळे नागरिकांवर टंचाईच्या झळा सहन करण्याची वेळ येऊन ठेपली आहे. याबाबत रायगड जिल्हा परिषद तथा पंचायत समिती उरण पाणीपुरवठा विभागाकडे वारंवार विचारणा केली असता त्यांनी माहिती देण्यास टाळाटाळ केली आहे.

## तरुणांसाठी रोजगाराची सुवर्णसंधी

प्रक्रिया यांचे आयोजन करण्यात आले आहे. तसेच प्रशिक्षण आणि प्लेसमेंटसंदर्भातील संपूर्ण माहितीही युवकांना उपलब्ध करून दिली जाणार आहे.

योग्य प्रशिक्षण, विश्वासार्ह मार्गदर्शन आणि उज्ज्वल भविष्यासाठी ही मोठी संधी आहे. जिल्ह्यातील जास्तीत जास्त युवकांनी या कार्यक्रमाचा लाभ घ्यावा, असे आवाहन चित्रलेखा पाटील यांनी केले आहे.

## मुख्यमंत्र्यांनी फिरवली आगरी समाजाकडे पाठ?

पेण शहर भक्तिमय वातावरणात न्हाऊन निघाले. यानंतर महाराष्ट्राचे वनमंत्री गणेश नाईक, पेणचे आमदार रवींद्र पाटील, कामगार नेते महेंद्र घरत, नगराध्यक्षा प्रितम पाटील आदी मान्यवरांच्या हस्ते दीपप्रज्वलन करून कार्यक्रमाचा शुभारंभ करण्यात आला. संमेलनात अध्यात्म, संस्कृती आणि समाजएकतेचा संदेश देणारे विविध कार्यक्रम पार पडले. भजन, धवले गायन, भक्तिगीते तसेच आगरी संस्कृतीचे दर्शन घडवणाऱ्या सादरीकरणांनी उपस्थितांना मंत्रमुग्ध केले. सुप्रसिद्ध गायक जगदीश पाटील यांनी सादर केलेल्या आगरी स्मृती गीताने वातावरण भारावून गेले. वनमंत्री गणेश नाईक यांनी मनोगतात अध्यात्म आणि जीवनमूल्यांचा संबंध अधोरेखित केला, तर आमदार रवींद्र पाटील यांनी आगरी समाजाच्या इतिहासाचा गौरवपूर्ण उल्लेख करत समाजाने एकत्र राहण्याचे आवाहन केले.

यावेळी ‘वारी देवाची’ या विशेष अंकाचे प्रकाशनही मान्यवरांच्या हस्ते करण्यात आले. अध्यात्म, संस्कृती आणि समाजप्रेमाचा संदेश देणारे हे संमेलन आगरी समाजाच्या सांस्कृतिक वैभवाचे प्रतीक ठरले.

## मोर्चा रोखला, संताप वाढला

असून, बागायतदारांवर कर्जाचा डोंगर उभा राहिला आहे. उत्पादन खर्च गगनाला भिडला, बाजारपेठेत अनिश्चितता वाढली आणि त्यात निसर्गाच्या या संकटाने शेतकरी पूर्णपणे कोलमडून पडला आहे. अशा परिस्थितीत शासनाने पंचनामे, मदत व नुकसानभरपाई याबाबत तातडीने निर्णय घ्यावा, अशी मागणी आंदोलनकर्त्यांनी केली.

सरकारवर जोरदार टीका करताना जयंत पाटील म्हटले की, आज बाजारात सर्वच वस्तूंचे दर गगनाला भिडले आहेत. खत, औषधे, मजुरी, वाहतूक खर्च सातत्याने वाढत असताना शेतकरी मात्र आर्थिकदृष्ट्या कोलमडत चालला आहे. अशा वेळी सरकारने शेतकऱ्यांच्या पाठीशी उभे राहणे अपेक्षित असताना आंदोलन करणाऱ्यांनाच ताब्यात घेण्याचे काम सुरू आहे. हे लोकशाहीसाठी अत्यंत दुर्दैवी आहे. मदत देण्याऐवजी आंदोलन करणाऱ्यांना ताब्यात घेणं म्हणजे सरकारची शेतकरीविरोधी मानसिकता उघड झाली आहे. ही लोकशाही नसून सत्तेची मस्ती आहे. ते पुढे म्हणाले, आंबा आणि काजू उत्पादकांचे संसार उद्ध्वस्त झाले आहेत. सरकारने तातडीने मदत जाहीर करायला हवी होती. पण इथे मदतीऐवजी पोलिस पाठवले जात आहेत. शेतकऱ्यांना न्याय मागण्याचाही अधिकार राहिला नाही का? दरम्यान, पोलिसांनी कायदा व सुव्यवस्था राखण्यासाठी प्रतिबंधात्मक कारवाई केल्याचे सांगितले असले तरी आंदोलनकर्त्यांनी हा दावा फेटाळून लावत शेतकऱ्यांचा आवाज दाबण्यासाठी सत्तेचा गैरवापर सुरू आहे, असा आरोप केला आहे. विशेष म्हणजे या आंदोलनावेळी माजी खासदार राजू शेट्टी, माजी मंत्री महादेव जानकर तसेच काँग्रेस प्रदेशाध्यक्ष हर्षवर्धन सपकाळ यांनाही आंदोलनस्थळी पोहोचण्यापूर्वीच पोलिसांनी रोखल्यामुळे राज्यातील राजकीय वातावरण तापले आहे. त्यामुळे सरकार यावर काय भूमिका घेते, याकडे सर्वांचे लक्ष लागले आहे.

## इंधन दरवाढीचा भडका

इराण आणि अमेरिका यांच्यातील सुरू असलेल्या युद्धामुळे जागतिक बाजारपेठेत कच्च्या तेलाच्या (क्रूड ऑइल) किमतीमध्ये भरमसाठ वाढ झाली आहे. त्यामुळे सरकारी तेल कंपन्यांना दरमहा अंदाजे ३० हजार कोटींचा तोटा सहन करावा लागत आहे. कच्च्या तेलाचे दर प्रति बॅरल सुमारे यापूर्वी ७० डॉलरच्या आसपास होते. मात्र, हे दर प्रति बॅरल १२६ डॉलरवर पोहोचले आहेत. देशातील पेट्रोल आणि डिझेलचे दर गेल्या चार वर्षांपासून स्थिर होते. परंतु आज इंधन दरात लक्षणीय वाढ झाली आहे.

रशियानं युक्रेनवर केलेल्या हल्ल्यामुळे आंतरराष्ट्रीय बाजारात तेलाच्या किमती गगनाला भिडल्या होत्या. या प्रचंड दरवाढीचा फटका देशांतर्गत ग्राहकांना बसू नये, यासाठी सरकारी मालकीच्या इंडियन ऑइल कॉर्पोरेशन (आयओसी), भारत पेट्रोलियम कॉर्पोरेशन लिमिटेड (बीपीसीएल) आणि हिंदुस्तान पेट्रोलियम कॉर्पोरेशन लिमिटेड (एचपीसीएल) या कंपन्यांनी एप्रिल २०२२ मध्ये इंधनाचे दर नियंत्रणात ठेवले होते.

२०२२-२३ या आर्थिक वर्षाच्या पहिल्या सहामाहीत तेल कंपन्यांना कंपन्यांना मोठा आर्थिक तोटा सहन करावा लागला होता. मात्र, त्यानंतरच्या महिन्यांत तेलाचे दर कमी झाल्यामुळे तेल कंपन्यांना मोठा दिलासा मिळाला. परंतु, पश्चिम आशियामध्ये सुरू झालेल्या युद्धामुळे आंतरराष्ट्रीय बाजारात तेलाच्या किमती पुन्हा एकदा ५० टक्क्यांहून अधिक वाढल्या आहेत. पश्चिम आशियातील युद्ध सुरू होण्यापूर्वी, म्हणजेच फेब्रुवारी महिन्यात देशात आयात केल्या जाणाऱ्या कच्च्या तेलाचे (क्रूड ऑइल) दर सरासरी ६९ अमेरिकन डॉलर्स प्रति बॅरल इतके होते. त्यानंतरच्या महिन्यांमध्ये या सरासरी किमती वाढून ११३ ते ११४ प्रति अमेरिकन डॉलर्स प्रति बॅरलपर्यंत पोहोचल्या आहेत.

यापूर्वी पेट्रोलियम आणि नैसर्गिक वायू मंत्रालयानं ग्राहकांना इंधनाचा अखंड पुरवठा होण्यासाठी अनेक प्रभावी उपाययोजना केल्याचा दावा केला होता. तसेच देशभरात पेट्रोल, डिझेल आणि एलपीजीचा पुरेसा साठा उपलब्ध असून तुटवड्याची कोणतीही नोंद झालेली नाही, असेही म्हटलं होतं.

## सफाई कर्मचाऱ्याचा शॉक लागून मृत्यू

यावेळी मशीनमधील विद्युत प्रवाहाचा त्याला जोरदार धक्का बसला. गंभीर अवस्थेत त्याला तातडीने उपचारासाठी रोह्यातील उपजिल्हा रुग्णालयात हलविण्यात आले. मात्र, वैद्यकीय अधिकाऱ्यांनी त्याला मृत घोषित केले.

घटनेचा अधिक तपास सहाय्यक पोलीस अधीक्षक सुयश कुमार सिंह यांच्या मार्गदर्शनाखाली पोलीस हवालदार स्वप्निल म्हात्रे व सुनील सपकाळ करीत आहेत. दरम्यान, डंपिंग ग्राऊंड परिसरात सुरक्षेच्या कोणत्याही प्रभावी उपाययोजना नसल्यामुळेच ही दुर्घटना घडल्याचे बोलले जात आहे. दरम्यान, या दुर्घटनेमुळे सर्वत्र हळहळ व्यक्त होत असून, प्रशासनाच्या सुरक्षा व्यवस्थेवर प्रश्नचिन्ह उपस्थित झाले आहे.

## तटकरे राष्ट्रवादीचे प्रदेशाध्यक्ष नाहीत?

त्यामुळे सुनील तटकरे यांना जाणीवपूर्वक साईडलाईन केलं जात आहे का? असा सवाल उपस्थित केला जाता आहे.राष्ट्रवादी काँग्रेसकडून २९ एप्रिल रोजी केंद्रीय निवडणूक आयोगाला राष्ट्रीय कार्यकारिणी आणि पदाधिकाऱ्यांची यादी सादर करण्यात आल्याचं पत्र सध्या चर्चेत आहे. या यादीत राष्ट्रीय अध्यक्ष म्हणून सुनेत्रा पवार यांचं नाव असून, जनरल सेक्रेटरी म्हणून पार्थ पवार आणि जय पवार यांचा समावेश करण्यात आला आहे. मात्र, पक्षाचे प्रमुख नेते प्रफुल पटेल, छगन भुजबळ आणि सुनील तटकरे यांची नावे कार्यकारिणीत नसल्याचं दिसून आल्यानं तर्क-वितर्कांना वेग आला. २९ एप्रिलला केंद्रीय निवडणूक आयोगाला दिलेल्या पत्रात अरूणाचल प्रदेशचे प्रदेशाध्यक्ष टोको तातूंग यांचा नावासमोर प्रदेशाध्यक्ष म्हणून उल्लेख आहे, पण त्याच फळीत वरती सुनील तटकरे यांच्या नावासमोरचे प्रदेशाध्यक्ष हे पद नाही.


# निवडक

## दोन महिला अधिकारी एसीबीच्या जाळ्यात

**रत्नागिरी :** सातबारा उताऱ्यावर पत्नीचे नाव दाखल करण्यासाठी २५ हजारांची लाच मागून, तडजोडीअंती २० हजार रुपये स्वीकारताना राजापूर तालुक्यातील दोन महिला अधिकाऱ्यांना लाचलुचपत प्रतिबंधक विभागाने रंगेहाथ पकडले. तक्रारदाराची मौजे जवळतेथर येथे वडिलोपार्जित जमीन आहे. सातबारा उताऱ्यावर पत्नीचे नाव नसल्याने त्यांनी फेरफारासाठी अर्ज केला होता. याप्रकरणी १३ मे २०२६ रोजी मिळंद येथील तलाठी कार्यालयात कोतवाल संजना नंदकुमार माने (४१) यांची भेट घेतली असता, फेरफार मंजूर करण्यासाठी मंडळ अधिकारी पूनम जससिंग गावीत (३७) यांनी २५ हजार रुपये मागितल्याचे सांगून कोतवाल माने यांनी तक्रारदाराकडे पैशांची मागणी केली. तक्रारदाराने याप्रकरणी एसीबीकडे तक्रार दाखल केल्यानंतर १४ मे २०२६ रोजी पडताळणी करण्यात आली. त्यात कोतवाल माने यांनी मंडळ अधिकारी गावीत यांच्यासाठी २० हजार रुपये लाच मागून ती स्वीकारण्याचे मान्य केले. त्यानुसार सापळा रचून मिळंद तलाठी कार्यालयात पंचासमक्ष कोतवाल संजना माने यांनी वीस हजार रुपये स्वीकारले. त्यानंतर आरोपी क्र.२ मंडळ अधिकारी पूनम गावीत यांना फोनवरून याबाबत कळवताच त्यांनी संमती दर्शवली. यामुळे एसीबीच्या पथकाने दोघींनाही ताब्यात घेतले आहे. या कारवाईमुळे महसूल विभागात मोठी खळबळ उडाली आहे.

## चित्रकार शैलेश निंबरेंना पुरस्कार जाहीर

**मुंबई :** कला क्षेत्रातील नवोदित कलाकारांना प्रोत्साहन देणारा मानाचा आर्ट बिट्स महाराष्ट्र युवा कला गौरव पुरस्कार चित्रकार शैलेश निंबरे यांना जाहीर झाला आहे. चित्रकला विभागातील त्यांच्या उल्लेखनीय कार्याची दखल घेऊन आर्ट बिट्स फाउंडेशन, पुणे यांच्या वतीने हा सन्मान प्रदान करण्यात येणार आहे. गेल्या २५ वर्षांपासून चित्र, शिल्प, संगीत, अभिनय, नृत्य आणि लोककला क्षेत्रात कार्यरत असलेल्या या संस्थेने यंदा संपूर्ण राज्यातून शैलेश निंबरे यांची निवड केली आहे. संस्थेचे संस्थापक- संचालक संतोष पांचाळ यांच्या मार्गदर्शनाखाली डिजिटल युगात युवा कलाकारांना ओळख मिळवून देण्यासाठी हा पुरस्कार ऑनलाईन पद्धतीने प्रदान केला जातो. शैलेश निंबरे यांनी चित्रकलेत जोपासलेल्या स्वतंत्र शैलीमुळे सर्व स्तरांतून त्यांचे अभिनंदन होत आहे.



## पनवेल महापालिकेकडून स्वच्छता मोहीम



**पनवेल :** पावसाळ्याच्या पार्श्वभूमीवर नागरिकांच्या आरोग्याची काळजी घेत पनवेल महापालिकेकडून स्वच्छता मोहिमेला जोरदार सुरुवात करण्यात आली आहे. नाल्यांमध्ये विशेष औषध फवारणी तसेच धूळ नियंत्रणासाठी फवारणी करण्यात येत असून डास व साथीच्या आजारांवर प्रतिबंधात्मक उपाययोजना राबविण्यात येत आहेत. या स्वच्छता मोहिमेत महापौर नितीन पाटील यांच्या उपस्थितीत स्वच्छता दूत, आरोग्य निरीक्षक, स्वच्छता निरीक्षक आणि पालिका अधिकारी मोठ्या संख्येने सहभागी झाले. ‘स्वच्छ आणि निरोगी पनवेल’ या उद्देशाने शहरातील नाले सफाई आणि स्वच्छता कामांना वेग देण्यात आला आहे. पावसाळ्यात नागरिकांना कोणताही त्रास होऊ नये, यासाठी प्रशासन पूर्ण तयारीने मैदानात उतरले असल्याचे दिसून येत आहे.

## नवनिर्वाचित पंचायत समिती सदस्यांच्या सत्काराचे आयोजन

**माणगाव :** माणगाव तालुका कुणबी समाज साले ग्रुप यांच्या विद्यमाने कुणबी समाजातील नवनिर्वाचित माणगाव तालुका पंचायत समिती सदस्यांचा सत्कार समारंभाचे आयोजन करण्यात आले आहे. हा समारंभ शनिवार दि.१६ मे रोजी सकाळी १०:३० वाजता कुणबी भवन माणगाव येथे होणार आहे. या कार्यक्रमात नुकत्याच झालेल्या माणगाव पंचायत समितीच्या सार्वत्रिक निवडणुकीत निवडून आलेले कुणबी समाजातील नवनिर्वाचित पंचायत समितीचे सभापती विलास शिंदे, उपसभापती मनीषा मालोरे, सदस्या अलका केकाणे, संगीता बक्कम, स्वाती करकरे, सदस्य रवींद्र टेंबे, ज्ञानेश्वर पदरत या शिलेदारांचा कुणबी समाज साले ग्रुपतर्फे उपस्थित मान्यवरांच्या हस्ते सत्कार करणार येणार आहे. या सत्कार सोहळ्यास सर्वांनी मोठ्या संख्येने उपस्थित राहावे, असे आवाहन साले ग्रुपचे उपाध्यक्ष चंद्रकांत उभारे, दिलीप धोंडू जाधव, राजू शेडगे, सरचिटणीस सखाराम खरंगटे, खजिनदार सुधाकर पालकर, सहसचिव चंद्रकांत अर्बन, सल्लागार भागोजी डवले, काशीराम पाखुर्डे, संदीप खरंगटे, संजय शिंदे आदींसह कार्यकारिणी सदस्य, युवक संघटना कार्यकारिणी यांच्यातर्फे करण्यात आले आहे.

## वेस्ट टू एनर्जी प्रकल्पाला विरोध

### ● नगरसेवक सुरेश कुलकर्णीकडून उपोषणाचा इशारा

**नवी मुंबई :** नवी मुंबई महानगरपालिकेच्या तुर्भे स्टोअर येथील प्रस्तावित वेस्ट टू एनर्जी प्रकल्पाविरोधात आता संघर्ष अधिक तीव्र झाला आहे. वरिष्ठ नगरसेवक सुरेश कुलकर्णी यांनी प्रशासनाविरोधात आक्रमक भूमिका घेत थेट दि.१८ मेपासून आमरण उपोषणाचा इशारा दिला आहे. नवी मुंबई महानगरपालिका आयुक्तांना पाठवलेल्या पत्रात सुरेश कुलकर्णी यांनी म्हटले आहे की, ‘‘तुर्भेकरांच्या जीवाशी खेळणारा हा घातक प्रकल्प कोणत्याही परिस्थितीत खपवून घेतला जाणार नाही.’’ स्थानिक नागरिक, संस्था आणि मंडळांनी सुरू केलेल्या आंदोलनात ते स्वतः मैदानात उतरून सहभागी होणार असल्याचे त्यांनी जाहीर केले. कुलकर्णी यांनी आरोप केला की, या प्रकल्पामुळे निर्माण होणाऱ्या बफर झोनमुळे हजारो झोपडपट्टीवासीयांच्या पुनर्वसनाचा मार्ग कायमचा बंद होणार आहे. ‘‘लोकांना त्यांच्या हक्काच्या घरांपासून वंचित ठेवण्याचा हा डाव आहे,’’ असा गंभीर आरोप त्यांनी केला. १५ वर्षांपूर्वी कोपरखैरणे येथून डम्पिंग ग्राऊंड तुर्भेकरांच्या माथी मारण्यात आले. आता पुन्हा नव्या प्रकल्पाच्या नावाखाली नागरिकांवर अन्याय लादला जात आहे,’’ असा संताप त्यांनी व्यक्त केला. महापालिका प्रशासनावर निशाणा साधताना त्यांनी म्हटले की, स्थानिक नागरिकांची जनसुनावणी न घेता हा प्रकल्प जबरदस्तीने रेटला जात आहे. चर्चेसाठी बोलावलेली बैठक अचानक रद्द करून प्रशासनाने केवळ वेळकाढूपणा आणि दिखावा केल्याचा आरोपही त्यांनी केला. या विरोधात सुरेश कुलकर्णी हे १८ मे रोजी सकाळी १० वाजल्यापासून तुर्भे स्टोअर येथील शिवसेना शाखा क्रमांक १ जवळ आमरण उपोषणास बसणार आहेत. ‘‘जोपर्यंत हा घातक डब्लूटीई आणि सीबीजी प्रकल्प तसेच संपूर्ण डम्पिंग ग्राऊंड तुर्भे स्टोअरमधून हटवण्याचा लेखी निर्णय होत नाही, तोपर्यंत उपोषणावरून उठणार नाही,’’ असा थेट इशाराही त्यांनी प्रशासनाला दिला.

# तरुणांना मिळणार ड्रोन उडवण्याचे प्रशिक्षण

## व्यवसाय करण्यासाठी मिळणार अधिकृत परवाना



**। रायगड । प्रतिनिधी ।**

शेती क्षेत्रापासून फोटोग्राफीपर्यंत विविध क्षेत्रांतील कामे अचूक आणि उत्तम पद्धतीने करण्यासाठी आज ड्रोनचा वापर केला जातो. हे ड्रोन चालवण्याचे प्रशिक्षण घेण्यासाठी लाखो रुपये मोजावे लागतात; मात्र राज्य शासनाच्या एका योजनेंतर्गत हे प्रशिक्षण मोफत दिले जाते. एवढेच नव्हे, तर प्रशिक्षणानंतर ड्रोन उडवण्याचा अधिकृत परवानाही दिला जातो. ही योजना अमृत या राज्य शासनाच्या स्वायत्त संस्थेतर्फे राबवली जात आहे. इच्छुक पात्र उमेदवारांनी अमृत संस्थेच्या जिल्हा कार्यालयाशी तातडीने संपर्क साधावा किंवा ऑनलाइन अर्ज भरावा, असे आवाहन करण्यात आले आहे.

खुल्या प्रवर्गातील आर्थिक दुर्बल घटकांना स्वतःच्या पायावर उभे करण्यासाठी, त्यांच्यातून उद्योजक घडवण्यासाठी अमृत संस्था विविध योजनांसह वेगवेगळ्या प्रकारचे उद्योजकता प्रशिक्षण कार्यक्रमही राबवते. त्यामध्येच ड्रोन पायलट बनण्यासाठीच्या प्रशिक्षणाचाही समावेश आहे. त्यासाठी अमृत ड्रोन मिशन या नावाने मोहीम राबवली जाते. हा प्रशिक्षण कार्यक्रम अत्यंत दर्जेदार असून, एरव्ही ज्यासाठी किमान लाख-दीड लाख रुपये मोजावे लागतात, तो १० दिवसांचा निवासी कोर्स अमृत संस्थेकडून लक्ष्यित घटकांसाठी मोफत राबवला जातो. या प्रशिक्षणाचा कार्यक्रमाचा लाभ आजपर्यंत शंभरहून अधिक लाभार्थ्यांनी घेतला असून, त्यातील काही जणांनी यातून प्राप्त केलेल्या कौशल्याच्या आधारे चांगली कमाई करण्यासही सुरुवात केली आहे. अमृत संस्थेच्या या दर्जेदार कोर्सची कीर्ती ऐकून गोवा सरकारने आपल्या तीस अधिकाऱ्यांना अमृत संस्थेकडून ड्रोनचे प्रशिक्षण दिले. राज्यात आठ ठिकाणी संस्थेतर्फे प्रशिक्षण दिले जाते.

ड्रोन ऑपरेटर (पायलट) प्रशिक्षण कार्यक्रमामुळे युवकांसाठी अत्याधुनिक तंत्रज्ञानाच्या क्षेत्रात करिअरच्या नव्या संधी खुल्या होत आहेत. ड्रोनच्या वापराची क्षेत्रे आज विस्तारली असून, शेती फवारणी, पीक सर्वेक्षण, भूमापन, व्हिडिओग्राफी व फोटोग्राफी, सरकारी प्रकल्प निरीक्षण अशा अनेक क्षेत्रांमध्ये ड्रोनचा प्रभावी वापर केला जातो. त्यामुळे या क्षेत्रातील प्रशिक्षित मनुष्यबळ तयार करण्याची गरज निर्माण झाली आहे. हे नेमके ओळखून अमृत संस्थेने ड्रोन मिशनची सुरुवात केली.

खुल्या प्रवर्गातील आर्थिकदृष्ट्या दुर्बल घटकातील युवकांना, विशेषत: ग्रामीण क्षेत्रात स्वयंरोजगार व रोजगार निर्मिती करणारे प्रशिक्षण देणे, हा या योजनेचा मुख्य उद्देश आहे. मुख्यत्वेकरून शेती क्षेत्रातील वापर, जमिनीचे सर्वेक्षण, एरियल फोटोग्राफी, आपत्ती व्यवस्थापन या विषयांमधून प्रशिक्षणाचा विषय या कोर्समध्ये निवडता येतो. नागरी विमान वाहतूक महासंचालनालय अर्थात डीजीसीएची सुरक्षित उड्डाण नियमावली, तसेच आधुनिक ड्रोन हाताळणी, ड्रोनचा मेन्टेनन्स वगैरे बाबींचे प्रशिक्षणही या कोर्समध्ये दिले जाते.

## -: जाहीर नोटीस :-
**(टायटल व्हेरिफिकेशनकामीची )**

तमाम लोकांस या जाहीर नोटीसीने कळविण्यात येते की,

मिळकतीचे वर्णन-तुकडी जिल्हा ठाणे, पोट तुकडी तालुका मुरबाड पैकी, मौजे चासोळे या गावचे शिवारातील खालील वर्णनाच्या शेतजमिन मिळकती:-

| गट क्र. | मिळकत मालकाचे नाव | एकूण क्षेत्र हेक्टर आर चौ.मी. | आकार रुपये पैसे |
|---|---|---|---|
| ३४/१ | मुकेश मुरजी बीड<br>रजनिकांत मुरजी बीड<br>राज हसमुख हरणिया<br>सूर्यांश अश्विन ठक्कर | ००-५०-०० | ००-२२ |
| ३४/११/१ | | ००-४२-०० | ००-६२ |
| ३४/१२ | | ००-०६-०० | ००-१६ |
| ३४/१३ | | ००-१५-०० | ००-३१ |
| ३४/१४ | | ०१-२४-०० | ००-०५ |
| ३४/१५ | | ००-१४-०० | ००-२२ |
| ३४/१६ | | ००-२३-०० | ००-२५ |
| ३४/१७ | | ००-१६-०० | ००-०५ |
| ३४/१८ | | ००-२६-०० | ००-६२ |
| ३४/१९ | | ००-१९-०० | ००-२२ |
| ३४/२ | | ००-७३-०० | ००-२५ |
| ३४/२१ | | ००-५९-०० | ००-०२ |
| ३४/३ | | ००-०२-०० | ००-१४ |
| ३४/४ | | ००-०२-०० | ००-०२ |
| ३४/५ | | ००-०४-०० | ००-०८ |
| ३४/६ | | ००-१९-०० | ००-९४ |
| ३४/७ | | ००-५७-०० | ००-६२ |
| ३४/९ | | ००-१९-०० | ००-२२ |
| ३५/१ | | ००-७७-०० | ००-६४ |

या मिळकती या नोटीसचा विषय असुन सदर मिळकतीचे टायटल व्हेरिफिकेशनकामी प्रस्तुतची नोटीस प्रसिद्ध करण्यात आलेली आहे. तथापी सदर मिळकतीवर इतर कोणाही इसमांचा अगर कोणत्याही प्रकारचा चार्ज, बोजा हक्क व अधिकार जसे की, कोणाचाही कोणत्याही प्रकारे, चार्ज, बोजे, गहाण, दान, लिन, लिज, बक्षिसपत्र, विसारपावती, साठेखत, खरेदीखत, जनरल मुखत्यार, विशेष मुखत्यारपत्र, विकसन करारनामा, संपादन, आरक्षण, जप्ती, कोर्ट कारवाई, अशा कोणत्याही प्रकारचा बोजा असल्यास सदरच्या संबंधित इसमांनी सदरची जाहीर नोटीस प्रसिद्ध झालेपासून ०६ दिवसांचे आत आमचे खालील नमुद पत्त्यावर लेखी व साक्षांकीत कागदपत्रांनिशी हरकती नोंदवाव्यात तरी दिलेल्या मुदतीत कोणाच्याही कोणत्याही प्रकारच्या हरकती न आल्यास सदरची मिळकत निर्वेध व बिनबोजाची आहे. असे समजनेत येईल, मुदतीनंतर येणाऱ्या हरकती ग्राह्य धरल्या जाणार नाही तसेच परस्पर वर्तमानपत्रात येणाऱ्या हरकतींचा विचार केला जाणार नाही.

कळावे ही जाहीर नोटीस.

ठिकाण-मुरबाड
दिनांक:- १६-०५-२०२६

**ॲड. सुरेश एस.धामणे**
ऑफीस नं. बी-१, पहिला मजला,
मेघदुत शॉपींग सेंटर, जिल्हा व सत्र न्यायालय, नाशिक समोर,
नाशिक ४२२००८
मो.नं. ९४२३५६९१३७

सदर नोटीस आमचे संमतीने व सहीने प्रसिद्ध केलेली आहे


# ऐश्वर्य ज्वेल कलेक्शन

१ ग्रॅम सोन्याचे प्लेटींग
दागिने-नविन डिझाइन्स



मोत्याचे दागिने- तन्मणी, चींचपेटी, बांगड्या, बाजुबंद. गॅरंटीचे दागिने- मंगळसूत्र, बांगड्या, पाटल्या, हार, माळ. डायमंड- कुंदन- पोलकी- सेट- मॅचिंग बांगड्या- कानातले. सर्व नामांकित कंपन्यांची कॉस्मेटीक्स, परफ्यूम, डीओ. वाजवी भाव आणि भरपूर व्हरायटीसाठी प्रसिद्ध दुकान.

**२/१२ पी.एन.पी. नगर, अलिबाग.**
**मोबाईल : ९८६०६५८५६५**


दिनांक : १६/०५/२०२६

### नोटीस

सर्व जनतेस या जाहीर नोटीसीद्वारे कळविण्यात येते की, खालीलप्रमाणे नमूद मौजे भोईघर, ता. मुरूड, जि. रायगड येथील मिळकत आमचे अशिल यांनी विद्यमान मालक १) अर्चना विद्याधर वैद्य, २) महेश पास्कल जेसेन्टो यांचेकडून कायमस्वरूपी खरेदी करण्याचे ठरविले आहे. सदरहू मिळकत ही निर्वेध असल्याचा भरवसा मिळकतीच्या विद्यमान मालकांनी दिलेला असला तरी, या खरेदी-विक्री व्यवहाराबाबत कोणाचीही कोणतीही हर हरकत, दावा, लिज, पोटगी, बक्षिसपत्र, मृत्युपत्र, तारण, ताबा/गहाण इ. स्वरूपाचे हक्क व हितसंबंध असल्यास ते योग्य त्या लेखी पुराव्यासह निम्न स्वाक्षांकित खरेदीदार यांच्या वकीलांकडे ही जाहीर नोटीस प्रसिद्ध झाल्यापासून १४ दिवसांचे आत कळवावे. मुदतीत हरकत न आल्यास सदरहू मिळकत ही निर्वेध आहे असे समजून आमचे अशिल खरेदी व्यवहार पूर्ण करतील व तदनंतर येणाऱ्या कोणत्याही हरकतींचा विचार केला जाणार नाही व अशा हरकती आमचे अशिलांवर बंधनकारक राहणार नाहीत हे सर्वांस कळावे.

**मौजे भोईघर, ता. मुरूड, जि. रायगड**

| मौजे | गट क्रमांक व उपविभाग | एकूण क्षेत्र (हे.आर.) | आकार (रू. पैसे) |
|---|---|---|---|
| भोईघर ता. मुरूड | ६८ | क्षेत्र ०-४२-००<br>पो.ख. ०-००-१०<br>एकूण क्षेत्र ०-४२-०० | २.१२ |

दिनांक : १६/०५/२०२६
अशिलांची सही

**ॲड. समीर सुरेश नाईक**
जिल्हा न्यायालय रायगड-अलिबाग
ऑफिस पत्ता : फ्लॅट नं. १०३, पहिला मजला, बी विंग, मोरेश्वर अपार्टमेंट
जे.एस.एम. कॉलेज जवळ, अलिबाग-रायगड
मोबा. ९७६७०१०९०२

# पत्रकारांवरील हल्ल्याविरोधात निषेध

**। रसायनी । प्रतिनिधी ।**



ज्येष्ठ पत्रकार, संपादक, सामाजिक कार्यकर्त,महाराष्ट्र राज्य पत्रकार संघाचे संघटक संजय भोकरे यांच्या हत्येचा कट उघडकीस आल्यानंतर राज्यभरातील पत्रकारांमध्ये संतापाची तीव्र लाट उसळली आहे.

पत्रकारिता, शैक्षणिक आणि सामाजिक क्षेत्रात मोठे योगदान देणाऱ्या भोकरे परिवाराला लक्ष्य करून काही समाजकंटकांनी हा कट रचल्याचा गंभीर आरोप करण्यात येत आहे. या संपूर्ण प्रकरणाची सखोल चौकशी करून कटामागील खरा मास्टरमाईंड शोधून त्याच्यावर कठोर कारवाई करण्यात यावी, अशी मागणी महाराष्ट्र राज्य पत्रकार संघाचे जिल्हाध्यक्ष राकेश खराडे यांनी जिल्हा पोलिस अधिक्षक ऑचल दलाल आणि जिल्हाधिकारी किसन जावळे यांच्याकडे निवेदन देऊन केली आहे.

पत्रकार संजय भोकरे यांनी आयुष्यभर सर्वसामान्य पत्रकारांसाठी संघर्ष केला. ग्रामीण भागातील पत्रकारांना संघटित करून त्यांना न्याय, सन्मान आणि ओळख मिळवून देण्याचे ऐतिहासिक कार्य त्यांनी केले आहे.दरम्यान महाराष्ट्र राज्य पत्रकार संघाच्या वतीने जिल्हा पोलिस अधीक्षक आँचल दलाल आणि उपजिल्हाधिकारी यांना दिनकर भुजबळ, अर्जुन कदम, सुभाष म्हात्रे आदीसह जिल्हा पदाधिकाऱ्यांच्या वतीने निवेदन देऊन पत्रकारांवर हल्ला करणाऱ्यांवर कठोर कारवाई करावी अशी मागणी केली.

## गोदरेज कंपनीत धाडसी चोरी

पाताळगंगा : तांबाटी गाव हद्दीत असलेल्या गोदरेज कंपनीच्या स्टोअर रूममध्ये अज्ञात चोरट्यांनी धाडसी चोरी करत तब्बल ३ लाख ३८ हजार १६६ रुपयांचे कॉपर फिश प्लेट व इलेक्ट्रिक साहित्य लंपास केल्याची घटना उघडकीस आली आहे. मिळालेल्या माहितीनुसार, ४ मे २०२६ रोजी सायंकाळी ५ वाजल्यापासून ते ९ मे २०२६ रोजी सायंकाळी ५ वाजेच्या दरम्यान ही घटना घडली. अज्ञात आरोपींनी गोदरेज कंपनीच्या स्टोअर रूमचा पत्रा कापून आत प्रवेश केला.त्यानंतर फिर्यादी दीपांजन अरुण रक्षित यांनी सदर घडलेली घटना व्यवस्थापक यांच्या निदर्शनास आणली यावेळी, स्टोअर रूममधील कॉपर फिश प्लेट तसेच विविध इलेक्ट्रिक साहित्य चोरी करून नेले. निदर्शनास आले. या चोरीची एकूण किंमत ३ लाख ३८ हजार १६६ रुपये इतकी असल्याचे सांगण्यात आले आहे. घटनेची माहिती मिळताच खालापूर पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला असून परिसरात खळबळ उडाली आहे.या प्रकरणाचा अधिक तपास पोलीस उपनिरीक्षक नितीन सांगळे करीत आहेत.

## रणरणत्या उन्हात गुलमोहर बहरले

कर्जत : मे महिन्यातील कडक उन्हामुळे नागरिक हैराण झाले असतानाच रस्त्यांच्या कडेला आणि विविध भागांत फुललेल्या गुलमोहराच्या झाडांनी वातावरणात रंगत आणली आहे. बहरलेल्या गुलमोहरामुळे परिसराचे सौंदर्य खुलून दिसत असून, नागरिकांचे लक्ष वेधून घेत आहे. सकाळपासूनच वाढणारा उष्मा आणि दुपारच्या वेळेस अंगाची लाही लाही करणारे तापमान यामुळे नागरिक त्रस्त झाले आहेत. मात्र अशा रणरणत्या उन्हात गुलमोहराच्या झाडांवर उमललेल्या फुलांनी निसर्गप्रेमींना दिलासा दिला आहे. शहरातील रस्ते, शाळा परिसर, शासकीय कार्यालये तसेच ग्रामीण भागातील अनेक ठिकाणी गुलमोहर फुलल्याचे चित्र पाहायला मिळत आहे.

## जाहिर नोटीस

सर्व लोकांस या जाहीर नोटीसीने कळविण्यांत येते की, मौजे बेलकडे, ता. अलिबाग, जि. रायगड येथील खालील वर्णन केलेल्या मिळकतीचे विद्यमान मालक जयेंद्र धोंडु महाले, रा. बेलकडे, ता.अलिबाग, जि. रायगड यांच्या मालकीहक्काची व त्यांचे कब्जातील खालील वर्णन केलेली भातशेती मिळकत माझे अशिल यांनी कायम स्वरुपात विकत घेण्याचे ठरविले आहे. तशा आशयाची बोलणी विद्यमान मालकांबरोबर माझे अशिलांनी केली आहे. सदर मिळकत निर्वेध असल्याचा हवाला विद्यमान मालकांनी माझ्या अशिलांना दिलेला आहे.

**मिळकतीचे वर्णन**

| मौजे | भूमापन क्रमांक व उपविभाग क्र. | क्षेत्र हे. आर. | आकार रु. पैसे |
|---|---|---|---|
| बेलकडे ता.अलिबाग | २४९ | ०-४७-५०<br>पो.ख.०-०३-९०<br>एकूण ०-५१-४० | ५.८१ |

वर नमूद क्षेत्रापैकी जयेंद्र धोंडु महाले यांच्या अविभक्त हिश्श्यापैकी ०-०२-८० हे. आर., पो.ख. ०-००-२० हे. आर., एकूण क्षेत्र ०-०३-०० हे.आर., आकार रु.०.३४ पैसे या मिळकतीबाबत.

तरी सदरहू मिळकतीमध्ये अन्य कोणाचा कोणत्याही प्रकारचा हक्क, हितसंबंध, ताबा कब्जा, भाडेपट्टा, इजमेंट, साठेकरार, खरेदीखत, गहाण, दान, बोजा व अन्य कोणत्याही प्रकारचा हितसंबंध असल्यास त्यांनी या नोटीशीच्या तारखेपासून सात दिवसांचे आत प्रथमदर्शनी पुराव्यासह त्यांच्या लेखी हरकती खालील पत्त्यावर समक्ष वा रजिस्टर पोस्टाने दाखल कराव्यात. याप्रमाणे सदर मिळकतीबाबत कोणतीही हरकत न आल्यास सदर मिळकत निर्वेध व बोजाविरहित आहे असे गृहीत धरुन माझे अशिल वरील मिळकतीच्या संदर्भातील नियोजित खरेदीचा व्यवहार पुर्ण करतील व विहित मुदतीच्या नंतर येणाऱ्या कोणत्याही हरकती माझ्या अशिलांवर बंधनकारक राहणार नाहीत. याची कृपया संबंधितांनी नोंद घ्यावी.

दिनांक १३/०५/२०२६
अशिलांची सही.

सही / -
**ॲड. विवेक रमेश साळवी**
दुय्यम निबंधक कार्यालयासमोर, अलिबाग,
ता. अलिबाग, जि. रायगड.

## जाहीर सूचना

सर्वांना याद्वारे सूचना देण्यात येत आहे की, श्री. गजानन बाळाराम देशमुख हे खालील अनुसूचीमध्ये विस्तृतपणे विवरणीत शेतजमिनीचे (सदर मालमत्ता) मालक आहेत.

कोणाही व्यक्तीचा सदर मालमत्ता वा तिच्या कोणत्याही भागासंदर्भात विक्री, उत्तराधिकार, विनिमय, गहाण, प्रभार, भाडेकरार, वहिवाट, अनुज्ञप्ती, धारणाधिकार, भेट, न्यास, विचाराधीन विवाद, देखभाल, ताबा, सुविधाधिकार वा अन्य कोणत्याही स्वरूपात कोणताही दावा असल्यास त्यांनी त्यासंदर्भात अधोहस्ताक्षरितांना खालील पत्यावर अशा दाव्यांशी संबंधित आवश्यक दस्तावेजांसमवेत सदर सूचनेच्या प्रसिद्धी दिनांकापासून १४ (चौदा) दिवसांच्या आत सूचित करावे अन्यथा विहित कालावधीत कोणत्याही व्यक्तीने असे कोणतेही दावे, काही असल्यास, दाखल न केल्यास ते जाणीवपूर्वक अधित्यागित, परित्यागित व सोडून दिलेले आहेत असे समजण्यात येईल.

**अनुसूची**
**(सदर मालमत्ता)**

पुढील विवरणीत शेतजमिनीचा सर्व तो भाग व भूखंड, मोजमापित ४.०९ एकर, सर्व्हे क्र. ३५.१५, ३५/१२/ए, ३५/१२/ए, ४१/१३ ३८/६ व ३५/११, मौजे मिरचोळी, तालुका कर्जत, जिल्हा रायगड, गाव मिरचोळी, तालुका कर्जत, जिल्हा रायगड येथील.

दिनांक - १६ मे, २०२६

सही/-
**ॲड. नितीन ताभाणे**
नेक्सस लीगल (वकील)
न्यू अपोलो को-ऑपरेटिव्ह हाऊसिंग सोसायटी लिमिटेड, १४ वा रस्ता, खार (पश्चिम),
मुंबई - ४०० ०५२.
ई-मेल : nitin@nexuslegal.net.in
मोबा. नं. : ९८२३२४१८५१

## जाहीर सूचना
**नाव दुरूस्ती**

मी सौ. फहमीदा इस्माईल सय्यद, रा. पोस्ट भिवपुरी कॅम्प, ता. कर्जत, जि. रायगड महाराष्ट्र-४१०२०१, याद्वारे जाहीर करते की, माझे नाव काही कागदपत्रांमध्ये चुकीने 'फैमीद इस्माईल सय्यद' तसेच 'फैमीदा इस्माईल सय्यद' असे नमूद झाले आहे.
माझे योग्य व खरे नाव 'फेहमीदा इस्माईल सय्यद' असे आहे.
गॅझेट क्र. (M-2356472) नुसार.
यापुढे सर्व नोंदी, कागदपत्रे व संदर्भामध्ये माझे नाव 'फेहमीदा इस्माईल सय्यद' (Fehmeeda Ismail sayyad) असेच ग्राह्य धरावे.

## जाहीर पेपर नोटीस

सर्व लोकांस या जाहीर नोटीसीने असे कळविणेत येते की,

मौजे नसरापुर ता - कर्जत, जि- रायगड येथील शेती जमीन मिळकत त्या मिळकतीचे शरद शांताराम हडप रा- गणेगाव चिंचवली ता- कर्जत जि- रायगड याची खालील वर्णन केलेली मौजे नसरापुर येथील जमीन

**मिळकतीचे वर्णन**

| सर्व्हे नंबर | हिस्सा नंबर | क्षेत्रफळ हे.आर.पॉ | आकार रु. पै. |
|---|---|---|---|
| ६८ | २/क | एकुण क्षेत्रफळ - ०.४०.०० हे. आर. पॉ. पैकी विकत देणार यांच्या मालकीची असलेले क्षेत्र ०.२०.०० हे. आर पॉ. | ०.१३ |

वर वर्णन केलेली जमीन मिळकत त्या मिळकतीचे मालक यांनी आमचे आशिलास सदरच्या मिळकती कायमच्या खरेदीखताने विकत देण्याचे ठरवलेले आहे. तरी सदर मिळकतीबाबत कोणाचाही हक्कहितसंबंध, तोंडी अथवा लेखी करार असल्यास तसेच या इसमाचा अगर संस्थेचा खरेदीखत, साठेकरार, विक्री, गहाण, दान, लिज, त्रक्षिसपत्र, चार्ज, ताबेकब्जा, कुळमुखत्यारपत्र, फरोक्त, वगैरे हक्क असल्यास ही नोटीस प्रसिद्ध झाल्यापासुन सात (०७) दिवसांचे आत खाली सही करणार ॲडव्होकेट यांच्याकडे प्रथमदर्शनी कागदोपत्री पुराव्यासह लेखी हरकती दाखल कराव्यात. मुदतीत हरकती न आल्यास सदर मिळकत निर्वेध व बोजारहीत आहे असे समजून आमचे अशिल सदर मिळकतीचा खरेदीचा व्यवहार पूर्ण करतील व मुदतीनंतर उपस्थित केलेली कोणतीही हरकत आमचे अशिलांवर बंधनकारक राहाणार नाही हे कळावे.

दिनांक १६/०५/२०२६

**ॲड. भारत अंकुश सावंत**
(बी कॉम. एल. एल.बी)
पत्ता मु. पो मोठे वेणगाव
ता- कर्जत जि - रायगड
संपर्क क्रमांक ९५५२२९६६२२

## जाहिर नोटीस

सर्व लोकांस या जाहीर नोटीसीद्वारे कळविण्यात येते की मौजे चांदई, ता. कर्जत, जि. रायगड येथील हक्कनोंदीस वर्णन असलेली जमीन मिळकत आमचे अशिलांनी सदर मिळकतींचे विद्यमान मालक १) अमीर हेपतुला जवेरी २) प्रकाश कल्याणी मोघे यांचेकडुन खरेदी घेण्याचे ठरविले आहे सदर जमिन मिळकतीचे वर्णन खालीलप्रमाणे :

**मौजे चांदई, ता. कर्जत, जि. रायगड येथील जमीन मिळकत :**

| सर्व्हे नं. | हिस्सा नं. | क्षेत्र (हे. आर. पॉ.) | आकार (रू. पै.) |
|---|---|---|---|
| ८१ | २ | ०-१७-०० | ०-३० |

तरी वरील मिळकतीच्या बाबत कोणाचाही कुळ वहिवाट, ताबा, बयाणा पावती, साठेकरार, गहाण, बक्षीस, बोजा, भाडेपट्टा, मृत्युपत्रांकित दान, जप्ती, लिज, कुलअखत्यारपत्र अथवा अन्य प्रकारचा कायदेशीर हक्क हितसंबंध असल्यास ही नोटीस प्रसिद्ध झाल्यापासून १४ (चौदा) दिवसांच्या आत खालील सही करणार यांचेकडे आपल्या हरकती प्रथमदर्शनी पुराव्यासह लेखी दाखल कराव्यात अथवा रजिस्टर्ड पोस्टाने पाठवाव्यात. सदर मुदतीत कोणाचीही हरकत न आल्यास सदरचा व्यवहार पुर्ण केला जाईल व त्यानंतर येणारी कोणतीही हरकत आमचे अशिलांवर बंधनकारक राहणार नाही याची नोंद घ्यावी.

कर्जत
ता. १६/०५/२०२६

खरेदीदारातर्फे ॲडव्होकेट
**किशोर तुकाराम देशमुख**
प्रेरणा निवास, नाना मास्तर नगर,
मुद्रे खुर्द, ता. कर्जत, जि. रायगड ४१०२०१
मो. ९४२२०६८७५५

## जाहीर नोटीस

सर्व संबंधितांस या नोटीसद्वारे कळविण्यात येते की, माझे अशिल यांनी मौजे चेंढरे, ता. अलिबाग, जि. रायगड येथील खालील नमूद वर्णनाची निवासी सदनिका मिळकत, सदर मिळकतीचे विद्यमान मालक श्री. विनायक हरिश्चंद्र कोळगांवकर यांचेकडून कायम स्वरूपी खरेदी करण्याचे मान्य व कबूल केले असून त्या आशयाची बोलणी संदर्भित मिळकतीचे विद्यमान मालक व माझे अशिलांदरम्यान झालेली आहेत. खालील नमूद निवासी सदनिका मिळकतीचे वैध मालकी हक्क प्रमाणपत्र देणेकामी सदर जाहिर नोटीस प्रसिद्ध करीत आहोत.

संदर्भित निवासी सदनिका मिळकत ही पूर्णपणे बिनजोखमी व बोजाविरहित असल्याबाबतचा हवाला सदर मिळकतीचे विद्यमान मालकांनी माझ्या अशिलांना दिला आहे. याउपरही संदर्भित मिळकतीमध्ये अन्य कुणाचेही कसल्याही तऱ्हेचा हक्क, हितसंबंध व अधिकार असल्यास, त्यांनी ही नोटीस प्रसिद्ध झाल्या दिनांकापासून ७ दिवसांचे अवधीत माझ्याकडे लेखी पुराव्यानिशी देवून माझी खात्री पटवून द्यावी. विहीत मुदतीत अशी कोणतेही लेखी हरकत न आल्यास सदर मिळकतींचे वैध मालकी हक्क प्रमाणपत्र दिले जाईल, याची कृपया सर्वांनी नोंद घ्यावी.

**मिळकतीचे वर्णन**

मौजे चेंढरे, ता. अलिबाग, जि. रायगड येथील सर्वे नं. १०६/१ए, पो. नं. २३, २४, २५ या मिळकतीवर बांधण्यात आलेली नियोजित हरि-तारा सहकारी गृहनिर्माण संस्था मर्या. या इमारतीमधील निवासी सदनिका नं. १०२, सी विंग, रेज्ड तळ मजला, क्षेत्र ४३२ चौ. फूट (बाल्कनी व टेरेस क्षेत्रासहित).

अलिबाग,
दि १५/०५/२०२६

**ॲड. महेश सुहास म्हात्रे**
B.A. LL.B. (MAH/5773/2006)
Public Notary
Office: Ruturaj Plaza, Flat No. 1,
Ground Floor, Shivaji Chowk,
Near Gawade Optics, Alibag, Raigad 402 201.
Contact No.: 09850042234/7741032234
E-mail ID: maheshmhatreoffice7@gmail.com

दिनांक :- १५/०५/२०२६

## जाहीर नोटीस

तमाम जनतेस या जाहीर नोटीसीने कळविण्यात येते की, आमचे अशील यांनी मौजे - भार्जे ता. सुधागड जि. रायगड येथील खालील वर्णनाची मिळकत कायम खरेदीखताने विकत घेण्याचे ठरविले आहे. सदर मिळकतीचे वर्णन खालीलप्रमाणे :-

**मिळकतीचे वर्णन :-**
**मौजे - भार्जे ता. सुधागड जि. रायगड**

| कब्जेदाराचे नांव | गट. नं. | क्षेत्र. हे आर | आकार रू. पैसे |
|---|---|---|---|
| श्री. भुषण भास्कर भोरे | ३८६ | ०-३८-०० | ०-१४ |

सदर वरील वर्णन केलेली एकूण सर्व मिळकत आमचे अशिल १) श्रीमती. सुवर्णा शैलेंद्र पाटील मो. नं. ९८७०४३९७०२ (२) श्रीमती हेमलता अनिल म्हात्रे मो. नं. ९२२२५२५८८४ (३) श्रीमती. मनीषा प्रकाश म्हात्रे मो. नं. ९९३०२६४५११ (४) श्री. संजय अभिमन्यु गावंड सदर मिळकतीचे कब्जेदार यांचेकडून कायम खरेदीने विकत घेण्याचे ठरविले आहे. तरी सदर होणारे खरेदी विक्री व्यवहारास कोणाचीही हरकत अथवा दावा असल्यास वा सदरहु मिळकतीचे खरेदी विक्री बाबत तसेच हक्क हितसंबंध, मालकी वहीवाट, पोटगी बक्षिसपत्र मृत्यूपत्र, साठेकरार अथवा कोणाचेही काही हक्क हितसबंध वहिवाट अथवा सदर मिळकतीचे ताबे कब्जा वहिवाट असल्यास सदर नोटीस प्रसिद्ध झालेपासून संबंधीत तक्रारदार याने आपली हरकत योग्य त्या कागदोपत्री पुराव्यासहीत १४ दिवसांचे कालावधीत खालील पत्त्यावर नोंदवावे. सदर कालावधीत कोणाचीही कोणतीही हरकत न आल्यास सदर मिळकत निर्वेध व बोजारहित आहे. असे समजून आमचे अशील सदरचा खरेदी विक्री व्यवहार पूर्ण करतील व मागाहून आलेली हरकत आमचे अशिलांवर बंधनकारक राहणार नाही. याची नोंद घ्यावी.

ठिकाण :- पाली - सुधागड
दिनांक :- १५/०५/२०२६

सही/-
**श्री. राहुल जे. भंडारी**
ॲडव्होकेट
रा. पाली ता. सुधागड जि. रायगड
मोबा नं. ९४२३२३२८६२

## जाहीर सुचना

सर्व संबधितांना याद्वारे कळविण्यात येते की, मौजे अलिबाग, ता. अलिबाग, जि. रायगड येथील स.नं. १२१३/१, १२१३/२, १२१३/ए, १२१३/के, १२१४, १२१४/१, १२१४/के, या मिळकतीमधील बांधलेल्या देवयानी सहकारी गृहनिर्माण संस्था मर्यादित या इमारतीमधील पहिल्या मजल्यावरील निवासी सदनिका नं. १०३, ए विंग, क्षेत्र ३५० चौरस फूट (३२.५२ चौ.मी.) क्षेत्रफळाची सदनिका, सदर निवासी सदनिका सौ. निलांबरी सुरेश सहस्त्रबुद्धे व श्री. सुरेश गोविंद सहस्त्रबुद्धे, राहणार नौपाडा, ठाणे यांच्या मालकीची असून, सदरील सदनिका, सदर सदनिकेच्या विद्यमान मालकांकडून, माझे अशिलांनी कायमस्वरुपी खरेदी करण्याचे मान्य व कबूल केले असून, त्या आशयाची बोलणी सदर सदनिकेचे विद्यमान मालक व माझे अशिला दरम्यान झाली आहेत. सदर सदनिका पूर्णतः निर्वेध व बिनजोखमी असल्याबाबतचा हवाला सदर सदनिकेच्या विद्यमान मालकांनी माझे अशिलांस दिला आहे. याउपरही संदर्भित सदनिकेत अन्य कोणाचेही कसल्याही तऱ्हेचे हक्क, हितसंबंध व अधिकार असल्यास त्यांनी ही सूचना प्रसिद्ध झाल्या दिनांकापासून सात (०७) दिवसांचे अवधीत माझ्याकडे लेखी पुराव्यानिशी देऊन माझी खात्री पटवून द्यावी. विहीत मुदतीत अशी कोणतीही लेखी हरकत न आल्यास माझे अशिल त्यांचा सदर सदनिका खरेदीचा व्यवहार पूर्ण करतील व मागाहून येणारी कोणतीही हरकत माझे अशिलांवर बंधनकारक राहणार नाही, याची कृपया सर्वांनी नोंद घ्यावी.

अलिबाग,
दिनांक १५/०५/२०२६

सही/-
**(ॲड. महेश प्रभाकर वेंगुर्लेकर)**
कृष्णवंदन-२, तळमजला
कन्या शाळेसमोर, ब्राम्हण आळी,
ता. अलिबाग, जि. रायगड.

## ग्रामपंचायत दहिवली तर्फे गोवेले
**ता. माणगाव - जिल्हा - रायगड**
ई-निविदा सन २०२६-२०२७ (1st CALL )
ई-निविदा सुचना

ग्रामपंचायत दहिवली तर्फे गोवेले, तालुका माणगाव, जि. रायगड यांचेकडील खालील कामाची निविदा योग्य त्या जिल्हा परिषदेकडील नोंदणीकृत कंत्राटदाराकडून Percentage Rate Tender दोन लिफाफा पध्दतीने ई-निविदा मागविण्यात येत आहे.

सदर निविदा बाबतची माहिती http://mahatenders.gov.in या संकेत स्थळावर ऑनलाईन पद्धतीने संगणक प्रणालीवर उपलब्ध होईल.

| अ.क्र. | कामाचे नाव | कामाची निविदा रक्कम | इसारा रक्कम | निविदा फी | कामाची मुदत | आवश्यक कंत्राटदार | नोंदणी वर्ग |
|---|---|---|---|---|---|---|---|
| १ | CONSTRUCTION OF MULTIPURPUS HALL AT DAHIWALI GOVELE V.P DAHIVALI GOVELE TALUKA MANGAON DIST RAIGAD | १५,००,००० | १५,०००/- | ५९०/- | ६ महिने | रा.जि.प. कडील नोंदणीकृत कंत्राटदार | ६ व त्या वरील |

निविदेच्या अटी व शर्ती खालील प्रमाणे -
१) सदर संपूर्ण निविदा प्रक्रिया ई- निविदाद्वारे ऑनलाईन पद्धतीने संगणक प्रणालीवर होईल. सदर निविदा, नोटीस, सुचना, शुद्धीपत्रक इत्यादी माहिती http://mahatenders.gov.in या संकेत स्थळावर उपलब्ध होईल.
२) वरील कामाची निविदेची http://www.mahatenders.gov.in या संकेत स्थळावरून खाली दिलेल्या कालावधीत असेल.
३)

| तपशिल | दिनांक | वेळ | दिनांक | वेळ |
|---|---|---|---|---|
| संकेत स्थळावरून ई-निविदा प्रसिद्धी कालावधी | १५/०५/२०२६ | १५:०० | २६/०५/२०२६ | १५:०० |
| निविदा फॉर्म व परिशिष्ट डाऊनलोड करण्याचा कालावधी | १५/०५/२०२६ | १५:०० | २६/०५/२०२६ | १५:०० |
| ई-निविदा सादर करणेचा कालावधी | १५/०५/२०२६ | १५:०० | २६/०५/२०२६ | १५:०० |
| ई निविदा उघडणेचा तारीख व वेळ | दिनांक २८/०५/२०२६- वेळ १५:०० वाजता | | | |

सही/-
ग्रामपंचायत अधिकारी
ग्रामपंचायत दहिवली तर्फे गोवेले

## वाचकांसाठी निवेदन

कृषीवल वृत्तपत्रातून प्रसिद्ध होणाऱ्या विविध जाहिरातींची शहानिशा करुनच वाचकांनी संबंधितांशी व्यवहार करावेत. वर्तमानपत्रातून प्रसिद्ध जाहिरातीतील उत्पादने, सेवा किंवा त्यासंदर्भातील दावे यांची नागेश पब्लिशर्स प्रा. लि. कोणतीही हमी घेत नाही. त्या मजकुराच्या अथवा दाव्याच्या पूर्ततेसंदर्भातील कोणतीही जबाबदारी नागेश पब्लिशर्स प्रा.लि. चे मुद्रक, प्रकाशक, संपादक किंवा मालक यांच्यावर राहणार नाही, याची कृपया वाचकांनी नोंद घ्यावी.

**- मुख्य संपादक**


## क्लासिफाईड
जाहिरात छोटी, उपयुक्तता मोठी

- **नागाव मधील हॉटेलमध्ये काम** करण्यासाठी स्टाफ ची आवश्यकता आहे. रिसेप्शनिस्ट, हाऊसकीपर, रेस्टॉरंट कॅप्टन, किचन हेल्पर, ब्रेकफास्ट कुक, मेंटेनेंस बॉय इच्छुक उमेदवारांनी सकाळी १० ते ५ या वेळेत संपर्क साधावा अथवा व्हॉटसअ‍ॅप वर मेसेज करावा. मोबाईल - ७५५९१८४६१२
- **दिशा पॅथॉलॉजी लॅब अलिबाग व चोंढी** येथे कामासाठी मुले/मुली पाहिजे (अनुभवी/फ्रेशर उमेदवार चालतील) संपर्क : ८९९९१६१५१९
- **पिकवर ड्रायवर हवा आहे.** पगार : १८०००/- मो. ८००७८९३२३२, ८८०६६८३२३२

जाहिरातीसाठी संपर्क : (०२१४१) २२२२९०/ २२२७६१




## राशीभविष्य

- **मेष** : दिवसाची सुरूवात चांगली होईल. कामात उत्साह राहील. मित्र-नातलगांचं योग्य सहकार्य लाभेल.
- **वृषभ** : घरगुती व्यवसायात उत्कर्ष होईल. थोरामोठ्यांचा सहवास लाभेल. कामानिमित्त प्रवास घडेल.
- **मिथुन** : घरात पाहुण्यांची ये-जा राहील. मनाजोग्या घटना घडतील. वास्तुदोषावर त्वरित उपाय करावा.
- **कर्क** : मुलांना प्रगतीच्या नव्या संधी लाभतील. व्यवसायात उत्तम लाभ होईल. बाकी चिंता नसावी.
- **सिंह** : स्वकर्तृत्त्वातून इतरांना प्रेरणा मिळेल. विवाहाची बोलणी सफल होतील. मानसिक स्वास्थ्य लाभेल.
- **कन्या** : अनपेक्षित घटना चिंता वाढवतील. कुलदेवतेची उपासना करावी. स्थापत्य क्षेत्रात संधी लाभतील.
- **तूळ** : अनुभवींचा सल्ला कामी येईल. दातांचे, उष्णतेचे विकार संभवतात. मोठ्या खरेदीला चालना मिळेल.
- **वृश्चिक** : महत्त्वाची कामं मार्गी लागतील. अनावश्यक खर्च टाळायला हवा. प्रवासात योग्य काळजी घ्यावी.
- **धनु** : महत्त्वाची बोलणी सफल होतील. ग्रहमानाची विशेष अनुकूलता राहील. प्रयत्नात सातत्य ठेवावं.
- **मकर** : कौटुंबिक प्रश्न मार्गी लागतील. आर्थिक बाबतीत समाधान लाभेल. धार्मिक कार्याचा आनंद घ्योल.
- **कुंभ** : भावंडांशी मतभेद संभवतात. दूरच्या प्रवासाचे बेत ठरतील. कामाचं इतरांकडून कौतुक होईल.
- **मीन** : खर्च वाढला तरी प्राप्ती तशीच राहील. कौटुंबिक स्वास्थ्य लाभेल. जुनी येणी वसूल होतील.

स्टाईल स्टेटमेंट

## फॉर परफेक्ट कुर्ता लूक

✼ करिष्मा कपूरही मध्यंतरी समर लूकमध्ये दिसली. तिने नॅचरल ब्लॉक प्रिंटचा स्ट्राईपवाला कुर्ता घातला होता. त्याच डिझाइनची बॉटम कॅरी केली होती. त्यावर फ्लॅट चप्पल छान दिसत होत्या. कॅज्युअल ऑकेजनला असा पेहराव करता येईल.

✼ उन्हाळ्यात शरारा हा प्रकार बाजूला ठेवला जातो. पण तारा सुतारियाने नूडल स्ट्रॅप शॉर्ट व्हाईट कुर्त्यासोबत प्रिंटेड शरारा कॅरी केला होता. त्यावर साजेसा दुपट्टा या पेहरावाची शान अधिकच वाढवत होता. ही स्टाईल हटके म्हणावी अशीच.

✼ मोकळ्या ढाकळ्या कुर्त्यांच्या चाहत्या असाल तर दीया मिर्झाप्रमाणे तयार व्हा. तिने ग्रे रंगाचा कुर्ता मस्टर्ड रंगाच्या स्ट्रेट लेग्ड ट्राउझरवर कॅरी केला होता. ग्रे आणि मस्टर्ड हे कॉम्बिनेशन चांगलंच उठून दिसलं.

## १६ मे

दिन विशेष

- **१९९२ :** स्पेस शटल एन्डेव्हरची प्रथम अंतराळयात्रा सफल.
- **२०१३ :** आयपीएलमध्ये स्पॉट फिक्सिंगप्रकरणी एस. श्रीशांत, अजित चंडिला आणि अंकित चव्हाण यांना दिल्ली पोलिसांनी अटक केली.
- **२०१७ :** माजी केंद्रीयमंत्री पी.चिदंबरम आणि त्यांचा मुलगा कार्ती चिदंबरम यांच्या मालमत्तांवर सीबीआयने छापे घातले.
- **२०१८ :** कर्नाटकमधील सत्तेच्या शर्यतीत भाजपाने काँग्रेस आणि जेडीएस आघाडीवर कुरघोडी करत सत्तेची माळ गळ्यात पाडून घेतली.

व्हॉट्स न्यू?

## आता नको तापमानाची काळजी

दोस्तांनो, उन्हाळ्यात खूप उकडतं आणि हिवाळ्यात आपण कुडकुडत असतो. घरात एसी किंवा हिटर असला तरी बाहेर पडल्यावर आपल्याला त्रास होतो. हीच अडचण दूर करण्याचा प्रयत्न अमेरिकेतल्या शास्त्रज्ञांनी केला आहे. कॅलिफोर्नियाच्या सॅन डिएगो विद्यापीठातल्या शास्त्रज्ञांनी एक पॅच विकसित केला आहे. हा पॅच शरीरावर बांधल्यानंतर बाहेरच्या तापमानानुसार आपलं शरीर थंड किंवा गरम रहातं. एखाद्या पट्टयाप्रमाणे हा पॅच हातावर बांधता येतो आणि अगदी सहज कुठेही कॅरी करता येतो. पॅच मुलायम असल्यामुळे बराच काळपर्यंत तुम्हाला तो हातावर बांधून ठेवता येईल. यात वेगळ्या प्रकारची बॅटरी बसवण्यात आली आहे. पॅच ताणला गेला तरी ती खराब होत नाही. हा पॅच हातावर बांधला की तुम्हालाा उन्हाळा किंवा थंडी जाणवणार नाही, असं शास्त्रज्ञांचं म्हणणं आहे. हे पॅच एकत्र करून कपडे तयार करण्याचाही शास्त्रज्ञांचा प्रयत्न आहे. यामुळे संपूर्ण शरीर थंड किंवा गरम राहू शकेल. तापमानात चढउतार होत असलेल्या भागांमध्ये रहाणाऱ्या लोकांना हा पॅच खूप उपयुक्त ठरू शकेल. पॅचमध्ये थर्मो इलेक्ट्रिक मटेरियलचा वापर करण्यात आला आहे. हा शोध खरंच अनोखा म्हटला पाहिजे.

आरोग्यमंत्र

## कमी तापमान लाभकारक

आपल्याकडे आजही आजारी माणसाला गावच्या शुद्ध हवेत जाऊन राहण्याचा सल्ला दिला जातो. गावी दिवसा तापमान वाढले तरी झाडाखाली बसल्यावर थंड वाटते. आता तर संशोधनात असेही पुढे आले आहे की थंड हवामानात राहणाऱ्यांचे आयुष्य उष्ण हवामानात राहणाऱ्यांपेक्षा जास्त असते. थंड वातावरणात आपल्या मानवी पेशींवरील खराब प्रोटीन हटायला सुरूवात होते. 'नेचर जर्नल'मध्ये प्रकाशित झालेल्या एका संशोधनानुसार थंड हवा मानवाचे आयुष्य वाढवण्यासाठी उपकारक ठरली आहे. सिनोरहॅब्डाइटीस एलिजेन नावाचा किटक आणि मानवी पेशींवर एका प्रयोगशाळेत संशोधन करण्यात आले. या वेळी आढळले की सरासरी तापमान १५ अंश राहिल्यास पेशींचे खराब झालेले प्रोटीन हटायला लागते आणि नवीन प्रोटीन त्याची जागा घेते. याला प्रोटीसम अॅक्टीवेअर संबोधण्यात आले. अशा अॅक्टीवेअरला पीए २८वाय/पीएसएमई ३ नावाने ओळखण्यात आले. हे वाढत्या वयाला रोखते.



आजारांना पेशींमधील खराब प्रोटीन जबाबदार असतात. या निष्कर्षांच्या मदतीमुळे आता वाढते वय रोखण्याच्या नव्या पर्यायांवर संशोधन सुरू होणार आहे. त्यामुळे डिमेन्शिया, पार्किन्सन आणि अल्झायमर्ससारख्या म्हातारपणी होणाऱ्या आजारांपासून मानवाची सुटका होण्याची शक्यता आहे. हे सर्व आजार 'न्यूरो डीजेनरेटीव डीसीज' आहेत. त्याला खराब प्रोटीन जबाबदार असते. त्यामुळे तापमान कसेही असो; ही प्रक्रिया कॉपी करून वय रोखता येईल का, यावर विचार सुरू आहे.

### पंचांग

**शनिवार, १६ मे २०२६**
पराभवनाम संवत्सर शके १९४८, वैशाख कृ. १५, चंद्रराशी : मीन, नक्षत्र : भरणी, योग : सौभाग्य, सूर्योदय ६.०६, सूर्यास्त ७.०४

### फॉरवर्ड्स

**फ़िकर सभीं क़ो ख़ा ग़यी फ़िकर जगत क़ा पीर...**

**ज़ो फ़िकर क़ो ख़ा ग़या उसका नाम फ़क़ीर...!**

### फॅशन पॅशन

✼ टी शर्टचा कपडाही महत्त्वाचा असतो. उन्हाळ्यात कॉटन, लिलनचे कपडे घ्या. सुपिमा कॉटन हा प्रकार नेहमीच्या कॉटनपेक्षा जास्त आरामदायी असतो. त्यामुळे या कापडाचे टी शर्ट घ्या.

✼ उन्हाळ्यात फिरायला जायच्या योजना असतील तर स्लीव्हलेस टी शर्ट मस्ट आहे. शॉर्टस, कॅज्युअल पँट कशावरही तो चालून जाईल. त्यावर स्नीकर्स, फ्लोटर्स यापैकी काहीही घालता येईल.

✼ समुद्रकिनारी फिरायला जाणार असाल तर स्लीव्हलेस टी शर्ट तुमच्या बॅगेत असायलाच हवा.

करिअरवाटा

## कायद्याचं शिक्षण घ्यायचंय?

कायद्याचं शिक्षण घेणाऱ्या विद्यार्थ्यांसाठी बऱ्याच संधी उपलब्ध असतात. हे विद्यार्थी पत्रकारितेत प्रवेश करु शकतात. अन्य कोणतीही पदवी घेऊन नंतर पत्रकारितेचा अभ्यासक्रम करण्यापेक्षा कायद्याची पदवी घेऊन पत्रकार झाल्यास कायद्याशी संबंधित बातम्यांचं संकलन करताना किंवा त्यावर टिपणी करताना अधिक कौशल्य दाखवता येतं. कायद्याचे काही विद्यार्थी स्पर्धात्मक परीक्षांमध्येही उतरत आहेत. युपीएससी आणि एमपीएससी या परीक्षांसाठी लॉ हा विषय घेऊन आय.ए.एस. होणं कायद्याच्या पदवीधरांना सोपं जातं. या व्यतिरिक्त कायद्याचे पदवीधर मल्टीनॅशनल कंपन्यांमध्येसुद्धा मोठ्या पगाराच्या नोकऱ्या मिळवू लागले आहेत. या कंपन्यांना सतत कायदाविषयक सल्ला लागतो. त्यामुळे त्यांना कायद्याच्या पदवीधरांची आवश्यकता असते. याशिवाय स्वयंसेवी संघटना आणि लॉ फर्ममध्येही या पदवीधरांना चांगल्या संधी मिळू शकतात. सामाजिक कार्य आणि वकिली व्यवसाय या दोन्हींची आवड असणाऱ्या कायदा पदवीधरांनी स्वयंसेवी संघटनासाठी काम केल्यास व्यवसाय चालेल आणि सामाजिक कामाची हौसही भागवता येईल. याबरोबरच संशोधनाला वाहून घेणं हाही पर्याय तरुण वकिलांसमोर आहे.



खेचाखेची

## पोलिस

बळवंतरावांना जाग आली तर बंगल्याच्या आवारात चोर शिरले होते. त्यांनी पोलीसांना फोन करून घरी यायला सांगितलं.

**पलिकडून** : शक्य नाही, इथे कोणीही नाही.

बळवंतरावांनी परत फोन लावला. आपण नाही आलात तरी चालेल, मी त्या सर्वांना ठार केलं. थोड्याच वेळातच पोलीस व्हॅन घेऊन आले.

**पोलीस** : तुम्ही तर म्हणाला होता तुम्ही सर्वांना ठार केले.

**बळवंतराव** : तुम्ही म्हणाला होता ना तिथे कुणी नाही.


### वेगळं काही

मध्यंतरी ऑस्ट्रियातल्या साल्जबर्गमध्ये कागदी विमानं उडवण्याच्या स्पर्धेचं आयोजन केलं गेलं. तीन विभागांमध्ये पार पडलेल्या या स्पर्धेत स्पर्धकांनी स्वतःच कागदी विमानं तयार करून हवेत उडवली. अमेरिकेच्या जॅक हार्डीने स्पर्धेचं विजेतेपद पटकावलं. त्याचं विमान ५६.६१ मीटरपर्यंत उडलं. सर्बियाचा लेजर दुसऱ्या तर स्लोवेनियाचा रॉबर्ट तिसऱ्या क्रमांकावर राहिला. लेजर आणि रॉबर्टची विमानं अनुक्रमे ५२.२८ आणि ४६.३६ मीटरपर्यंत उडाली. ए ४ आकाराच्या कागदांपासून ही विमानं तयार केली जातात. हे कागद आयोजकांतर्फे स्पर्धकांना दिले जातात. कात्री, चिकटपट्टी, गम अशा वस्तू स्पर्धकांना आणाव्या लागतात. स्पर्धकच कागदी विमान तयार करतात.

स्टे फिट

## ट्रेड मिलचा वापर करताना...

कार्डिओ एक्सरसाईजमध्ये ट्रेड मिलवर पळण्यास प्राधान्य दिलं जातं. वजन कमी करण्याच्या हेतूनेही अन्य मशिन्सपेक्षा ट्रेडमिलवर विश्वास ठेवला जातो. मात्र या यंत्राचा वापर करताना काही काळजी घ्यायलाच हवी. ✼ कधीही पायात शूज न घालता ट्रेड मिलवर धावू नये. ट्रेड मिलवर धावताना मोठ्या प्रमाणावर घर्षण होत असल्यामुळे पायांची जळजळ होऊ शकते. शिवाय चुकून पाय बेल्टच्या कडेने घसरला तर गंभीर दुखापत होण्याचा धोका असतो. म्हणूनच दर्जेदार फिटींगचे शूज घालूनच ट्रेड मिलवर व्यायाम करावा. ✼ मशीन सुरु करण्याआधी दोन्ही पाय डेकवर ठेवावेत आणि शरीराचं संतुलन राखत कमी गतीत मशिन सुरु करावं. मशिन सुरु करताना पाय डेकवर थोडे फाकवलेल्या अवस्थेत ठेवावेत. स्पीड सेट केल्यावर पावलं पुढे टाकावीत. ✼ ट्रेड मिलवर धावताना कधीही खाली बघू नये. बऱ्याचजणांना पायांच्या हालचाली न्याहाळण्याची सवय असते पण या प्रयत्नात संतुलन हरपतं आणि अपघात होऊ शकतो. म्हणूनच पळताना मान ताठ ठेवून सरळ बघावं. श्वासाची एक लय राखावी.



## सुडोकू १०४

| | | | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|
| ९ | | ७ | ४ | ५ | | | ८ | |
| ८ | | ४ | | | | | १ | |
| १ | | ६ | | | | ७ | | ४ |
| ७ | | | | १ | ६ | ८ | | |
| ३ | | ५ | २ | | ४ | ६ | | ७ |
| | | ८ | ५ | ७ | | | | ३ |
| २ | ४ | | | | | ५ | | १ |
| | ७ | | | | | २ | | ८ |
| | ८ | | | ३ | २ | ४ | | ९ |

**टीप -**

✼ या चौकटीमध्ये सर्व रिकाम्या घरांमध्ये १ ते ९ पैकी अंक वापरून चौकट पूर्ण करायची आहे. यामध्ये प्रत्येक आडव्या ओळीत, उभ्या ओळीत व ३ ह्न ३ लहान चौकटीमध्ये १ ते ९ पैकी प्रत्येक अंक एकदा आणि एकदाच आला पाहिजे.


✼ आधी छापून दिलेले अंक बदलता येणार नाहीत.

✼ अशा तऱ्हेने पूर्ण झालेले उत्तर नेहमी एकच असते. पर्यायी उत्तरे असू शकत नाहीत.

## सुडोकू १०३चे उत्तर

| | | | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|
| २ | ८ | ९ | ६ | ५ | १ | ७ | ३ | ४ |
| ४ | ७ | ६ | २ | ९ | ३ | ७ | १ | ५ |
| ३ | १ | ५ | ८ | ७ | ४ | ९ | २ | ६ |
| ५ | ४ | ७ | ९ | १ | ८ | २ | ६ | ३ |
| १ | ३ | २ | ७ | ६ | ५ | ४ | ८ | ९ |
| ९ | ६ | ८ | ४ | ३ | २ | १ | ५ | ७ |
| ७ | ९ | ३ | १ | २ | ६ | ५ | ४ | ८ |
| ८ | ५ | १ | ३ | ४ | ९ | ६ | ७ | २ |
| ६ | २ | ४ | ५ | ८ | ७ | ३ | ९ | १ |

## शब्दकोडे क्रमांक १०४




**आडवे शब्द :-**
१) नशा आणणारा एक पदार्थ
३) माशी
५) पातळ खांब
८) सगळे
९) थोर,मोठा
१०) महाराष्ट्राचे पहिले मुख्यमंत्री
१३) नोकर
१५) महिरप
१७) खिडकी
१८) हवा
२०) केसांची बट
२१) प्रामाणिक
२२) कोयंड्यात अडकणारी
२३) मनात हेतू धरून केलेले कार्य
२५) वाळवंट
२६) तिरपी नजरफेक
२७) वाईट
२८) सर्वत्र
३०) सोंगट्या मांडण्याचे वस्त्र
३१) चाळीस शेर
३२) साखरेच्या पाकात तीळ घालून केलेली वडी
३४) एक तारवाद्य
३६) अव्यवस्थित,बेशिस्त
३७) घरोघर
३९) मनाने,मनातल्या मनात
४०) कपाटातील कप्पा, वाळा
४१) कानातला मळ काढण्याचे साधन
४३) वर्तन
४६) आवाज,गोंगाट
४७) पत्रातील मजकूर
५०) नकारच्या विरुद्ध
५१) रवाळ
५३) गाजावाजा
५५) जोराने आवळणे
५६) सारखे करणे
५८) केविलवाणा
६०) भात
६१) जन्म
६३) व्यर्थ
६५) समुद्रातील एक छोटा प्राणी,कालू
६६) श्रेष्ठ पुरुष
६८) हालचाल
७०) लाकूड
७१) उगीच
७३) सरपणाचे दुकान
७४) वृक्ष
७५) वडिलांची बहीण
७६) बारीक सारीक तपशिलासह
७७) पोपट

**उभे शब्द :-**
१) फाजील
२) युद्ध
३) तलम,मऊ कापड
४) भित्रा
५) मित्र
६) रात्रीचा पाऊस
७) होडी
८) उत्सवाचे दिवस
११) कुंडलीतील तीन गणातील एक
१२) छोटी लढाई
१३) रीत,रिवाज,हल्ला
१४) बडबड
१६) अफूचे बीज
१९) गवताची बारीक काडी
२१) लिहिता-वाजता येणे
२२) दफनभूमी
२४) पांढरीच्या विरुद्धचा रंग, काळ्या रंगाची
२८) सर्व,एकूण एक
२९) सैन्याचे युद्धास जाणे
३०) प्रवासातील मजल
३१) उत्तराधिकारी
३३) एक कालवण
३५) रम्य
३६ ) मृत्यू नसलेला
३७) जळजळीत,जाळणारे
३८) आर्जव,विनंती
४१) करणारा
४१) नफा वा तोटा नसलेली स्थिती
४३) शाब्दिक चकमक
४४) गर
४५) हलका,मृदू,नाजूक
४८ ) शहणा,सुंदर
४९) नंतर
५२) रामदास स्वामींचा जन्मदिवस
५४) जंगलातील आग
५५) मणका
५७) ऋण
५९) डोळा
६०) कर्ज देण्याचा व्यवसाय
६१) लोकांचे विचार
६२) पुरुष
६४) मागणारा
६५) कुशीवर निजलेला
६७) चिखल
६९) वागणूक
७१) खून
७२) अपशकून,खोडा

(उत्तर उद्याच्या अंकात)


### मागील शब्दकोड्याचे उत्तर





# कलासक्त





# यादोंकी बारात!

## लोकप्रिय दिग्दर्शक व निर्माता नासीर हुसेन

रंगबहार

शरद कोरडे

नासिर हुसेन हे भारतीय चित्रपट निर्माते, दिग्दर्शक व कथा पटकथाकार होते. हिंदी सिनेमाला त्यांनी एक नवीन आयाम दिले. त्यांच्या अनेक चित्रपटांची कथाही 'लास्ट अँड फाउंड' अर्थात हरवले व नंतर मिळाले या टॅग लाईन भोवती फिरणारी होती. विनोदाने प्रेक्षक त्यांच्या चित्रपटांना 'जत्रेत हरवलेल्या भावंडांची व तरुणपणी एकत्र आलेल्यांची गोष्ट' असे म्हणत. अगदी 'यादोंकी बारात' पर्यंत त्यांनी हा फार्मूला जपला. पुढे 'लास्ट अँड फाउंड' हा जॉनर ठेवूनच त्यांनी 'बचपन का खोया हुआ प्यार जवानी मे पाया' असा बदल करून घेतला. १९७० ते १९९० या काळात त्यांनी म्युझिकल रोमान्स असलेले अनेक मनोरंजक चित्रपट बनवले. 'कयामत से कयामत तक' हा १९८८ सालचा चित्रपट हे त्याचे उदाहरण आहे. लेखक व सीनेपत्रकार अक्षय मनवानी यांनी त्यांचे चरित्र 'सिनेमा टायटल्स, म्युझिक, मस्ती मॉडर्निटी 'द सिनेमा ऑफ नासिर हुसेन' या नावाने त्यांचे चरित्र लिहिले आहे. १९४८ ते १९९६ पर्यंत त्यांनी स्वतः चित्रपटाचे दिग्दर्शन केले, त्यानंतर मन्सूर खान या त्यांच्या मुलाने चित्रपटांचे दिग्दर्शन केले. नासिर हुसेन यांचा जन्म १६ नोव्हेंबर १९२६ मध्ये भोपाळ संस्थानात झाला. त्यांचे वडील जाफर हुसेन खान हे पस्तून वंशाचे जमीनदार कुटुंबातील शिक्षक होते. आई आमना य । सौदी अरेबिया येथील अरब वंशाच्या होत्या. त्या मौलाना आझाद यांच्या भाची होत्या. त्यांच्या पाच मुलांपैकी नासिर हे चौथे पुत्र होते. सर्वांत लहान ताहीर हुसेन हे अमीर खान चे वडील होते.

नासिर हुसेन हे १९४८ मध्ये शशीधर मुखर्जी यांच्या फिल्मीस्थान चे लेखक म्हणून रुजू झाले. त्यांनी प्रथम कमरजलालाबादी यांचे सोबत सहाय्यक म्हणून काम केले. त्यांनी फिल्मीस्थान साठी अनारकली १९५३, मुनीमजी १९५५, पेईंग गेस्ट १९५७, या चित्रपटांचे लेखन केले. फिल्मीस्थान स्टुडिओ हा बॉम्बे टॉकीज मधून वेगळा झालेल्या गट होता. मध्यम बजेटचे व ठराविक साच्याचे चित्रपट ते करीत होते. त्यांतील कलाकार स्टार व्हॅल्यू व संगीतकार म्हणून आपली ओळख निर्माण करण्याचा प्रयत्न करीत असत. शशीधर मखर्जींनी नासिर यांना 'तुमसा नही देखा' या चित्रपटाचे दिग्दर्शन करण्याची पहिली संधी दिली.१९५९साली त्यांनी 'दिल देके देखो' हा चित्रपट शम्मी कपूर व आशा पारेख यांना घेऊन तयार केला. हा चित्रपट प्रचंड हिट ठरला. आशा पारेख यांनी प्रथमच या चित्रपटापासून नायिकेची भूमिका करण्यास सुरुवात केली. नासिर हुसेन यांनी आशा पारेख यांना या चित्रपटाने संधी दिली व त्यांनी तो विश्वास सार्थ केला. या चित्रपटापासून कारवाँ या १९७१ सालच्या चित्रपटापर्यंत त्या नासिर हुसेन यांच्या चित्रपटाच्या नायिका राहिल्या. त्यांचे आशा पारेख सोबत दीर्घकाल प्रेम संबंध राहिले होते, पण नासिर हे विवाहित असल्यामुळे त्यांनी आशा पारेख यांच्यासोबत लग्न केले नाही व आशा पारेख या अखेरपर्यंत अविवाहित राहिल्या. नासिर यांना दोन मुले होती. त्यांची पत्नी ही मार्गरेट फ्रान्सिस लुईस होती, जी सहाय्यक नृत्य दिग्दर्शिका होती. ती त्यांना फिल्मीस्थान मध्ये भेटली. तिचे नाव त्यांनी आयेशा खान असे केले.

नासिर यांनी त्यानंतर 'नासिर हुसेन फिल्म्स' या कंपनीची स्थापना केली व ते निर्माते बनले. त्यांनी आपला पहिला चित्रपट देव आनंदला घेऊन १९६१ मध्ये 'जब प्यार किसी से होता है' केला त्यानंतर 'फिर वही दिल लाया हु', हा १९६३ सालचा चित्रपट जॉय मुखर्जी यांना घेऊन यशस्वी केला. आपल्या पहिल्या निर्मात्याच्या मुलाला त्यांनी ही संधी दिली. 'तिसरी मंझील' या १९६६ सालच्या चित्रपटाचे दिग्दर्शन त्यांनी विजय आनंद यांना दिले. त्यांनी शम्मी कपूर व आशा पारेख यांना घेऊन हा चित्रपट प्रचंड यशस्वी केला. या चित्रपटाला संगीत राहुल देव बर्मन यांनी दिले होते व ते खूप गाजले. त्यामुळे राहुल देव यांना चित्रपटसृष्टीत यशस्वी संगीतकार म्हणून मोठे नाव मिळाले. जितेंद्रसह आशा पारेख, अरुणा इराणी यांना घेऊन केलेला १९७१सालचा सांगितिक रोमँटिक चित्रपट ही यशस्वी ठरला. त्याचं वर्षी नासिर हुसेन यांनी आपला महत्त्वाकांक्षी भव्य मल्टीस्टार चित्रपट 'यादोंकी बारात' हा चित्रपट निर्मित केला या चित्रपटामध्ये धर्मेंद्र, विजय अरोरा, झीनत अमान, तारीक व अजित असा तगडा कलाकार वर्ग होता. चित्रपटाचे संगीतही राहुल देव यांनीच केले होते. या चित्रपटांतील गाणी खूप गाजली व चित्रपट यशस्वी ठरला.

नासिर हुसेन यांनी मजुरुह सुलतानपूरी व आर. डी. बर्मन यांना घेऊन अनेक यशस्वी चित्रपट केले. त्यानंतर तिसरी मंझील, कारवॉ, बहारों के सपने, हम किसी से कम नही, हे चित्रपट केले. 'तिसरी मंझील' हा रहस्यमय चित्रपट त्यांनी शम्मी कपूर व आशा पारेख, प्रेमनाथ, हेलन यांना घेऊन यशस्वी केला. त्यांत विजय आनंद यांचा सिंहाचा वाटा होता. राहुल देव यांना यशाच्या शिखरावर नेण्यात नासिर यांचा खूप मोठा सहभाग होता. १९८५ च्या 'जबरदस्त' या चित्रपटासाठी नासिर यांनी पुन्हा आर.डी. यांनाच बोलावले. 'जमाने को दिखाना है' या १९८१च्या व 'मंजिल मंजिल' या १९८४ च्या व जबरदस्त, या १९८५ च्या चित्रपटांना आर.डी. यांनी सांगित दीले होते परंतु हे तिन्ही चित्रपट अयशस्वी ठरले. त्यामुळे नासिर हुसैन यांना आर्थिक फटका तर बसलाच पण त्यांच्या दिग्दर्शक पदालाही उतरती कळा लागली. आशा पारेख यांना प्रत्येक चित्रपटात संधी दिल्यामुळे त्या खूप प्रसिद्धीस आल्या व अनेक इतर चित्रपट संस्थांतून त्यांना महत्त्वपूर्ण कामे मिळाली. नासिर यांचा पुतण्या अमीर खान याला त्यांनी प्रथमच बालकलाकार म्हणून 'यादों की बारात' मध्ये छोट्या भावाची भूमिका दिली होती, त्यानंतर तरुणपणी नायक म्हणून आपल्या 'कयामत से कयामत तक' या चित्रपटाचा त्याला नायक केला व आमिर खानच्या अभिनयाचे खूप कौतुक झाले. नासिर हुसेन यांनी आपल्या पत्नीच्या मृत्यूनंतर बाहेरचे कार्यक्रमात जाण्याचे टाळणे व एकांतवास पत्करला. नासिर यांचा १३ मार्च २००२ ला हृदयविकाराच्या झटक्याने मृत्यू झाला. त्यांच्या मृत्यूनंतर आशा पारेख यांनी एका मुलाखतीत सांगितले की ''पत्नीच्या मृत्यूनंतर ते एकांतवासांत होते, त्यामुळे त्यांच्या उत्तरकाळात माझी आणि त्यांची भेट होऊ शकली नाही. मी नासिरसाठी आयुष्यभर कुमारी राहिले, पण त्यांच्याशी विवाह करून मला 'घर फोडणारी अभिनेत्री' हा कलंक लावून घ्यायचा नव्हता. पण मी त्यांच्यावर प्रेम करीत होते हे सत्य आहे. हिंदी चित्रपट सृष्टीत त्यांनी मला उभी केली हे त्यांचे ऋण मला मान्य करावेच लागेल. ●●

# साराचे समर्पण



कारकिर्दीमध्ये फार काही वेगळे करु न शकलेली सारा अली खान वेगळे चित्रपट करण्याचा मात्र प्रयत्न करत असते. उत्तम अभिनय साकारण्यासाठीही ती प्रयत्नशील असते. त्याचा प्रत्यय अलिकडेच 'पती, पत्नी और वो'च्या चित्रिकरणाप्रसंगी आला. लंडनच्या ऐतिहासिक पुलावर सुरू असलेल्या या चित्रपटाच्या चित्रीकरणादरम्यान सारा अली खानने दाखवलेले समर्पण पाहून केवळ दिग्दर्शकच नव्हे, तर सहकलाकारही चकीत झाल्या. कडाक्याच्या थंडीत कृत्रिम पावसाचा मारा झेलत एक भावनिक दृश्य साकारताना, साराला उबदार राहण्यासाठी हिटर आणि गरम पांघरूण दिले जात होते; मात्र अभिनयात नैसर्गिक जिवंतपणा यावा आणि थंडीमुळे होणारी शरीराची थरथर प्रेक्षकांना खरी वाटावी, या जिद्दीने तिने त्या सोयी नाकारल्या. तांत्रिक कारणांमुळे तब्बल तीन-चार तास ओल्या कपड्यांत राहूनही तिने न डगमगता अनेक रिटेक दिले. तिची ही कमालीची ऊर्जा आणि कामाप्रती असलेली जिद्द पाहून सेटवरील इतर अभिनेत्रींनाही मोठे नवल वाटले. 'आम्ही सर्वजण जाड जॅकेटमध्ये असताना साराने ज्या धैर्याने त्या थंडीला आव्हान दिले, ते पाहून आम्हाला तिची प्रेरणाच मिळाली,' अशा शब्दांमध्ये तिचे कौतुक झाले. एका अभिनेत्रीचे हे धाडस पाहून चित्रपटाची टीम तिची फॅन झाली. तिचा हा धाडसी निर्णय चित्रपटातील त्या दृश्याला नक्कीच एका वेगळ्या उंचीवर घेऊन जाऊ शकतो.

# आश्वासक 'लाडकी बहीण'



महाराष्ट्र दिनाच्या चैतन्यानंतर, मे महिन्याच्या तिसऱ्या आठवड्यात 'लाडकी बहीण' हा बहुचर्चित कौटुंबिक चित्रपट मोठ्या पडद्यावर येत आहे. ही एक अशी प्रेमळ गोष्ट आहे, जी भाऊ आणि बहिणीमधील नात्याची गुंफण ओळखून थेट मनाला जाऊन भिडते. सध्याच्या सामाजिक वातावरणात भावा-बहिणीच्या पवित्र नात्यावर भाष्य करणारा हा चित्रपट प्रेक्षकांसाठी एक भावनिक पर्वणी ठरणार आहे. चित्रपटाची निर्मिती सह्याद्री फिल्म्सने केली असून, कौटुंबिक नात्यांचे पदर प्रभावीपणे मांडणारे अजय देवरे यांनी दिग्दर्शन केले आहे. या चित्रपटात भावाच्या भूमिकेत गश्मीर महाजनी आणि लाडक्या बहिणीच्या भूमिकेत रुतुजा बागवे यांची फ्रेश जोडी पाहायला मिळणार आहे. त्यांच्यासोबत सायली संजीव आणि मोहन जोशी यांच्याही महत्त्वाच्या भूमिका आहेत. चित्रपटाचे बहुतांश चित्रीकरण कोकणातील निसर्गरम्य गुहागर आणि पश्चिम महाराष्ट्रातील वाई येथील जुन्या वाड्यांमध्ये झाले आहे. त्यामुळे चित्रपटाला अस्सल मातीचा गंध लाभला आहे. कोकणात एका बागेत 'ओवाळणी'च्या दृश्याचे चित्रीकरण सुरू असताना, अचानक एका माकडाने सेटवर धाव घेतली आणि ताटातील मिठाई पळवून नेली. या अनपेक्षित घटनेमुळे सुरुवातीला सगळेच घाबरले, पण गश्मीरने समयसूचकता दाखवत 'बघ, तुझ्या ओवाळणीला माकडही पावलं' असा विनोदी संवाद साधत सीन सुरूच ठेवला. हे नैसर्गिक दृश्य इतके सुंदर जमून आले की दिग्दर्शकांनी ते चित्रपटात कायम ठेवले आहे. असा हा साहसी आणि विनोदी अनुभव घेत साकारलेला 'लाडकी बहीण' प्रेक्षकांच्या डोळ्यांमध्ये पाणी आणि ओठांवर हसू आणतो का, ते पहायचं.

# चित्तथरारक विज्ञानसफर



विज्ञानाच्या जगात आपण हरवलेल्या साम्राज्याचा शोध घेतो, तेव्हा तंत्रज्ञान आणि कल्पनाशक्तीची एक वेगळीच सांगड पाहायला मिळते. भविष्यातील एका अनोख्या प्रवासाची ही चित्तथरारक सफर प्रेक्षकांना अचंबित करणारी ठरेल. जागतिक स्तरावर बहुप्रतिक्षित असलेला 'द फरगॉटन किंग्डम' हा चित्रपट मे महिन्याच्या तिसऱ्या आठवड्यात भारतात धडकणार आहे. युनिव्हर्सल पिक्चर्स यांची ही महाकाय निर्मिती असून महान दिग्दर्शक जेम्स कॅमेरून यांनी याचे दिग्दर्शन केले आहे. टॉम हार्डी आणि नताली पोर्टमन यांच्या यात प्रमुख भूमिका आहेत. वैज्ञानिक कल्पित कथा असलेल्या या चित्रपटाचे चित्रीकरण न्यूझीलंडच्या घनदाट जंगलात आणि अत्याधुनिक सेटवर करण्यात आले आहे. एका साहसी दृश्यात टॉम हार्डीला खऱ्या डोंगरावरून दोरीने खाली उतरायचे होते, पण तांत्रिक बिघाडामुळे तो चक्क दहा मिनिटे हवेतच लटकून राहिला; मात्र व्यावसायिकता जपत त्याने त्याही स्थितीत आपला अभिनय सुरू ठेवला. अशा भव्य दृष्य चमत्कारांमुळे प्रेक्षकांना एका वेगळ्याच विश्वाची सफर घडणार आहे.

# धाडसी तृप्ती



सध्या चित्रपटसृष्टीत आणि सोशल मीडियावर बोल्ड अंदाजामुळे सर्वाधिक चर्चेत असलेली अभिनेत्री म्हणजे तृप्ती डिमरी. 'ॲनिमल' चित्रपटातील भूमिकेनंतर तिला 'नॅशनल क्रश' म्हणून ओळखले जाऊ लागले आहे. तृप्तीच्या 'बुलबुल' या चित्रपटाच्या चित्रीकरणादरम्यान एक किस्सा घडला. या चित्रपटात तिने एका रहस्यमयी आणि धाडसी स्त्रीची भूमिका साकारली होती. कोलकात्याच्या एका जुन्या, भव्य राजवाड्यात रात्रीच्या वेळी एका सीनचे शूट सुरू होते. या दृष्यामध्ये तृप्तीला लाल गडद साडी नेसून, जड दागिने घालून एका झाडावर बसून खाली पहायचे होते. रात्रीची वेळ, घनदाट झाडी आणि तो जुना राजवाडा यामुळे वातावरणात आधीच एक प्रकारचा थरार होता. तिथे उपस्थित असलेल्या क्रू मेंबर्सच्या सांगण्यानुसार, तृप्ती इतकी तन्मयतेने तो सीन करत होती की, एका क्षणी सेटवरचे दिवे अचानक लुकलुकू लागले. तिथे काम करणाऱ्या एका सहाय्यकाला वाटले की खरोखरच काहीतरी अघटित घडत आहे आणि तो घाबरून ओरडला. पण तृप्ती डगमगली नाही; ती त्याच धाडसी आणि शांत मुद्रेत झाडावर बसून राहिली. नंतर समजले की तो केवळ तांत्रिक बिघाड होता, पण तृप्तीच्या त्या निर्भयतेने आणि सौंदर्याने उपस्थित सर्वजण अवाक झाले. या धाडसी स्वभावामुळेच ती आज बॉलिवूडमध्ये स्वत:चे स्थान निर्माण करण्याचा प्रयत्न करत आहे.



१ घरातील रोजची भांडणे आणि एकमेकांवरचे प्रेम व्यक्त करण्यासाठी शब्दांची गरज नसते, तर ती भावना काळजात असावी लागते. संसाराची हीच गोड गुंतागुंत 'तू म्हणशील तसं' या नाटकाच्या रूपाने रंगमंचावर साकार झाली आहे. मराठी रंगभूमीवर कौटुंबिक नातेसंबंधांचे हळुवार पदर उलगडणारे 'तू म्हणशील तसं' हे नाटक सध्या चर्चेचा केंद्रबिंदू ठरत आहे. जिगिषा आणि अद्वैत थिएटर यांची ही निर्मिती असून, संकर्षण कऱ्हाडे दिग्दर्शनाच्या क्षेत्रात पाऊल टाकत आहे. नाटकात तो अभिनयदेखील करत असून भक्ती देसाईचीही नाटकात मुख्य भूमिका आहे. या नाटकाची तालीम सत्रे मुंबईतील जुन्या वाड्यांच्या पार्श्वभूमीवर पार पडली. त्यामुळे संवादांना जणू अस्सल मातीचा गंध लाभला. एका प्रयोगादरम्यान, संकर्षणचा गंभीर संवाद सुरू असताना स्टेजवरील एक खुर्ची अचानक करकरून तुटली; पण डगमगून न जाता त्याने 'लग्नानंतर सामानाची आणि माणसांची हीच अवस्था होते' असा समयसूचक टोला लगावला, ज्यावर प्रेक्षकांनी टाळ्यांचा कडकडाट केला. पती-पत्नीमधील गोड वादाचा हा लक्षवेधी प्रवास प्रेक्षकांना नक्कीच भावेल, असे वाटते.

# हृदयस्पर्शी कौटुंबिक सोहळा

# पंचायत: मातीचा सुगंध

शहरातून आलेल्या एका तरुणाचा गावाकडच्या वातावरणाशी जुळवून घेताना होणारा संघर्ष या वेब सिरीजमध्ये विनोदी पद्धतीने मांडला आहे. गावाकडच्या मातीचा सुगंध आणि तिथल्या अस्सल माणसांच्या स्वभावावर भाष्य करणारी ही एक रंजक कथा आहे. पंचायत ही ॲमेझॉन प्राईमवरील बहुचर्चित वेब सीरिज असून, याची निर्मिती वास्तववादी आशय मांडण्यासाठी प्रसिद्ध असलेल्या द व्हायरल फिव्हर (टीव्हीएफ) या संस्थेने केली आहे. या सीरिजच्या दिग्दर्शनाची धुरा दीपककुमार मिश्रा यांनी सांभाळली असून ग्रामीण जीवनातील बारकावे त्यांनी अत्यंत खुबीने टिपले आहेत. मुख्य भूमिकेत प्रेक्षकांचा लाडका अभिनेता जितेंद्रकुमार (जितू भैय्या) असून, त्याला रघुवीर यादव आणि नीना गुप्ता यांच्यासारख्या दिग्गज कलाकारांची साथ लाभली आहे. या सीरिजचे चित्रीकरण मध्य प्रदेशातील सिहोर जिल्ह्यातील खऱ्याखुऱ्या गावांमध्ये करण्यात आले आहे, ज्यामुळे यातील वास्तव्य अधिक उठावदार वाटते. मध्य प्रदेशातील महोदिया गावातील ही खरीखुरी आणि उंच पाण्याची टाकी सीरिजचे मुख्य ओळखचिन्ह बनली आहे. पहिल्या सीझनमध्ये जेव्हा अभिनेता जितेंद्र कुमारला या टाकीवर चढायचे होते,



तेव्हा तिथल्या जुन्या आणि अरुंद पायऱ्यांमुळे तो खरोखरच खूप घाबरला होता. दिग्दर्शक दीपक कुमार मिश्रा यांना पात्राच्या चेहऱ्यावर नेमकी तीच नैसर्गिक भीती आणि गोंधळ हवा होता. जितेंद्रचा तो खराखुरा घाबरलेला चेहरा कॅमेऱ्यात उत्तम टिपला गेल्यामुळे तो सीन वास्तववादी आणि प्रभावी झाला. साध्या सोप्या संवादांतून ग्रामीण राजकारणाचे 'पंचायत मांडणारी ही सीरिज प्रेक्षकांसाठी करमणुकीची मोठी मेजवानी आहे.

## शिस्तबद्ध मुंग्या

तुम्ही मुंग्यांना रांगेत चालताना पाहिलं असेल. त्यांचं काम अगदी शिस्तीत सुरू असतं. आता या मुंग्या रांगेत का बरं चालत असतील? यामागचं तंत्र काय असेल असा प्रश्न तुम्हाला कधी ना कधी नक्कीच पडला असेल. चला तर मग, यामागचं कारण जाणून घेऊ. मुंग्या या सामाजिक सजीव आहेत. त्या वसाहती करून राहतात आणि संघटित सामाजिक आयुष्य जगतात. लाल मुंग्या घरातल्या भिंतींमध्ये घर करून राहतात. अन्नाच्या शोधासाठी त्या बरंच मोठं अंतर कापतात. घराकडे परतण्याचा मार्ग शोधण्यासाठी त्यांच्याकडे कोणताही नकाशा नसतो. त्यामुळे त्यांना वेगळ्या तंत्राचा वापर करावा लागतो. अन्नाच्या शोधासाठी निघाल्यावर



वाचा तर खरं

मुंग्या खूण म्हणून एक गंध सोडत जातात. या गंधामुळे त्यांना परतीचा मार्ग शोधता येतो. या मुंग्यांच्या प्रमुखाने सोडलेल्या गंधाचा माग काढत त्या चालतात. त्यामुळे त्या एका रांगेत चालतात. मुंग्यांचं हे तंत्र जाणून घेण्यासाठी तुम्ही छोटासा प्रयोग करू शकता. मुंग्यांची रांग दिसली की त्यांच्या मार्गावर खोडरबर घासा. यामुळे हा गंध निघून जाईल. खोडरबर घासलेल्या ठिकाणी आल्यावर मुंग्या गोंधळून जातील. त्यांना मार्ग मिळणार नाही. त्या इकडे-तिकडे पळू लागतील, मार्गापासून भरकटतील.

आपण कोणत्या दिशेला जायचं हे त्यांना कळणारच नाही. त्यामुळे पुढच्या वेळी भरकटलेल्या मुंग्या दिसल्या की यामागचं कारण तुम्हाला कळलेलं असेल.

## ॲप शिकवणार विज्ञान, गणित

परीक्षेचे दिवस जवळ येऊ लागले आहेत. तुम्हीही आता जोरदार तयारीला लागला असाल. गणित आणि विज्ञान हे अभ्यासक्रमातले महत्त्वाचे विषय. या दोन्ही विषयांमध्ये बरीच सूत्रं लक्षात ठेवावी लागतात. यासाठी तुम्हाला बरीच मेहनत करावी लागते. पण आता काही ॲप्सच्या मदतीने तुम्ही गणित आणि विज्ञानातली सूत्रं लक्षात ठेऊ शकता.




✻ मॅथ्स फॉर्म्युला फ्री हे ॲप शालेय विद्यार्थ्यांसोबतच कॉलेजमधल्या विद्यार्थ्यांसाठीही उपयुक्त आहे. भूमिती, बीजगणितासोबत वरच्या वर्गातल्या गणिताची सूत्रं यात देण्यात आली आहेत. हे ॲप ३६ भाषांमध्ये उपलब्ध आहे.

✻ रसायनशास्त्रात चांगले गुण मिळवायचे असतील तर पिरियॉडिक टेबलची माहिती असणं गरजेचं असतं. पिरियॉडिक टेबल २०२१ हे ॲप तुमची मदत करू शकेल.

✻ फॉर्म्युला लाईट या ॲपमध्ये गणितासोबतच रसायनशास्त्र आणि




ॲप वर्ल्ड

भौतिकशास्त्र या विषयांमधली सूत्रं देण्यात आली आहेत. हे ॲप अगदी सोप्या पद्धतीने वापरता येईल. या तिन्ही विषयांशी संबंधित रंजक माहितीही या ॲपवर मिळू शकेल.


या ॲप्सचा वापर करा आणि गणित, विज्ञानात चांगले गुण मिळवा!

## साबणदगड: टॅल्क

टॅल्क हे एक मऊ आणि उपयुक्त खनिज आहे. त्याचा रंग पांढरा, फिकट हिरवा किंवा करडा असू शकतो. हे खनिज इतके मऊ असते की हाताने स्पर्श केला तर ते गुळगुळीत आणि साबणासारखे वाटते. म्हणून त्याला कधी कधी साबणदगड असेही म्हणतात. टॅल्क नैसर्गिकरित्या जमिनीच्या आत खडकांमध्ये आढळते. टॅल्क मुख्यतः उष्णता आणि दाबामुळे बदललेल्या खडकांमध्ये तयार होते. त्यामुळे टॅल्क हे नैसर्गिक भूगर्भीय प्रक्रियेतून निर्माण झालेले खनिज आहे. भारतामध्ये राजस्थान, उत्तराखंड, मध्य प्रदेश आणि कर्नाटक या भागांमध्ये टॅल्क सापडते. जगात चीन, अमेरिका आणि ब्राझील या देशांमध्येही टॅल्क मोठ्या प्रमाणात मिळते. हे खनिज खाणीतून मोठ्या दगडांच्या रूपात काढले जाते. नंतर त्या दगडांना मोडून त्यातील अशुद्ध भाग वेगळा केला जातो.

खनिजांची माहिती

टॅल्क शुद्ध करण्यासाठी त्याचे तुकडे करून त्यातील माती आणि इतर खडक वेगळे केले जातात. त्यानंतर ते बारीक दळले जाते. ही पूड विविध उद्योगांमध्ये वापरली जाते. काही विशेष वापरासाठी ही पूड अधिक स्वच्छ करून तयार केली जाते. टॅल्कची अतिशय बारीक पूड करून त्यात सुगंधी पदार्थ मिसळले जातात आणि मग टॅल्कम पावडर तयार होते. ही पावडर त्वचेवर लावल्यावर थंड आणि मऊ वाटते. ती ओलावा कमी करते आणि त्वचा कोरडी ठेवते. कागद उद्योगात कागद गुळगुळीत करण्यासाठी त्याचा वापर होतो. रंग उद्योगात रंग अधिक मऊ आणि टिकाऊ करण्यासाठी टॅल्क वापरले जाते. मातीच्या भांड्यांमध्ये आणि फरश्यांमध्येही याचा उपयोग होतो. काही सौंदर्यप्रसाधनांमध्येही टॅल्क वापरतात. टॅल्क मऊ, गुळगुळीत आणि उष्णता सहन करणारे असते. तसेच त्याची बारीक पूड सहज तयार करता येते. त्यामुळे उद्योगांमध्ये आणि दैनंदिन वापराच्या वस्तूंमध्ये त्याचा मोठ्या प्रमाणात उपयोग होतो. त्यामुळे हे एक महत्वाचे खनिज मानले जाते.



## वजन ठेवा आटोक्यात

आता डाएटिंगचं फॅड सर्वांपर्यंत येऊन पोहोचलं आहे! जाहिराती, चित्रपटांमधल्या कलाकारांना बघून आपणही त्यांच्यासारखंच बारीक असायला हवं, अशी मानसिकता तयार होऊ लागली आहे. यात लहान मुलंही मागे नाहीत. त्यामुळे आपलं वजन किती असायला हवं, असा प्रश्न उपस्थित होतो. बारीक असणं हे निरोगीपणाचं लक्षण असू शकतं का? या प्रश्नाचं उत्तर 'नाही' असंच द्यावं लागेल. प्रत्येक माणसाची शारीरिक ठेवण वेगवेगळी असते. प्रत्येकाच्या गरजाही वेगळ्या असतात. त्यामुळे खूप बारीक असणंही चांगलं नसतं. बारीक राहण्यासाठी तुम्ही खूपच कमी खात असाल तर ते चुकीचं आहे. अन्न आपल्या शरीराचं इंधन असतं. अन्नातल्या पोषक घटकांमुळे आपल्याला ऊर्जा मिळते. यामुळेच आपण वेगवेगळी कामं करू शकतो. जास्त बारीक असणं जसं चांगलं मानलं जात नाही तसंच खूप जाडही असू नये. वजन नियंत्रणात असणं गरजेचं असतं. तुमचं वय वाढत असतं. त्यामुळे शरीराला पोषक घटकांची आवश्यकता असते. म्हणूनच संतुलित आहार गरजेचा मानला जातो. फळं आणि भाज्या आरोग्यादायी असतात. त्यांचा समावेश



जपा आरोग्य

आहारात करायला हवा. वडा पाव, पिझ्झा, बर्गरसारखं जंक फूड बाजूला सारायला हवं. प्रत्येकाच्या शारीरिक ठेवणीनुसार त्यांचं वजन ठरतं. वजन किती असायला हवं हे उंचीनुसारही ठरवलं जातं. त्यामुळे लहान वयात वजनाची काळजी करायची तुम्हाला काहीच गरज नाही. शरीराला बळ देणारे पदार्थ खा आणि मस्त रहा.

## खरा मोती आणि कृत्रिम मोती

खरा मोती आणि कृत्रिम मोती दिसायला सारखे दिसतात. पण हे दोन्ही प्रकारचे मोती तयार होण्याची पद्धत वेगळी असते. खरा मोती शिंपल्याच्या आत तयार होतो. एखादा छोटा कण शिंपल्यात जातो, तेव्हा शिंपला त्यावर नॅकर नावाचे थर चढवत राहतो. अनेक थर साचल्यावर मोती तयार होतो. ही प्रक्रिया नैसर्गिक असल्यामुळे



त्याला बराच वेळ लागतो. कृत्रिम मोती माणसांनी तयार केलेला असतो. तो काच, प्लास्टिक किंवा शंखाच्या मण्यावर चमकदार थर चढवून बनवतात. तो कारखान्यात तयार केला जातो. तो लवकर बनतो आणि दिसायलाही आकर्षक असतो. खऱ्या मोत्याची किंमत जास्त असते, कारण तो नैसर्गिकरीत्या तयार होतो. वेळ लागतो आणि प्रत्येक मोती वेगळा असतो. कृत्रिम मोती सहज आणि मोठ्या प्रमाणात तयार होतात, म्हणून त्यांची किंमत कमी असते.

## 'मार्केट रिसर्च'चं अश्वासक क्षेत्र

विविध कंपन्या बाजारपेठा काबीज करण्याच्या प्रयत्नात असतात. कोणतं उत्पादन कधी बाजारात आणायचं, त्याचा ग्राहकवर्ग कोणता, उत्पादन कोणत्या पद्धतीने सादर करायचं याचं संशोधन करावं लागतं. याला मार्केट रिसर्च असं म्हटलं जातं. या क्षेत्रात करीअरच्या अनेक संधी निर्माण झाल्या आहेत. मार्केट रिसर्चची विभागणी तीन प्रकारांमध्ये करण्यात आली आहे. संशोधन, फिल्ड वर्क आणि




डाटा विश्लेषण असे हे तीन प्रकार होत. संशोधन या विभागात बाजारपेठेशी संबंधित समस्यांचा शोध घेऊन माहिती जमवावी लागते. संशोधनाचे अहवाल आणि प्रस्ताव तयार करण्याची जबाबदारीही याच लोकांवर असते. फील्ड वर्क अंतर्गत फोन, सोशल मिडियाच्या माध्यमातून किंवा घरोघर जाऊन सर्वेक्षण केलं जातं तर जमवलेल्या माहितीचा अभ्यास आणि विश्लेषण करून निष्कर्ष काढला जातो. मार्केट रिसर्चच्या क्षेत्रात विविध संस्था काम करत असतात. जगभरातल्या कंपन्या बाजारपेठेच्या माहितीसाठी या कंपन्यांची मदत

कोण होणार?

घेतात. अशा कंपन्यांमध्ये तुम्ही विविध पदांवर नोकरी करू शकता. सरकारी क्षेत्रामध्येही बऱ्याच संधी आहेत. मार्केटिंग हा विषय घेऊन एमबीए केल्यानंतर तुम्ही या क्षेत्रात काम करू शकता.

## गंमत पालीच्या शेपटीची

तुम्ही कधी पाल मारली आहे का? तिला टोला लगावताना पाहिलं आहे का? काय होतं अशा वेळी? पाल सुळकन् पसार होते पण तिची शेपटी मात्र तुटून वळवळत राहते. आपल्याला वाटतं आता ती मरणार. पण तसं होत नाही. शेपूट तुटली तरी पालीला



काहीच फरक पडत नाही. कारण निसर्गानंच स्वसंरक्षणार्थ तिला ही खास शक्ती दिलीये. माणसाला मेंदू असतो, मांसभक्षी प्राण्यांना मोठी आणि टोकदार नखं, मांस फाडायला मदत करणारे मोठे सुळे, सापांमध्ये विष, वनस्पतींना काटे आदी वैशिष्ट्य असतात. याचप्रकारे पालीचं वैशिष्ट्य आहे ते म्हणजे तीची शेपटी. ती शरीरापासून सहज सुटी होते. पालीच्या कुठल्याही भागावर आघात झाला तरी तिची शेपटी गळून पडते. पालीच्या पाठीच्या कण्याच्या शेवटच्या मणक्याला ही शेपटी सांधलेली असते. शत्रूपासून पळ काढायचा असेल किंवा आघात झाला असेल तर मज्जारज्जूची एक शाखा असलेली शेपटी तुटते आणि थोडावेळ वळवळत राहते. यामुळे शत्रूचं लक्ष वळवळणाऱ्या शेपटीकडेच राहतं आणि दरम्यानच्या काळात पाल त्यापासून दूर पळून जाऊ शकते. पालीच्या शरीराला शेपटी जोडलेली असते तोपर्यंत तिच्यात जीव असतो म्हणजेच संवेदनाही असतात. पण ती विलग होते तेव्हा काही काळानंतर संवेदनाही संपतात आणि ती निर्जिव होते.


विचित्र विश्व

शेपटीतील ज्ञानतंतूची शाखा कार्यक्षम असेपर्यंत शेपटीची वळवळ सुरु राहते. शेपटी तुटली तरी पालीचं काहीच अडत नाही. कारण लवकरच तुटलेल्या शेपटीच्या ठिकाणी पुर्ननिर्मिती प्रक्रियेनं नवी शेपटी येते. ही किळसवाणी दिसणारी पाल आहे की नाही हुशार!

## शरीराची बॅटरी

बॅटरी ज्याप्रमाणे साठवलेल्या उर्जेवर काम करते तसेच आपल्या शरीराचे आहे. शरीराला काम करण्यासाठी ऊर्जेची म्हणजेच शक्तीची गरज असते. आपण अन्न खातो त्यातून शरीर ऊर्जा तयार करते आणि ती साठवून वापरते. ही प्रक्रिया इतकी छान चालते की आपण चालणे, धावणे, विचार करणे सगळे सहज करू शकतो. भात, पोळी, फळे, साखर यासारख्या अन्नात कार्बोहायड्रेट, फॅट आणि प्रोटीन असतात. यातील कार्बोहायड्रेट सर्वात पटकन ऊर्जा देतात. पचनानंतर हे अन्न ग्लुकोजमध्ये बदलते. ग्लुकोज आपल्या रक्तातून पेशींमध्ये पोहोचते. आपल्या शरीरातील पेशींमध्ये मायटोकॉन्ड्रिया नावाचे छोटे भाग असतात. यांना ऊर्जाघर म्हणतात. येथे ग्लुकोज आणि ऑक्सिजन यांच्या मदतीने एक विशेष प्रक्रिया होते. त्यातून एटीपी म्हणजे एडोनेसाईन ट्रायफॉस्फेट नावाची ऊर्जा तयार होते. हीच एटीपी म्हणजे आपल्या शरीराची खरी बॅटरी आहे. आपण धावतो, खेळतो किंवा विचार करतो, तेव्हा ही एटीपी तुटते आणि ऊर्जा बाहेर पडते. त्यामुळे स्नायू काम करतात. मेंदू चालतो. शरीर सक्रिय राहते. ऊर्जा जास्त तयार झाली, तर ती आपल्या शरीरात फॅटच्या रूपात साठवून ठेवली जाते. श्वासातून मिळणारा ऑक्सिजनच या ऊर्जानिर्मितीत मदत करतो. म्हणूनच श्वास, अन्न आणि पेशी हे तिन्ही मिळून शरीराची बॅटरी चालवतात.


रंजक विज्ञान




थोडक्यात, आपले शरीर म्हणजे एक नैसर्गिक बॅटरी आहे. ती अन्नातून ऊर्जा तयार करते, साठवते आणि योग्य वेळी वापरते. म्हणूनच योग्य आहार आणि व्यायाम केल्यास ही बॅटरी चांगली चालते आणि आपण ताजेतवाने राहतो. आपण श्वासाबरोबर ऑक्सिजन घेत असतो. ऊर्जा तयार करताना शरीर ऑक्सिजनचा वापर करते. चालणे, हलके धावणे, सायकल चालवणे. यात पटकन दम लागत नाही, कारण शरीराला पुरेसा ऑक्सिजन मिळत असतो. तसेच, आपल्या शरीरात सोडियम, पोटॅशियम यासारखे इलेक्ट्रोलाइट्स असतात. हे शरीरातील छोट्या विद्युत संकेतांना मदत करतात. त्यामुळे आपले हृदय ठोके देऊ शकते. मेंदू संदेश पाठवतो आणि स्नायू हलतात. म्हणजेच आपल्या शरीरात खरोखरच सूक्ष्म वीज निर्माण होत असते. म्हणूनच पाणी पिणे, योग्य अन्न खाणे आणि विश्रांती घेणे खूप गरजेचे आहे. कारण त्यामुळे आपल्या शरीराची बॅटरी नीट चालू राहते.

## लाडकी नदी - काँगो

काँगो ही आफ्रिकेतील अतिशय महत्त्वाची आणि विशाल नदी आहे. पाण्याच्या प्रमाणानुसार ती जगातील दुसऱ्या क्रमांकाची मोठी नदी आणि जगातील सर्वात खोल नदी मानली जाते. तिची लांबी ४७०० किलोमीटर आहे. तर तिची खोली २२० मीटरपेक्षा जास्त आहे. ही नदी मुख्यतः मध्य आफ्रिका भागातून वाहते. काँगो नदीचा उगम आफ्रिकेतील झांबिया देशाजवळच्या उंच प्रदेशात होतो. सुरुवातीला तिला लुआलाबा नदी म्हणतात. पुढे ती डेमोक्रॅटिक रिपब्लिक ऑफ काँगो, रिपब्लिक ऑफ काँगो, तसेच काही भागांमध्ये इतर सीमांजवळून वाहत जाते. शेवटी ही नदी अटलांटिक महासागराला मिळते. काँगो नदीच्या काठावर अनेक महत्त्वाची शहरे आहेत. त्यापैकी किन्शासा आणि ब्राझाविल ही दोन मोठी शहरे नदीच्या काठावर समोरासमोर वसलेली आहेत. किन्शासा हे डेमोक्रॅटिक रिपब्लिक ऑफ काँगोचे राजधानी शहर आहे. या शहरांमध्ये नदीमार्गे मोठ्या प्रमाणात प्रवास आणि मालवाहतूक होते. काँगो नदी आफ्रिकेतील वाहतुकीचा महत्त्वाचा मार्ग आहे. जंगलांनी वेढलेल्या भागांमध्ये रस्ते कमी असल्यामुळे बोटी आणि जहाजांद्वारे मालवाहतूक केली जाते. लोकही प्रवासासाठी नदीचा वापर करतात. काँगो नदीत शेकडो प्रकारचे मासे आढळतात, त्यामुळे स्थानिक लोकांच्या अन्नासाठी आणि व्यवसायासाठी ती उपयुक्त आहे. नदी परिसरात हिरा, तांबे, कोबाल्ट यासारखी खनिजेही मिळतात. त्यामुळे हा भाग आर्थिकदृष्ट्या महत्त्वाचा आहे. काँगो नदीवर अनेक धरणे बांधली गेली आहेत. त्यापैकी इन्गा डॅम हे सर्वात प्रसिद्ध धरण आहे. हे धरण डेमोक्रॅटिक रिपब्लिक ऑफ काँगोमध्ये आहे. या धरणातून जलविद्युतनिर्मिती होते. थोडक्यात, काँगो नदी ही आफ्रिकेची जीवनवाहिनी आहे. पाणी, मासे, वाहतूक, खनिजे आणि वीज निर्मिती यासाठी तिचे मोठे महत्त्व आहे. म्हणूनच काँगो नदी आफ्रिकेच्या अर्थव्यवस्थेत आणि लोकांच्या जीवनात अत्यंत महत्त्वाची भूमिका बजावते.



गोष्टी नद्यांच्या

### प्राणीजगत

#### गमती जमती प्राण्यांच्या

माणसाप्रमाणे गोरीलालाही सर्दी होते. तसंच त्यांना इतर आजारही होऊ शकतात. शहामृग घोड्यापेक्षा वेगाने पळू शकतं. तर नर शहामृग सिंहासारखी गर्जना करू शकतं. शरीराचा तोल सांभाळण्यासाठी कांगारू शेपटीचा वापर करतात. गायी उभ्या उभ्या झोपू शकतात पण बसून झोपल्यावरच त्यांना स्वप्नं पडतात.



### ट्राय इट

#### कच्च्या तिळाच्या वड्या


संक्रांतीला तुम्ही तिळाचे लाडू आणि वड्या खाल्ल्या असतील. याच तिळापासून तुम्ही चविष्ट पदार्थ बनवू शकता. यासाठी दोन कप तीळ, एक कप बेदाणे, अर्धा कप किसलेलं सुकं खोबरं, अर्धा कप जवस, अर्धा कप तूप, पाव कप खोबरेल तेल, एक टी स्पून व्हॅनिला इसेन्स, पाऊण चमचा मीठ हे साहित्य घ्या. सर्व कोरडे पदार्थ एका मोठ्या भांड्यात एकत्र करा आणि मिसळून घ्या. आता त्यात तेल, बटर तसंच इतर पदार्थ घाला. हलवून घ्या. आता एखाद्या ट्रेमध्ये हे मिश्रण ओतून घ्या. नीट दाबून बसवा. हा ट्रे फ्रीजरमध्ये ठेवा. थंड झाल्यावर त्याच्या वड्या तयार होतील. भूक लागली की या वड्या खा.



### लाईफस्टाईल

#### ड्रायरचा वापर करताना...

मॉलमध्ये किंवा हॉटेलमध्ये स्वच्छतागृहात गेल्यावर हात वाळवण्यासाठी ड्रायर असतो. या ड्रायरखाली हात धरल्यावर मस्त गरम हवा येते. तुम्हीही मग त्याखाली हात धरता. पण या ड्रायरमुळे रोग होण्याची शक्यता असते. ड्रायरमध्ये असंख्य बॅक्टेरिया असतात. हे बॅक्टेरिया तुमच्या हाताला चिकटून तोंडात जाऊ शकतात. त्यामुळे पुढच्या वेळी अशा ड्रायर्सचा वापर करताना काळजी घ्या.



### योगा टाईम

#### थायरॉइड टाळण्यासाठी...

थायरॉइड ही सध्याच्या काळातली सर्वसाधारण समस्या झाली आहे. सेतूबंधासन करून थायरॉइडला लांब ठेवता येतं. हे आसन करण्यासाठी पाठीवर झोपा. गुडघे दुमडून घ्या. दोन्ही पायांमध्ये अंतर ठेवा. आता शरीराला वर उचलायचं आहे. श्वास घ्यायला सुरूवात करा. पाठीचा खालचा भाग आधी वर उचला मग मधला आणि मग वरचा भाग वर घ्या. यूट्यूबवर बघून तुम्ही हे आसन करू शकता.



## निवडक

### सिंधू-लक्ष्यची उपांत्यपूर्व फेरीत धड



**नवी दिल्ली :** भारताचे हुकमी खेळाडू पी. व्ही. सिंधू आणि लक्ष्य सेन यांनी थायलंड ओपन सुपर ५०० श्रेणीच्या बॅडमिंटन स्पर्धेत उपांत्यपूर्व फेरीत प्रवेश केला आहे. दोन वेळा ऑलिंपिक पदके मिळवणाऱ्या आणि सहावे मानांकन असलेल्या सिंधूने केवळ २८ मिनिटांत डेन्मार्कच्या अमाली स्कूल्झ हिचा २१-१३, २१-१५ असा पराभव केला, तर पुरुष विभागात सातव्या मानांकित लक्ष्य सेनने चीनच्या झू झुआन चेन याचे आव्हान २१-१२, २१-१३ असे मोडून काढले. हा सामना ३९ मिनिटे चालला. सिंधूला आता कडव्या आव्हानाचा सामना करावा लागणार आहे. उपांत्यपूर्व लढतीत अव्वल मानांकित आणि जागतिक क्रमवारीत तिसऱ्या क्रमांवर असलेल्या जपानच्या अकाने यामागुची तिची प्रतिस्पर्धी असणार आहे. तर तैपेईचा ली चिंग हाऊ आणि दुसरे मानांकित थायलंडचा कुनालवत वितिदसरन यांच्यातील विजेत्याबरोबर लक्ष्य सेनसा पुढील सामना होईल. दुहेरीतील अव्वल मानांकित भारताची जोडी सात्विक आणि चिराग शेट्टी यांनीही उपांत्यपूर्व फेरी गाठली आहे.

# पंजाब किंग्सचा पाचवा पराभव

**|| मुंबई इंडियन्सने सर्व गणित बिघडवले || नव्या कर्णधाराच्या नेतृत्वात विजयी 'तिलक'**

**| धर्मशाळा | वृत्तसंस्था |**

इंडियन प्रीमियर लीग २०२६ चा ५८ वा सामना १४ मे रोजी धर्मशाळा येथील हिमाचल प्रदेश क्रिकेट असोसिएशन स्टेडियमवर खेळला गेला. मुंबई इंडियन्सने हा सामना ६ गडी राखून जिंकला. या हंगामातील एमआयचा हा चौथा विजय होता. मात्र, ते आठ गुणांसह गुणतालिकेत आठव्या स्थानावर कायम आहेत. दरम्यान, पंजाब किंग्सला वाढत्या अडचणींचा सामना करावा लागत आहे. त्यांनी हंगामाची सुरुवात दणक्यात केली होती, पण आता त्यांनी सलग पाच सामने गमावले आहेत. परिणामी पंजाब १२ सामन्यांतून १३ गुणांसह गुणतालिकेत चौथ्या स्थानावर आहे. १६ गुणांपर्यंत पोहोचण्यासाठी त्यांना त्यांचे उर्वरित दोन्ही सामने जिंकणे अनिवार्य आहे.

पंजाब किंग्सविरुद्धच्या सामन्यात, मुंबई इंडियन्स संघाचे कर्णधारपद भूषवणाऱ्या वेगवान गोलंदाज जसप्रीत बुमराहने नाणेफेक जिंकून प्रथम गोलंदाजी करण्याचा निर्णय घेतला. यानंतर, पंजाब किंग्स संघानं निर्धारित २० षटकांत ८ गडी गमावून २०० धावा केल्या. प्रत्युत्तरात तिलक वर्मा (३३ चेंडूंत ७५ धावा) आणि विल जॅक्स (१० चेंडूंमध्ये नाबाद २५ धावा) यांच्या खेळीच्या बळावर मुंबई इंडियन्सने १९.५ षटकांत २०१ धावांचे लक्ष्य पूर्ण केले. पंजाब किंग्सच्या गोलंदाजीत अझमतुल्ला ओमरझाईने २ बळी घेतले, तर मार्को जान्सन आणि युझवेंद्र चहल यांनी प्रत्येकी १ बळी घेतला.

तत्पुर्वी, प्रथम फलंदाजी करताना पंजाब किंग्सकडून, अव्वल फळीत केवळ प्रभसिमरन सिंगची फलंदाजी पाहायला मिळाली, ज्यानं ३२ चेंडूंमध्ये ५७ धावांची खेळी केली. याशिवाय प्रियांश आर्याने २२ तर कूपर कॉनोलीने २१ धावा केल्या. खालच्या फळीत फलंदाजीला आलेल्या अझमतुल्ला ओमरझाईनं १७ चेंडूंमध्ये ३८ धावांची खेळी करुन पंजाब किंग्सला २०० धावांपर्यंत पोहोचवण्यात महत्त्वाची भूमिका बजावली. मुंबई इंडियन्सच्या गोलंदाजीत शार्दुल ठाकूरने चार तर दीपक चहरने दोन बळी घेतले. याशिवाय कॉर्बिन बॉश आणि राज बावा यांनी प्रत्येकी एक बळी घेतला.



### पंजाबचे समीकरण बिघडले

मुंबईचे या मोसमातून बाहेर झाली आहे. त्यामुळे मुंबईला आता तसा काही फरक पडत नाही. मात्र, मुंबई विरुद्ध पराभव झाल्याने पंजाबच्या अडचणीत वाढ झाली आहे. पंजाब किंग्स टीमच्या खात्यात आता १२ सामन्यानंतर ५ पराभव आणि ६ विजयांसह एकूण १३ गुण आहेत. पंजाबचे आता २ सामने बाकी आहेत. पंजाबसमोर या उर्वरित २ सामन्यांत रॉयल चॅलेंजर्स बंगळुरु आणि लखनौ सुपर जायंट्सचे आव्हान असणार आहेत. आरसीबीही प्लेऑफच्या शर्यतीत आहे. तसेच लखनौ सुपर जायंट्सचे आव्हान संपुष्टात आले आहे. मात्र, लखनौ पंजाबच्या अडचणीत वाढ करु शकते. त्यामुळे पंजाबचा उर्वरित २ सामन्यांत प्लेऑफसाठी चांगलाच कस लागणार आहे.

## जिल्ह्यातील उदयोन्मुख क्रिकेटपटूंसाठी सुवर्णसंधी

**| रायगड | क्रीडा प्रतिनिधी |**

रायगड जिल्हा क्रिकेट असोसिएशनच्या वतीने २३ व २४ मे २०२६ रोजी पेण येथील छत्रपती शिवाजी महाराज क्रीडांगणावर चौदा वर्षाखालील उदयोन्मुख मुलांसाठी टॅलेंट हंट कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले आहे. जिल्ह्यातील सर्व अकॅडमी, क्लब पासून अगदी गल्लीतले फलंदाज व गोलंदाज ते स्टेडियमचा स्टार, असा प्रवास करण्याचे स्वप्न पाहणाऱ्या जिल्ह्यातील सर्व युवा क्रिकेटपटूंसाठी एक मोठी संधी उपलब्ध झाली आहे. रायगड जिल्ह्यातील चौदा वर्षाखालील ०१/०९/२०१२ वर्षानंतर जन्मलेल्या वयोगटातील मुलांसाठी एका विशेष क्रिकेट टॅलेंट हंट कार्यक्रमाचे आयोजन प्रथमच जिल्ह्यातील युवा खेळाडूंसाठी आरडीसीएतर्फे करण्यात आले आहे. टॅलेंट हंट कार्यक्रमामध्ये जलद गती गोलंदाज, तंत्रशुद्ध फलंदाज याचे शास्त्रोक्त मूल्यमापन करून घेता येईल. गोलंदाजी सोबतच फलंदाजीतील कसब दाखवण्यासाठीही खेळाडूंना व्यासपीठ मिळणार आहे. या निवड प्रक्रियेमध्ये उत्कृष्ट कामगिरी करणाऱ्या खेळाडूंची निवड रायगडच्या संभाव्य संघात केली जाणार असून निवड झालेल्या खेळाडूंना रायगड जिल्हा क्रिकेट असोसिएशनच्या मार्फत तज्ञ प्रशिक्षकांकडून प्रशिक्षण देण्यात येणार आहे.




जिल्ह्यातील चौदा वर्षाखालील जास्तीतजास्ती मुलांनी टॅलेंट हंट कार्यक्रमामध्ये सहभाग घेण्यासाठी जिल्हा क्रिकेट असोसिएशनच्या अधिकृत संकेत स्थळावर जाऊन आपली नोंदणी २१ मे पर्यंत ऑनलाईन पद्धतीने करायची आहे. टॅलेंट हंट कार्यक्रमा संबंधी अधिक माहितीसाठी सहसचिव जयंत नाईक ९५६१०९९७३५, अरुण शिंदे ९५२७६०८०८०, देवेंद्र पाटील ९२२६९५११७६ यांच्याशी संपर्क साधण्याचे आवाहन आयोजकांनी केले आहे.

## भारतीय कुस्तीच्या इतिहासात क्रांती




**अहिल्यानगर :** भारतीय शालेय क्रीडा क्षेत्रासाठी अभिमानाचा आणि इतिहासात सुवर्णाक्षरांनी नोंद होईल असा क्षण जवळ आला आहे. देशातील हजारो युवा खेळाडूंना घडवणाऱ्या प्रशिक्षकांना आता थेट आंतरराष्ट्रीय दर्जाचे शिक्षण आणि मार्गदर्शन मिळणार असून, स्कूल गेम्स फेडरेशन ऑफ इंडियाच्या पुढाकारातून भारतात प्रथमच आंतरराष्ट्रीय स्तरावरील कुस्ती प्रशिक्षक शिक्षणस्तर-१ कार्यक्रम आयोजित करण्यात येत आहे. इंटरनॅशनल स्कूल स्पोर्ट फेडरेशन आणि युनायटेड वर्ल्ड रेसलिंग यांच्यातर्फे होणारा हा ऐतिहासिक उपक्रम भारतीय क्रीडा क्षेत्रासाठी नवा आत्मविश्वास निर्माण करणारा ठरणार आहे. देशातील ग्रामीण भागातील मातीशी नाळ जोडलेल्या अनेक युवा खेळाडूंना जागतिक दर्जाचे प्रशिक्षण मिळावे, प्रशिक्षक आधुनिक तंत्रज्ञानाशी जोडले जावेत आणि भारतीय कुस्तीला नवी दिशा मिळावी, या उद्देशाने हा उपक्रम राबविला जात आहे. त्यामुळे हा कार्यक्रम केवळ प्रशिक्षणापुरता मर्यादित न राहता भारतीय क्रीडा संस्कृतीला जागतिक स्तरावर नेणारा परिवर्तनाचा प्रवास मानला जात आहे.

## साताऱ्यात हिंद केसरीसाठी शाही आखाडा

सातारा : हिंद केसरी कुस्ती स्पर्धेसाठी साताऱ्यातील छत्रपती शाहू जिल्हा क्रीडा संकुलात जय्यत तयारी झाली आहे. या स्पर्धेसाठी विशेष आखाडे तयार करण्यात आले आहेत. त्यासाठी २०० लिटर तेल, तूप मिसळत आखाड्यातील मातीला मुलायमपणा आणला आहे. दरम्यान, स्पर्धेसाठी गुरुवारी रात्री उशिरापर्यंत मल्ल साताऱ्यात दाखल झाले. तालीम संघ व राजेश्वर प्रतिष्ठानने या स्पर्धेचे आयोजन केले आहे. बुधवारी झालेला पावसाचा तडाखा हिंद केसरीच्या आखाड्यास बसला; परंतु त्यावर मात करीत आयोजकांनी मातीचे तिन्ही आखाडे उकरत कुस्तीसाठी तयार केले. प्रत्येक आखाड्यासाठी २० ट्रक माती घालण्यात आली आहे. महाराष्ट्र केसरी सिकंदर शेख नारायणगाव केसरीचा मानकरी, विजेत्या पैलवानांना १५ लाखाचा इनाम आहे. भारत केसरी निरु गुज्जरवर एकेरी पट कुस्ती होणार आहे. आखाड्यातील सर्व माती वरखाली करण्यास प्रारंभ केला आहे. सायंकाळच्या सुमारास माती सुकून गेली होती. विशेष आखाडे तयार करण्यात आले आहेत. त्यासाठी २०० लिटर तेल, तूप मिसळत आखाड्यातील मातीला मुलायमपणा आणला आहे.

प्रथम पुण्यस्मरण



कै. अमर रामचंद्र म्हात्रे

सर्वांना हवेहवेसे वाटणारे...
आयुष्यात कधीही न विसरता येणारे
व्यक्तीमत्व...

शोकाकुल
म्हात्रे परिवार (अलिबाग)




कृषीवल हे पत्र नागेश पब्लिशर्स प्रा. लि.साठी मुद्रक, प्रकाशक **सौ.सुप्रिया पाटील** यांनी नागेश पब्लिशर्स, वेश्वी, अलिबाग, जि. रायगड ४०२ २०९ येथे छापून येथेच प्रसिद्ध केले. आर. एन. आय. रजि. क्र. ४९९६३/७७ | RGD/016/2026-2028
दूरध्वनी : ०२१४१-२२२२९०/२२२७६१, संपादकीय विभाग-email : krushivalnews@gmail.com / जाहिरात विभाग- email : raigadkrushival@gmail.com मुंबई कार्यालय : ए-५ आयओनिक १८, ऑर्थर बंदर रोड, कुलाबा, मुंबई ४०० ००५. दूरध्वनी : ०२२-२२८८४५३८.
■ संस्थापक-संपादक : स्व. प्रभाकर पाटील ■ व्यवस्थापकीय संचालक : मीरा घाडीगावकर ■ कार्यकारी संपादक : माधवी माणिक सावंत* ■ सल्लागार संपादक : प्रसाद वासुदेव केरकर
(* या पत्रातील मजकुराच्या निवडीसाठी पीआरबी कायद्यानुसार संपादकीय जबाबदारी यांची आहे.)